ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ | अंक ६ | पाने ७६ | जानेवारी २०१८ | मूल्य ३०रु.

विशेषांक

## बँकिंग क्षेत्रातील सुधारणा


बँकिंग क्षेत्रातील सुधारणा : एक ऐतिहासिक दृष्टीकोन
अतिषा कुमार

बँकिंग क्षेत्राचा प्रवास आणि भविष्यातील वाटचाल
विवेक कुमार, संकेत टंडन, शुभदा राव

अनुत्पादक मालमत्ता- आव्हाने व भविष्य
दीपक नारंग

ग्राहक सेवा – बँकिंग क्षेत्रातील नवीन अध्याय
सुशील अंबादास रगडे

विशेष लेख
बँकाचे भांडवली पुनर्भरण
आशुतोष कुमार

फोकस
दिवाळखोरीचे निवारण होणाऱ्या नव्या युगामध्ये प्रवेश
इंदविजल धसमाना




मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्‌जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केंद्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक ६ ❖ ❖ जानेवारी २०१८ ❖ ❖ मूल्य ३० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**गजानन धोपे**


**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**


**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक ॲंड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक ॲंड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| बँकिंग क्षेत्राचा प्रवास आणि भविष्यातील वाटचाल | - विवेक कुमार, संकेत टंडन, शुभदा राव | ५ |
| बँकिंग क्षेत्रातील सुधारणा : एक ऐतिहासिक दृष्टीकोन | - अतिषा कुमार | ११ |
| ग्रामीण बँकव्यवस्थेपुढील समस्या आणि आव्हान | - मंजुला वधवा | १७ |
| अनुत्पादक मालमत्ता- आव्हाने व भविष्य | - दीपक नारंग | २७ |
| बँकांचे पुनर्भांडवलीकरण | - रमेश झवर | ३१ |
| बँकाचे भांडवली पुनर्भरण (विशेष लेख) | - आशुतोष कुमार | ३७ |
| मिशन इंद्रधनुष्य आणि बँकिंगमधील फेरबदल | - डी. एस. मलिक | ४१ |
| वित्तीय समावेशन सुविधा देण्यात बँकांची भूमिका | - चरण सिंग आणि शिवकुमार रेड्डी के | ४७ |
| दिवाळखोरीचे निवारण होणाऱ्या नव्या युगामध्ये प्रवेश (फोकस) | - इंदिवजल धसमाना | ५४ |
| ग्राहक सेवा – बँकिंग क्षेत्रातील नवीन अध्याय | - सुशील अंबादास रगडे | ६१ |
| बँकिंग क्षेत्र आणि महाराष्ट्रातील शेती वित्तपुरवठा | - प्रा. जीवन बिरादार | ६५ |



योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

संपादकीय

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# विश्वास आणि आशा

जगभरातील विविध संस्कृतींमध्ये बचतीची संकल्पना नेहमीच अस्तित्वात असल्याचे आपणास दिसून येते. सोन्याची किंवा इतर धातूची नाणी भांडयामध्ये भरून ती जमीनीत पुरून ठेवण्याची पध्दत जगभरात प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. राज्यांच्या कोषागारांमध्ये जनतेकडून वसूल करण्यात आलेला कर संकलित करून ठेवला जाई.

काळ बदलला तसा बँकिंगची व्यवस्था समोर आली त्यामुळे पैशांचे व्यवस्थापन घरातून बँकेकडे स्थानांतरीत झाले. रोख पैशांसोबतच दाग-दागिने जमा करण्याची सुविधा बँकेतील लॉकर्सच्या रूपात उपलब्ध झाल्यामुळे आपली मेहनतीची कमाई सुरक्षित ठेवण्याची सुविधा लोकांना उपलब्ध झाली. खात्यात ठेवलेल्या रकमेवर बँका व्याज देत असल्यामुळे यातून पैसे कमविण्याची सुविधाही उपलब्ध झाली. दुसरीकडे बँका त्यांच्याकडे जमा असलेली रक्कम चांगला परतावा मिळणाऱ्या शेअर बाजार किंवा तत्सम ठिकाणी गुंतवू लागले. सरकारी पैसा मध्यवर्ती बँकेकडे जाऊ लागल्यामुळे हळूहळू मध्यवर्ती बँक पतधोरणाची नियंत्रक बनली. सध्या मध्यवर्ती नियामक बँकेशिवाय कोणत्याही अर्थव्यवस्थेची कल्पनाही केली जाऊ शकत नाही. भारताच्या बाबतीत भारतीय रिझर्व्ह बँक ही पतधोरण नियामक, बँकांची बँक आणि चलन नियंत्रक अशा भूमिका निभावत असून केवळ सरकारी पैसा साठवण्याचे ठिकाण ही धारणा भारतीय रिझर्व्ह बँकेने केव्हाच बदलली आहे.

भारतातील बँकींग यंत्रणा छोटया, खाजगी व्यापारी बँकापासून सुरू झाली. परंतू यातील काही बँका बुडू लागल्या किंवा या बँकातील निधी बँकेचे संचालक लुटू लागले आणि ग्राहकांचा मेहनतीचा पैसा बुडू लागला, त्यावेळी भारत सरकारने या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला. या मोठया सुधारणेमुळे बँकेला झालेल्या तोट्यातून सामान्य ग्राहकांचे नुकसान होणार नाही तसेच बँकांना ग्राहकांच्या ठेवींचा चुकीचा वापर करता येणार नाही. याची खात्री मिळाली. कालातरांने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे नियमन करण्यासाठी इतर नियमक यंत्रणा सुरू करण्यात आल्या. बँकिंग क्षेत्रातील सुधारणा संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या नरसिम्हा समितीच्या शिफारसी या संदर्भातील एक महत्वाचा टप्पा ठरल्या. त्यानंतर सार्वजनिक बँकांची कार्यक्षमता तसेच प्रशासन चांगले करण्यासाठी सुधारणांची मालिकाच सुरू झाली.

जागतिक स्तरावरील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी इतर अनेक क्षेत्राप्रमाणे बँकींग क्षेत्रातही खाजगीकरण आणावे, असे सरकारला एका टप्प्यावर वाटले. त्यामुळे एच.डी.एफ.सी, आय.सी.आय, ऍक्सीस आणि येस बँक यांना भारतीय बँकिंग क्षेत्रामध्ये काम करण्यास परवानगी देण्यात आली. ग्राहकांचे समाधान मिळवण्यात या खाजगी बँका सरकारी बँकेच्या तुलनेत अधिक यशस्वी ठरल्या. त्यामुळे कॉर्पोरेट आणि रिटेल बँकिंग या दोन्हीमध्ये खाजगी बँकांनी आघाडी घेतली आहे. यातून धडा घेत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनीही ग्राहक समाधानाकडे अधिक लक्ष द्यायला सुरूवात केली. आणि ग्राहकांच्या सुविधेसाठी अनेक तांत्रिक सुधारणा घडवून आणल्या.

भारतात यशस्वी बँकिंगच्या मार्गात एन.पी.ए. अर्थात अनुत्पादक मालमत्ता चा मोठा अडथळा निर्माण झाला आहे. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँकासाठी ही एक मोठी काळजीची गोष्ट बनलेली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सरकारने मिशन इंद्रधनुष्यची घोषणा केली आहे. या अंतर्गत पुर्नभांडवलीकरण, बँकिंग बोर्ड ब्युरोची निर्मिती आणि दायित्व आराखडयाची निर्मिती अशा महत्वाच्या सुधारणांवर लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर दिवाळखोरी कायदा करून सरकारने एन.पी.ए. समस्या सोडविण्यासाठी मोठे पाऊल उचलले.

आताच्या आधुनिक बँकिंगच्या काळात सायबर सुरक्षा महत्वाची बनली आहे. सरकारचा माहिती तंत्रज्ञान विभाग आय.आय.टी. सारख्या संस्थाच्या सहकार्यातून सायबर सुरक्षा संदर्भात काम करत आहे. जन धन योजना आणि थेट लाभ हंस्तातरण योजना यासारख्या योजनाव्दारे सरकार बँकिंग क्षेत्राच्या माध्यमातून आर्थिक समावेशनाचे उद्दिष्टे गाठण्याचे प्रयत्न करत आहे. ग्रामीण भागातील बँक यंत्रणा हा आणखी एक काळजीचा मुद्दा आहे. कारण भारतातील अनेक खेडी अजूनही बँकींग सुविधापासून वंचित आहे. निरक्षरता आणि गावात बँक नसणे यासारख्या अडथळयामुळे ग्रामीण भागातील बरेच लोक अद्यापी बँकिंग सुविधाचा लाभ घेऊ शकत नाही. यातुन मार्ग काढण्यासाठी सरकारने बँकिंग प्रतिनिधींची कल्पना पुढे आणली आहे. हे प्रतिनिधी ग्रामीण जनता आणि बँका यांच्यातील दुवा म्हणून काम करणार आहे.

बँकिंग सुधारणा हा नियोजनकर्ते आणि अर्थशास्त्रींसाठी केवळ एक मुद्दा असू शकतो परंतू बहूतांश जनतेसाठी मोठया मेहनतीने मिळवलेला पैसा विश्वासाने सुरक्षित ठेवण्याची बँक हीच एक जागा आहे. आपला पैसा सुरक्षित आहे आणि आपण तो केव्हाही काढू शकतो. ही भावना अनेकांना तणावमुक्त करणारी असते. त्यामुळे कार्यक्षम आणि चांगली बँकिंग यंत्रणा सर्वांच्याच आयुष्यातील तणाव दूर ठेवण्यासाठी महत्वाची आहे.

■■■

# बँकिंग क्षेत्राचा प्रवास आणि भविष्यातील वाटचाल

**विवेक कुमार, संकेत टंडन, शुभदा राव**

**१९९१ च्या नंतरच्या काळात भारतातल्या बँकिंग क्षेत्रात जनसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या सुधारणांचा नवा अध्याय सुरु झाला. कर्जपुरवठ्याच्या प्रक्रिया आणि कर्जांच्या व्याजदराच्या पद्धतींवरचे निर्बंध उठविणे, पूर्वीच्या नियमांचे हळूहळू शिथिलीकरण, प्रचलित बँकिंग पद्धतीकडून केंद्रीय बँकिंग प्रणालीकडे स्थलांतर, नव्या युगातल्या खाजगी क्षेत्रातल्या बँकांना व्यवहारांची परवानगी, या सगळ्यामुळे २००० च्या दशकात बँकिंग सेवांचा वेगाने विस्तार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले.**

भारतीय अर्थव्यवस्था २०१८ सालात प्रवेश करत आहे. अशावेळी अर्थव्यवस्थेला अनेक सखोल आणि दूरदर्शी बदलांना सामोरे जावे लागणार असे दिसतेय. पहिल्यांदाच देशाचे दरडोई डॉलर्सचे उत्पन्न २००० ची मर्यादा ओलांडेल, असे संकेत आहेत. चैनीच्या वस्तुंना गरजेच्या वस्तुंमधे बदलवणारा आणि त्यासाठी नागरिकांच्या क्रयशक्तीमधे सुधारणा करुन देशांतर्गत मागणीमधे अनेक पटीने सुधारणा घडवून आणणारा जागतिक अर्थव्यवस्थेच्या इतिहासातला हा उंबरठा आपण ओलांडणार आहोत.

या आर्थिक परिवर्तनात, भारतीय बँकिंग व्यवस्थेला खेळीयाची महत्त्वाची भूमिका निभवावी लागणार आहे. बँकिंग सेवांमधे आपल्याला निश्चित वाढ बघायला मिळणारच आहे, त्याबरोबरच बँकिंग व्यवहारांमधल्या समस्यांचे अधिक सुसंस्कृत निराकरण आणि उत्तम दर्जाच्या सेवांचा पुरवठा होताना देखिल आपण बघु शकणार आहोत.

**भूतकाळात देशातल्या बँकिंग क्षेत्राने सुधारणांना कसा प्रतिसाद दिला?**

बँकिंग क्षेत्राच्या प्रवासाचा शोध घ्यायला सुरुवात करण्यापूर्वी या क्षेत्राच्या इतिहासाचा धांडोळा घेणे मार्गदर्शक ठरेल. सन १९६९ आणि १९८० मधे बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर १९९१ च्या नंतरच्या काळात भारतातल्या बँकिंग क्षेत्रात जनसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या सुधारणांचा नवा अध्याय सुरु झाला. कर्जपुरवठ्याच्या प्रक्रिया आणि कर्जांच्या व्याजदराच्या पद्धतींवरचे निर्बंध उठविणे, पूर्वीच्या नियमांचे हळूहळू शिथिलीकरण, प्रचलित बँकिंग पद्धतीकडून केंद्रीय बँकिंग प्रणालीकडे स्थलांतर, नव्या युगातल्या खाजगी क्षेत्रातल्या बँकांना व्यवहारांची परवानगी, या सगळ्यामुळे २००० च्या दशकात बँकिंग सेवांचा वेगाने विस्तार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झाले. त्यामुळे बँकांमधल्या ठेवींचे १९९७ च्या आर्थिक वर्षातल्या, स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ३५.६ टक्के प्रमाण आर्थिक वर्ष २००७ मधे ६०.८ टक्के झाले. त्याचप्रमाणे

कर्जाचे वितरण १९९७ मधे १९.६ टक्के होते ते दुप्पट होऊन २००७ मधे स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४५.० टक्के झाले. त्यानंतरच्या दहा वर्षांमधे बँकांमधल्या ठेवींचे आणि कर्ज वितरणाचे प्रमाण वाढून स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या अनुक्रमे ७१.२ टक्के आणि ५१.९ टक्के झाले. सन २००८ मधल्या जागतिक आर्थिक संकटामुळे निर्माण झालेल्या आर्थिक आणि वित्त बाजारातल्या अस्थैर्याचा देखिल फारसा परिणाम बँकिंग क्षेत्राच्या वाढत्या विस्तारावर झाला नाही. सन १९९० मधे या विस्ताराचा जो पहिला टप्पा होता, त्यावर सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचा मोठा प्रभाव होता. मात्र, अर्थव्यवस्थेत कर्ज उपलब्धतेची प्रक्रिया सोपी करत खाजगी क्षेत्रातल्या बँकांनी दुय्यम भूमिकेतून मुख्य क्रियाशील घटकाच्या रुपात प्रवेश केल्यानंतर हे दृश्य बदलायला सुरुवात झाली. आर्थिक वर्ष २००७ मध्ये खाजगी क्षेत्रातल्या बँकांकडची २० टक्के देणी आता २०१७ मध्ये २९ टक्क्यांवर गेली आहेत. यावरुनच खाजगी क्षेत्रातल्या बँकांची वाटचाल लक्षात येते. वाढीव कर्जांमधली या बँकांनी वितरित पेलेली कर्ज लक्षात घेता ती एकूण कर्जाच्या ७५ टक्के आहेत, जी लक्षणीयरित्या मोठ्या प्रमाणात आहेत. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांवर जो दर्जाच्या बाबतीतला दोष चुकीच्या प्रमाणात ठेवला जातो, त्यामुळे वर दिलेली आकडेवारी पक्षपात करणारी आहे, असा आरोप करुन कुणीही वाद घालू शकेल. हा आरोप बाजूला ठेवला तर, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या तुलनेत खाजगी क्षेत्रातल्या बँकांनी २०१० पासून कर्जवितरणात केलेली प्रगती बघता त्यांचा एकूण कर्जबाजारातला वाटा मोठा आहे, हे दिसून येते. ग्राहकांच्या नवनव्या गरजा पुरवण्यासाठी खाजगी बँकांनी चपळाईने विविध नवीन सेवांच्या पुरवठ्याला सुरुवात केली. यामुळेच खाजगी बँकांची वाढ जलदगतीने झाली हे सत्य नाकारता येणार नाही. ग्राहकांना उत्तम दर्जाच्या सेवेचा अनुभव मिळवून देण्यावर लक्ष केंद्रीत केल्यामुळे खाजगी क्षेत्रातल्या बँका स्वतचे वेगळे स्थान निर्माण करु शकल्या आहेत. कर्ज वितरणासोबतच खाजगी बँकांच्या मुदत ठेवींमधला मोठा वाटा बघता हे सत्य अधोरेखित होते. एकूण मुदत ठेवींमधला खाजगी बँकांचा वाटा आर्थिक वर्ष २००७ मधे २० टक्के होता तो वाढून २०१७ मधे २४ टक्के झाला आहे.

**तुलनात्मकरित्या नव्या व्यावसायिक वातावरणानं खाजगी बँकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने नवनवीन कल्पना राबवायला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे त्यांची बँकिंग क्षमता वाढली. ग्राहकांना अधिक चांगल्या दर्जाच्या सेवा पुरवण्याबरोबरच उत्पन्न वाढवण्यासाठीही याचा चांगला उपयोग झाला. नवीन तंत्रज्ञानाच्या स्वीकाराचे उत्तम उदाहरण पॉईट ऑफ सेल (पीओएस) मशीनच्या स्वरुपात बघायला मिळाले.**

खाजगी क्षेत्रातल्या बँकांचा वित्त बाजारातला सहभाग गेल्या १० वर्षात उल्लेखनीयरित्या वाढण्यासाठी मुख्यत दोन प्रकारचे घटक कारणीभूत ठरले आहेत.

**'कालखंड'** :

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी मुख्यत औद्योगिक तसेच पायाभूत सुविधा क्षेत्राला वित्तपुरवठा केल्यामुळे त्यांचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर सामान्य वर्गात पसरु शकला नाही. याउलट खाजगी बँकांनी २००० सालापासून मोठ्या प्रमाणावर शाखांच्या जाळ्याचा विस्तार केला. त्यामुळे उदारमतवादी धोरणाच्या या कालखंडात खाजगी बँकांनी समोर येणारी प्रत्येक लहान-मोठी व्यवसाय संधी मिळवण्याचा प्रयत्न केला. तुलनात्मकरित्या नव्या व्यावसायिक वातावरणानं खाजगी बँकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने नवनवीन कल्पना राबवायला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे त्यांची बँकिंग क्षमता वाढली. ग्राहकांना अधिक चांगल्या दर्जाच्या सेवा पुरवण्याबरोबरच उत्पन्न वाढवण्यासाठीही याचा चांगला उपयोग झाला. नवीन तंत्रज्ञानाच्या स्वीकाराचे उत्तम उदाहरण पॉईट ऑफ सेल (पीओएस) मशीनच्या स्वरुपात बघायला मिळाले.

सन २०१२ मध्ये एकूण कर्जाच्या फक्त १२ टक्के वाटा असूनही खाजगी बँकांनी जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी पीओएस मशीन बसवायला सुरुवात केली. हे मशीन बसवणाऱ्यांमधे २०१२ साली खाजगी बँकांचा ८० टक्के वाटा होता. त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी जलदगतीने प्रगती केली, तरीही अजून खाजगी बँकांचा वाटा ५७ टक्के आहे. महसूल उत्पादनासाठी देखिल हा एक स्थिर स्त्रोत आहे,

**आजच्या घडीला बहुतांश खाजगी बँका योग्य क्षमतेचा वापर व्यवसायासाठी करुन घेण्यात लवचिकता दाखवतात. त्यासोबतच या सक्षम उमेदवारांना योग्य मेहेनताना देऊन त्यांना आपल्याकडे कायम ठेवून घेण्यासाठीची त्यांची धोरणे देखिल आकर्षक वाटतील अशीच ठरवलेली असतात. त्यासोबतच तणावाची परिस्थिती ओळखून त्यावर उपाययोजना करणे किंवा बचावासाठीची पावले उचलण्यासाठी तातडीने निर्णय घेण्यात देखिल खाजगी बँका चपळाईने काम करतात.**

असे दिसून येत आहे. या विविध गोष्टींबरोबरच हे लक्षात घ्यायला हवे की खाजगी बँकांना इतर उत्पन्न स्त्रोतांमधून मिळत असलेले उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या २० टक्के आहेत तर, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे हे उत्पन्न १४ टक्केच आहे.

**'उत्पादकता' :**

बँकांच्या खर्च आणि उत्पन्नाचे गुणोत्तर सीआय रेशो (कामगारांवर होणारा खर्च इतर कार्यान्वियनाचे खर्च) / (शुद्ध व्याजातून मिळणारे उत्पन्न इतर स्त्रोतांमधून मिळणारे उत्पन्न) जर नीट बघितले तर, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या बँकांमधे मोठी तफावत दिसून येते. खाजगी बँकांचा सीआय रेशो वर्ष २०१२ मध्ये ४७ टक्के होता, तो घसरत जाऊन २०१७ मधे ४३ टक्के झालेला दिसून येत आहे. तर याच काळात सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचा सीआय रेशो ४४ टक्क्यांपासून वाढून ४९ टक्के झालेला दिसत आहे. एकूण खर्च नियंत्रणात ठेवणे हा कोणत्याही व्यवसायासाठी मोठा स्पर्धात्मक फायदा असतो, कारण त्यातून दोन विविध पातळ्यांवर फायदे होतात- सध्याच्या भागधारकांना पुरेसा फायदा मिळवून देता येतो आणि भविष्यातल्या विस्तारासाठी जास्त भांडवल उभारणीच्या संधी मिळतात.

**'लवचिकता' :**

आजच्या घडीला बहुतांश खाजगी बँका योग्य क्षमतेचा वापर व्यवसायासाठी करुन घेण्यात लवचिकता दाखवतात. त्यासोबतच या सक्षम उमेदवारांना योग्य मेहेनताना देऊन त्यांना आपल्याकडे कायम ठेवून घेण्यासाठीची त्यांची धोरणे देखिल आकर्षक वाटतील अशीच ठरवलेली असतात. त्यासोबतच तणावाची परिस्थिती ओळखून त्यावर उपाययोजना करणे किंवा बचावासाठीची पावले उचलण्यासाठी तातडीने निर्णय घेण्यात देखिल खाजगी बँका चपळाईने काम करतात. रिझर्व्ह बँकेच्या मालमत्ता दर्जा आढाव्यानंतर हे धोरण खाजगी बँकांसाठी उत्तम ठरलंय हे सिद्ध झाले आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांवर याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला दिसून येत आहे.

**''सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या व्यवसायामधे पुन्हा जोम, उत्साह आणण्यासाठी करण्यात येणाऱ्या नवीन सुधारणा''**

गेल्या दशकापासून सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका ह्या खाजगी क्षेत्रातल्या बँकांपेक्षा सातत्याने पिछाडीवर असताना सरकारने हाती घेतलेल्या काही रचनात्मक सुधारणांमुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांना त्यांची स्थिती अधिक मजबूत करण्यासाठी मोठी मदत झाली आहे.

✯बँकेच्या मंडळ कार्यालयाची उभारणी, अध्यक्ष-नि-व्यवस्थापकीय संचालकाचे पद विभागून अकार्यकारी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अशी दोन पदे निर्माण करणे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा कार्यकाळ वाढविणे (५ वर्ष) अशा उपाययोजनांमुळे येत्या काळात सार्वजनिक क्षेत्रातल्या

बँकांची कार्यक्षमता वाढेल, अशी अपेक्षा आहे.

✯सीआरआयएलसी (मोठ्या कर्जांची माहिती देणारे केंद्रीय भांडार) ची निर्मिती, आयबीसी (नादारी आणि दिवाळखोरी विषयक कायदा)ची अंमलबजावणी यांच्यामुळे माहितीचे आदान-प्रदान आणि बँकेच्या समस्याग्रस्त मालमत्तेविषयीचे निर्णय यांसाठी संस्थात्मक चौकट मिळाली आहे. याच्यामुळे बँकांच्या बॅलन्सशीटमधे सध्या अडकून पडलेला निधी मोकळा होईल आणि जास्तीत जास्त प्रमाणावर कर्ज वितरणाची बँकांची भूक भागेल.

✯सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांसाठी सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या २.११ लाख कोटी किंमतीच्या 'मोठ्या प्रमाणावर पुनर्भांडवलीकरण योजना' महत्त्वाची भूमिका निभावू शकते. ही योजना सरकारने अत्यंत योग्य वेळी आणली आहे. या योजनेमुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका Basel III च्या नियामक अटी पूर्ण करु शकतीलच पण त्याचबरोबर चांगली कामगिरी करणाऱ्या बँकांना त्यांच्या विस्तार नि वाढीसाठीचे भांडवल उपलब्ध होण्यासाठी देखिल ही योजना उपयोगी ठरु शकेल. माझ्या मते सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांमधे निकोप स्पर्धा निर्माण करण्यासाठी हा अत्यंत सक्षम मार्ग आहे. बँकांमधली अशी स्पर्धा शेवटी संपूर्ण अर्थव्यवस्थेला उपकारकच ठरेल.

**भविष्यातल्या आधुनिक जगातल्या बँकिंग व्यवहारांसाठी सध्या बँका तयार आहेत का?**

सन २०२५ पर्यंत जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरु आहे. अशा वेळी चार महत्त्वाचे मुद्दे भविष्यातल्या बँकिंग व्यवसायाचे कळीचे मुद्दे ठरणार आहेत.

१) विकास : यात सरकारच्या सर्वसमावेशक आर्थिक धोरणाचा आणि इतर विभागवार तसेच संरचनात्मक सुधारणांचा अंतर्भाव होतो.

२) निर्बंधांचे शिथिलीकरण : आर्थिक व्यवहारांमधे मध्यस्थाची भूमिका निभावताना जे निर्बंध किंवा ज्या अटी वा नियम पाळावे लागतात, त्याबाबतच्या धोरणांमधे सुधारणा आणि बचतीसाठीच्या नैसर्गिक प्रेरणांचा विचार.

३) लोकसंख्याशास्त्र : आर्थिक व्यवहारांवर किंवा बाजारांवर होणारा वयाने लहान आणि संगणकीय व्यवहारांचे पूर्ण ज्ञान असलेल्या तरुण वर्गाचा परिणाम

४) व्यत्ययांचे निराकरण : बँकिंग, दळणवळण आणि आर्थिक व्यवहारांचे एकत्रिकरण, तसेच त्यातले अनावश्यक व्यत्यय दूर करुन त्याचे संगणकीकरण.

वरील चार मुद्यांवर विचार केल्यानंतर, येत्या काळात भारतातल्या बँकिंग क्षेत्राचा प्रसार खालील सात पद्धातींवर आधारलेला असेल.

१) 'तंत्रज्ञानामुळे आपल्या बँकिंग व्यवहाराचे स्वरुप पूर्णपणे बदललेले असेल'

भविष्यात बँकिंगच्या पद्धतीची रुपरेषा तंत्रज्ञानाद्वारे निश्चित होईल. यात महा-माहिती, क्लाऊड कम्प्युटिंग, स्मार्ट फोन आणि इतर नवनवीन गोष्टींचा सहभाग असेल. ग्राहकांनी बँकेशी व्यवहार करायची यंत्रणा 'अनेक मार्गी' नव्हे तर, 'शक्य ते सर्व मार्ग उपलब्ध करुन देणारी' झालेली असेल.

**उदाहरणार्थ** : बँका ग्राहकांना देऊ करत असलेल्या व्यक्तिविशिष्ट सोयी सुविधांची माहिती त्यांच्या मोबाईल फोनद्वारे प्रत्येकापर्यंत पोहोचविणे, व्यक्तिगत संपर्कासाठी घरबसल्या बँकेच्या अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संभाषणाचा मार्ग वापरणे, बँकेच्या नवीन योजनांमधे ग्राहकांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येकाशी बोलताना फेस-डिटेक्शन तंत्रज्ञानाचा वापर करणे. येत्या काळात बँकेच्या व्यवहारांमधे वापरली जाणारी ही तंत्रज्ञानाची उदाहरणे आहेत.

तसेच भविष्यात मोबाईल द्वारे बँकिंग, पैसे चुकते करणे आणि वाणिज्यविषयक आर्थिक व्यवहार होतील, हे वेगळे सांगायला नकोच. भारतात होणारा मोबाईलचा प्रचंड प्रमाणातला वापर लक्षात घेता. या तंत्रज्ञानाचा वापर करुन मोबाईलद्वारे आर्थिक सेवा देण्याला प्रचंड वाव आहे. देशात ९४.६ कोटी

मोबाईलधारक आहेत, पण त्यापैकी फक्त ५ कोटी लोक मोबाईलद्वारे बँकिंगची सुविधा वापरतात. त्यादृष्टीने विचार केला, तर जेएएम त्रिकूट (म्हणजे जन धन, योजन, आधार, मोबाईल) वापरुन देशातल्या बँकिंग व्यवहारांचा चेहरा बदलायला भरपूर वाव आहे.

---

**नोटाबंदीच्या अंमलबजावणीनंतर आणि रोख रक्कम विरहित अर्थव्यवस्थेसाठी सरकारने जोरदार प्रयत्न सुरु केल्यामुळे रोख रक्कम विरहित बँकिंगमुळे व्यवहारांच्या सुलभतेत नवी क्रांती होईल. हे सर्व इंटरनेटच्या सर्वदूर पोहोचण्यामुळे शक्य होईल. (डिसेंबर २०१५ मधे ४० कोटी नागरिक इंटरनेटचा वापर करत होते) २०१४ मधे स्मार्ट फोन वापरणाऱ्यांची संख्या ८ कोटी झाली होती. त्यामुळे मोबाईल फोन हा व्यक्तिगत बँक शाखेसारखे काम करु शकतो.**

---

२)तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बँकांचा काही प्रमाणात 'सर्जनशील कारणांसाठी नाश' सुद्धा होईल.

ग्राहकांना जास्तीत जास्त चांगल्या दर्जाची आणि कमी खर्चाची सेवा देण्यासाठी उत्तम स्पर्धेच्या दृष्टीने व्यवहारांमधे नावीन्यपूर्ण कल्पना राबवायला हव्या. बँकांचा दर्जा मोजण्यासाठी काही यंत्रणा असायला हवी, तसेच बँकांनीही ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठीचे मार्ग शोधून काढायला हवे. सहकारी तत्वावर भागीदारीत पायाभूत सुविधांचा वापर, तसेच ग्राहकांची ओळख निश्चित करणे, चुकीच्या, फसवणुकीच्या व्यवहारांना अटकाव करणे, देण्या-घेण्याच्या व्यवहारांची पूर्तता, पायाभूत सुविधांबाबत विचार करणे, ग्राहकाच्या ओळख निश्चितीसाठीच्या प्रक्रिया पूर्ण करणे या सर्व गोष्टी करण्याचे काम तंत्रज्ञानविषयक सेवा देणाऱ्या कंपनीकडे सुपूर्द करणे यासारख्या उपायांनी बँकिंग क्षेत्राला नव्या उंचीवर पोहोचणे शक्य होईल.

३)रोख रक्कम विरहित आणि शाखाविरहित बँकिंग

नोटाबंदीच्या अंमलबजावणीनंतर आणि रोख रक्कम विरहित अर्थव्यवस्थेसाठी सरकारने जोरदार प्रयत्न सुरु केल्यामुळे रोख रक्कम विरहित बँकिंगमुळे व्यवहारांच्या सुलभतेत नवी क्रांती होईल. हे सर्व इंटरनेटच्या सर्वदूर पोहोचण्यामुळे शक्य होईल. (डिसेंबर २०१५ मधे ४० कोटी नागरिक इंटरनेटचा वापर करत होते) २०१४ मधे स्मार्ट फोन वापरणाऱ्यांची संख्या ८ कोटी झाली होती. त्यामुळे मोबाईल फोन हा व्यक्तिगत बँक शाखेसारखे काम करु शकतो. मॉर्गन, स्टॅन्लेच्या अंदाजानुसार, भारतातला इंटरनेटद्वारे व्यवहारांचा बाजार २०१३ मधे ११ बिलियन अमेरिकन डॉलर्सचा होता, जो २०२० मधे १३७ बिलियन अमेरिकन डॉलर्स होईल. यावरुनच, मोबाईल किंवा इंटरनेट बँकिंगसाठी भविष्यात किती मोठ्या प्रमाणावर संधी आहे हे दिसून येते. लवकरच बँकिंग व्यवसाय ९ ते ५ च्या ठराविक चाकोरीबद्ध साच्यातून बाहेर पडून जागतिक स्तरावर चोवीस तास अखंडीत सुरु असणारा व्यवसाय होऊ शकेल.

शाखारहित बँकिंगमुळे महसूल उत्पादनासाठी खर्च कमी होईल आणि खर्च व्यवस्थापनाचे लक्ष्यही गाठता येऊ शकेल. विकसित देशांमधे शाखारहित बँकिंगकडे नागरिकांचा कल इतका वाढतोय की, त्यामुळे पारंपरिक शाखा बंद कराव्या लागत आहेत. (गेल्या पाच वर्षात बँक ऑफ अमेरिका या बँकेच्या १००० शाखा बंद झाल्या.) शाखाविरहित बँकेची कल्पना जर अजून सशक्तपणे राबवायची असेल, तर बँकिंग व्यवसाय हा आधार सारख्या राष्ट्रीय पातळीवर उपलब्ध मंचाशी जोडला जायला हवा. आधारशी जोडणीमुळे बँकांना ग्राहक मिळवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या अवाढव्य खर्चातून त्यांची सुटका होईल.

४)'एटीएम वापरातल्या नावीन्यपूर्ण कल्पना'

जागतिक बँकेने वर्तवलेल्या अंदाजानुसार भारतीय बँकांचा एखाद्या व्यवहारासाठी होणारा खर्च ४८ रुपये प्रति शाखा आहे. याच व्यवहारासाठी फोन बँकिंग वापरले तर २५ रुपये, एटीएम वापरले तर १८ रुपये, इंटरअॅक्टीव्ह व्हॉईस रिस्पॉन्ससाठी ८ रुपये, तर ऑनलाईन व्यवहारासाठी ४ रुपये खर्च येतो. भारतात एटीएमचा जास्त प्रमाणात प्रसार झालेला नाही. भारतात दर दहा लाख लोकांमागे फक्त ११ एटीएम आहे. त्या तुलनेत

तेव्हढ्याच लोकांसाठी चीनमध्ये ३७ एटीएम आहेत, तर मलेशियात ५२ एटीएम आहेत. यात सौरऊर्जेवर चालणाऱ्या एटीएम मशीनचा वापर केला, तर मशीन उभारणीचा खर्च जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी होईलच. त्याशिवाय वीजेचा तुटवडा असणाऱ्या ग्रामीण भागात एटीएम चालवण्यासाठी विजेवर अवलंबून रहावे लागणार नाही.

५) 'पायाभूत सुविधा उभारण्यासाठी अर्थसहाय्य - पायाभरणीपासून सुरुवात'

जागतिक पातळीवरच्या पायाभूत सुविधांचा विचार करता भारताचा त्यातला वाटा सुमारे ५ टक्के आहे, जो २०२५ सालापर्यंत ९-१० टक्के होईल, असा अंदाज आहे. नवीन युगातल्या विकासाच्या मॉडेलचा विचार ५:२५ या प्रमाणावर आधारलेला आहे आणि त्यात खाजगी-सार्वजनिक भागिदारीतून मोठ्या कालावधीसाठी निधी उभारण्याची कल्पना राबवलेली असणार आहे. त्याबरोबरच पायाभूत सुविधांसाठी डेब्ट फंड, पर्यावरणाशी सुसंगत बँकिंग, व्यावहारिक गोष्टींसाठीचा निधी यांसाठी नवीन व्यवस्था करता येईल.

६) 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी उपयोगी पडतील असे बँकिंगचे मॉडेल'

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ८ टक्के इतका वाटा आहे. 'एसआयडीबीआय' या वित्त संस्थेने सांगितल्यानुसार या क्षेत्राची एकूण कर्जाची मागणी ६५ अब्ज अमेरिकन डालर्सची आहे. समूह आधारीत वित्तसहाय्य, तंत्रज्ञान आधुनिकीकरणासाठी निधीच्या अनुदानाचे धोरण, मुद्रा बँक, कर्ज हमी योजना, साठवण योजना आणि स्टार्ट-अप साठीच्या सोयी यासारख्या नवीन संरचनांची येत्या काही वर्षात महत्त्वाची भूमिका असणार आहे.

---

**भारतात एटीएमचा जास्त प्रमाणात प्रसार झालेला नाही. भारतात दर दहा लाख लोकांमागे फक्त ११ एटीएम आहे. त्या तुलनेत तेव्हढ्याच लोकांसाठी चीनमध्ये ३७ एटीएम आहेत, तर मलेशियात ५२ एटीएम आहेत. यात सौरऊर्जेवर चालणाऱ्या एटीएम मशीनचा वापर केला, तर मशीन उभारणीचा खर्च जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी होईलच. त्याशिवाय वीजेचा तुटवडा असणाऱ्या ग्रामीण भागात एटीएम चालवण्यासाठी विजेवर अवलंबून रहावे लागणार नाही.**

---

७) 'स्पर्धा आणि एकत्रिकरणातून ध्येय साध्य'

नव्या युगातल्या आधुनिक बँकिंग पद्धतींच्या प्रवेशामुळे भविष्यात भारताच्या बँकिंग क्षेत्राला परिवर्तनाला सामोरे जावे लागणार आहे. नावीन्यपूर्ण कल्पना राबवणे, निकोप स्पर्धेच्या वातावरणाची निर्मिती आणि व्यवसायात टिकून राहण्याच्या गरजेतून सामूहिक ध्येय साध्य होणार आहे. येत्या १५ ते २० वर्षात वेगळे उल्लेखनीय सत्य म्हणून काही नावीन्यपूर्ण विचार बँकिंग क्षेत्रात आलेले असतील, त्यापैकी काही खाली दिले आहेत :

✯ खाते क्रमांकाची पोर्टेबिलिटी (मोबाईल नंबर पोर्टेबिलिटीच्या धर्तीवर)

✯ मोठ्या प्रमाणावर माहितीची विश्लेषणाचा कार्यक्षम वापर.

✯ किरकोळ कर्जांची सुरक्षितता

**निष्कर्ष :**

बँकिंग क्षेत्रातल्या या नव्या बदलांना स्वीकारून त्याप्रमाणे काम करणाऱ्या सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातल्या बँका जास्त चांगल्या प्रकारे व्यवसाय करतील आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा तसेच बिगर-बँकिंग अर्थसहाय्य कंपन्यांपेक्षा या बँकांना प्रचंड प्रमाणात व्यवसायाच्या संधी प्राप्त होतील. या बदलांना सकारात्मकपणे स्वीकारुन व्यवसाय करणाऱ्या भारतीय बँका जागतिक पातळीवर स्वतचे स्थान निर्माण करु शकतील. एवढेच नाही तर त्यामुळे येत्या पाच वर्षांत जगातल्या सर्वोत्कृष्ट अशा पहिल्या चार अर्थ व्यवसायांमधे स्थान मिळवण्याचा मान भारतीय अर्थव्यवस्थेला मिळवता येईल.

■■■

*लेखक त्रयी येस बँकचे वरिष्ठ पदाधिकारी असून बँकिग क्षेत्रातील तज्ञ आहेत.*

*email:vivek.kumar@yesbank.in.*
*sanka.tandon@yesbank.in.*
*shubhada.rao@yesbank.in.*

विश्लेषण

# बँकिंग क्षेत्रातील सुधारणा : एक ऐतिहासिक दृष्टीकोन

-अतिषा कुमार




**बँकांच्या भांडवलीकरणाचा आकार, लवचिकपणा आणि त्याचा स्तर वित्तीय बाजारपेठा सुरळीत चालण्यासाठी अतिशय निर्णायक आहे. सार्वजनिकरित्या नियंत्रित बँकांचे उच्च प्रमाण हे भारताच्या बँकिंग क्षेत्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. वित्तीय सखोलता कमी असणे, बुडीत कर्जाचा मोठा वाटा आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले केंद्रीकरण ही बँकिंग व्यवस्थेपुढील प्रमुख आव्हाने आहेत.**

भारतात कंपन्या आणि घरगुती या दोन्हीसाठीही बँकिंग व्यवस्था हा कर्ज मिळवण्याचा अत्यंत महत्वाचा स्त्रोत आहे. बँकांच्या भांडवलीकरणाचा आकार, लवचिकपणा आणि त्याचा स्तर वित्तीय बाजारपेठा सुरळीत चालण्यासाठी अतिशय निर्णायक आहे. सार्वजनिकरित्या नियंत्रित बँकांचे उच्च प्रमाण हे भारताच्या बँकिंग क्षेत्राचे वैशिष्ट्य राहिले आहे. वित्तीय सखोलता कमी असणे, बुडीत कर्जाचा मोठा वाटा आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले केंद्रीकरण ही बँकिंग व्यवस्थेपुढील प्रमुख आव्हाने आहेत. हे मुद्दे औद्योगिक कर्जपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय भांडवली गरज भागवण्याच्या बँकांच्या क्षमतेवर मर्यादा आणतात. या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी सध्याचे उपाय पुरेसे नाहीत. पुढे वाटचाल करत असताना आपल्याला बँकिंग क्षेत्राला उत्तेजन देण्याकरता तीन क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. : बँकांचे प्रशासन सुधारणे, बँकिंग क्षेत्रात स्पर्धा वाढवणे आणि बँकांवर कर्ज देण्याचा स्त्रोत म्हणून असलेला दबाव कमी करण्यासाठी कंपनी रोखे बाजारपेठेचा विकास करणे ही ती क्षेत्रे आहेत.

**भारतातल्या बँक सुधारणांचा इतिहास**

१९९१ च्या आधी, भारतात बँकिंग क्षेत्रातल्या मोठ्या भागाचे राष्ट्रीयीकरण केले जात असे. १९६९ मध्ये, सरकारने ५० कोटीहून अधिक ठेवी असलेल्या बँका राष्ट्रीयीकृत केल्या. ८० टक्क्यांहून अधिक बँक शाखांवर सरकारचे नियंत्रण होते. १९८० मध्ये, सरकारने अतिरिक्त म्हणजे देशभरात २०० कोटी रुपयांहून अधिक ठेवी असलेल्या बँकाही आपल्या नियंत्रणात आणल्या. ९० टक्क्यांपेक्षा अधिक बँका सरकारच्या नियंत्रणाखाली होत्या आणि या कालावधीत हे प्रमाण चांगल्या रीतीने स्थिर होते. १९६९ ते १९९१ या कालावधीत, भौगोलिक प्रवेश, व्याप्तीची घनता आणि बँक शाखांची संख्या यात लक्षणीय वाढ झाली. मोठ्या प्रमाणावर ठेवी आणि कर्जपुरवठ्यात वाढ याच्या बँका

साक्षीदार राहिल्या. प्राधान्य क्षेत्रातला कर्जपुरवठा १४ टक्क्यांवरून ४१ टक्क्यापर्यंत वाढला.

मात्र, १९९१ पर्यंत, बँकांची कार्यक्षमता आणि उत्पादकतेमध्ये घसरण सुरु झाली, ग्राहक सेवेचा दर्जा अतिशय सुमार होता आणि नफा मिळवण्याची क्षमता खूपच कमी झाली होती. १९९१ मध्ये, सरकारने जेव्हा अर्थव्यवस्थेचे उदारीकरण केले, तेव्हा अनेक बँकिंग सुधारणाही हाती घेतल्या. श्री. एम. नरसिम्हम यांच्या अध्यक्षतेखालील वित्तीय पद्धतीवरील समितीने १९९१ मध्ये, वैधानिक तरलता प्रमाण (Statutory Liquidity Ratio) आणि रोख राखीव प्रमाण (Cash Reserve Ratio) कमी करून बँकेचे स्त्रोत मुक्त करणे, व्याज दर निश्चित करण्यासाठी बाजारपेठीय शक्तींवर भरोसा ठेवणे, स्पर्धा वाढवण्यासाठी खासगी आणि परदेशी बँकांना प्रवेश सुलभ करणे आणि सार्वजनिक बँकांची संख्या लक्षणीय रित्या कमी करणे अशा शिफारशी केल्या होत्या. एसएलआर आणि सीआरआरमध्ये कपात करणे, बाजारपेठेने निर्धारित केलेला व्याज दर ठेवणे आणि नव्या खासगी आणि परदेशी बँका सुरु करण्यासह समितीच्या अनेक शिफारशी अमलात आणल्या गेल्या.

बँकिंग क्षेत्र मजबूत करण्यासाठी १९९८ मध्ये, नरसिम्हम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या बँकिंग क्षेत्र सुधारणा समितीने आणखी उपाययोजनांची शिफारस केली. सध्याच्या उपायांबाबत झालेल्या प्रगतीचा तिने आढावा घेतला आणि नियम, पुरेसा भांडवली पुरवठा आणि बँकांचे विलीनीकरण याच्याशी संबंधित आणखी उपाय प्रस्तावित केले. याही पुढे जाऊन, १९९८ च्या समितीने तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर, कौशल्य प्रशिक्षण आणि बँकांचे व्यावसायिक

**२००० च्या दशकात, बँकिंग सुधारणांवर अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या आणि पुढील सुधारणा हळूहळू अमलात आणल्या गेल्या. वित्तीय क्षेत्र सुधारणावरील समितीने भारतातल्या व्यापक आर्थिक आणि नियामक चौकटीबाबत, आर्थिक समावेशकता आणि देशांतर्गत वित्तीय विकास विषयक शिफारशीचा समावेश केला. २०१४ मध्ये, भारतातल्या बँकांच्या प्रशासकीय मंडळांचा आढावा घेण्यासाठी (पी जे नायक समिती) समिती स्थापन करण्यात आली.**

व्यवस्थापन याबाबत पावले उचलण्याची शिफारस केली. १९९१ पासूनच यापैकी अमलात आणलेल्या अनेक शिफारशींमुळे बँकिंग क्षेत्राची कामगिरी आणि मजबुतीमध्ये चांगलीच सुधारणा झाली. उदाहरणार्थ, १९९० मध्ये जीडीपीचा वाटा म्हणून बँकिंग व्यवस्थेने केलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण ५१.५ टक्क्यावरून २००० मध्ये ५३.४ टक्क्यांवर गेले. तरीसुद्धा, अन्य देशात जीडीपी प्रमाणात कर्ज पुरवठ्याच्या ते निम्म्यापेक्षा कमी राहिले. २००० मध्ये हे प्रमाण चीनमध्ये १३३ टक्के, मलेशियामध्ये १४३ टक्के आणि थायलंडमध्ये १२२ टक्के होते.

२००० च्या दशकात, बँकिंग सुधारणांवर अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या आणि पुढील सुधारणा हळूहळू अमलात आणल्या गेल्या. वित्तीय क्षेत्र सुधारणावरील समितीने भारतातल्या व्यापक आर्थिक आणि नियामक चौकटीबाबत, आर्थिक समावेशकता आणि देशांतर्गत वित्तीय विकास विषयक शिफारशीचा समावेश केला. २०१४ मध्ये, भारतातल्या बँकांच्या प्रशासकीय मंडळांचा आढावा घेण्यासाठी (पी जे नायक समिती) समिती स्थापन करण्यात आली. भारतातल्या बँकिंग क्षेत्रात सातत्याने मोठ्या प्रमाणावर असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचा प्रशासन आणि व्यवस्थापन वाढवण्यावर या समितीच्या प्रमुख शिफारशींचा भर होता.

**चालू स्थिती : सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे वर्चस्व आणि बुडीत मालमत्ता**

आजही, भारतात बँकिंग व्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्रातल्या

बँकांचे उच्च प्रमाण हेच वैशिष्ट्य राहिले आहे. एकूण मालमत्तेच्या ७० टक्के मालमत्ता असल्याने, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची कामगिरी एकंदरीत बँकिंग व्यवस्थेच्या कामगिरीचे प्रतिनिधित्व करते. प्रचंड आणि वाढत्या प्रमाणावरील बुडीत संपत्तीत (NPAs) सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे योगदान सर्वाधिक असून मार्च २०१६ मध्ये बुडीत संपत्तीपैकी ८८ टक्के वाटा याच बँकांचा होता. दिवसेंदिवस ही परिस्थिती आणखीच खराब होत आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या एकूण बुडीत कर्जाचे प्रमाण मार्च २०१५ मध्ये २ लाख ७८ हजार कोटी रुपयांवरून जून २०१७ मध्ये ७ लाख ३३ कोटी रुपयांवर गेले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या बुडीत संपत्तीचा वाटा जवळपास १६ टक्के आहे जे खासगी बँकांच्या वाट्यापेक्षा तीन पटींनी जास्त आहे. वाढत्या बुडीत कर्जामुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून त्याचे प्रतिबिंब ढासळणाऱ्या मालमत्तेवरील परतावा (ROA) आणि भांडवलावरील परतावा (ROE) प्रमाणात उमटलेले दिसते, जे २०१६ मध्ये दशकात प्रथमच उणेमध्ये गेले.

पण खासगी बँकांनाही बुडीत कर्जाच्या उच्च प्रमाणाने पोखरले आहे. मार्च २०१६ मध्ये सर्व अनुसूचित व्यावसायिक बँकांचे बुडीत कर्ज ६.१ ट्रिलियन इतके प्रचंड होते. त्यापुढे, संपत्तीचा दर्जा आणि नफ्याची क्षमता दिवसेंदिवस खालावत गेली आहे. मार्च २००८ ते मार्च २०१७ या कालावधीत सर्व बँकांच्या एकूण कर्जापैकी बुडीत कर्जाची टक्केवारी ३.५ टक्क्यावरून १२.१ टक्क्यापर्यंत वाढली आहे. २०१६-१७ च्या

**सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या बुडीत संपत्तीचा वाटा जवळपास १६ टक्के आहे जे खासगी बँकांच्या वाट्यापेक्षा तीन पटींनी जास्त आहे. वाढत्या बुडीत कर्जामुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून त्याचे प्रतिबिंब ढासळणाऱ्या मालमत्तेवरील परतावा (ROA) आणि भांडवलावरील परतावा (ROE) प्रमाणात उमटलेले दिसते, जे २०१६ मध्ये दशकात प्रथमच उणेमध्ये गेले.**

पहिल्या सहामाहीत बँकांचे करोत्तर नफ्याचे प्रमाण प्रत्येक वर्षी मागील वर्षाच्या तुलनेत कमी होत गेले आहे. मोठ्या प्रमाणावर बुडीत कर्जासाठी कराव्या लागणाऱ्या तरतुदीत झालेली मोठी वाढ, कर्जमाफी आणि निव्वळ व्याजातून मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली घसरण यामुळे बँकांच्या नफ्यात घट झाली आहे.

बँकिंग क्षेत्रावर आलेल्या या दबावाचा परिणाम औद्योगिक कर्जात मंदी येण्यात झाला आहे. त्यांनी बँकांच्या आंतरराष्ट्रीय भांडवली गरजा भागवण्याच्या क्षमतेवर मर्यादा आणली आहे. जानेवारी २०१६ मध्ये, औद्योगिक क्षेत्राला दिलेल्या कर्जाचा ओघ ५.६ टक्क्यांवरून जानेवारी २०१७ मध्ये ५.१ टक्के इतका आटला. बॅसेल ३ निकषांतर्गत उच्च भांडवली गरजा भागवण्याच्या बँकांच्या क्षमतेमध्ये बुडीत कर्जाचे उच्च प्रमाण अडसर ठरत आहे. हे निकष जानेवारी २०१९ मध्ये अमलात येणार आहेत.

या आव्हानावर मात करण्यासाठी सरकारने निधी पुरवठा केला आहे. २०१५-१६ मध्ये इंद्रधनुष योजनेंतर्गत बँकांच्या फेरभांडवलीकरण उपायातून उच्च बुडीत कर्जे आणि अर्थव्यवस्थेवरील त्यांच्या विपरीत परिणामाची सरकारने दखल घेतली. नकारात्मक परिमाणांमध्ये बँकांच्या कर्जात आणखी झालेली घसरण, बँकांची कमी झालेली नफाक्षमता आणि भांडवली पुरवठा करण्यात होत गेलेली घट यांचा समावेश आहे. यावर मात करण्यासाठी अर्थ मंत्रालयाने ऑक्टोबर २४ या दिवशी बँकांच्या २ लाख १० हजार कोटी रुपयांची फेरभांडवलीकरण योजना जाहीर केली. या निधीमुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांना त्यांच्या किमान भांडवली गरजा तर भागवता येतीलच परंतु आपले

**फेरभांडवलीकरणाच्या पुढे जाऊन, इंद्रधनुष योजनेत संस्थात्मक प्रशासन मजबूत करण्यासाठी आवश्यक व्यापक बँकिंग सुधारणा आणि बँकिंग व्यवस्थेत प्रोत्साहन भत्ता श्रेणीबद्ध करणे यांचाही समावेश आहे. या योजनेच्या सात कलमांमध्ये जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी चौकट तयार करणे, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भूमिका वेगळ्या करणे, नियुक्ती आणि प्रशासकीय सुधारणांसाठी बँक बोर्ड ब्युरो तयार करणे यांचा समावेश आहे.**

ताळेबंद व्यवस्थित करून वाढत चाललेले बुडीत कर्ज लपवता येईल.


फेरभांडवलीकरणाच्या पुढे जाऊन, इंद्रधनुष योजनेत संस्थात्मक प्रशासन मजबूत करण्यासाठी आवश्यक व्यापक बँकिंग सुधारणा आणि बँकिंग व्यवस्थेत प्रोत्साहन भत्ता श्रेणीबद्ध करणे यांचाही समावेश आहे. या योजनेच्या सात कलमांमध्ये जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी चौकट तयार करणे, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भूमिका वेगळ्या करणे, नियुक्ती आणि प्रशासकीय सुधारणांसाठी बँक बोर्ड ब्युरो तयार करणे यांचा समावेश आहे. परंतु, अंमलबजावणी अपूर्ण राहिली आहे. आणखी पुढे, दिवाळखोरी संहिता (IBC) बुडीत कर्जाचे निवारण करण्यासाठी उपाय सुचवते. त्यात बँकांना आणि प्रवर्तकांनी २७० दिवसांच्या आत निराकरण योजना मंजूर करणे अनिवार्य आहे अन्यथा संपत्तीची दिवाळखोरी जाहीर करण्यास सामोरे जावे लागेल.

## जागतिक संदर्भ : व्याप्ती आणि स्पर्धा

वित्तीय सखोलता किंवा बँकांचा आकार या संदर्भात भारतीय बँका त्यांच्या जागतिक समकक्ष बँका, इतर वित्तीय संस्था आणि बाजारपेठा आर्थिक उत्पन्नाच्या तुलनेत कितीतरी मागे आहेत. वित्तीय सखोलता ही बँकिंग व्यवस्थेचा तुलनात्मक आकार समजण्यासाठी महत्वाची आहेच, परंतु आर्थिक विकास आणि गरीबीचे निर्मूलनात सकारात्मक रित्या संलग्नही आहे. ३ आर्थिक व्याप्तीमुळे ग्रामीण भागात गरिबीच्या निर्मूलनात योगदान दिले आहे, यावर भारतातल्या राज्य स्तरीय आकडेवारीच्या अभ्यासातून प्रकाश टाकला आहे. आकृती १ मध्ये जीडीपीचा वाटा म्हणून बँकांची संपत्ती आणि निवडक संतुलक घटक यावर प्रकाश टाकला आहे. इतर उभरत्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत, भारतात जीडीपी आणि खासगी कर्जाचा वाटा तसेच कर्ज आणि ठेवी यातील गुणोत्तर निम्न स्तरीय आहे. २०१५ मध्ये, भारतात खासगी कर्ज आणि जीडीपी यातील गुणोत्तर ५०.२ टक्के होते तर चीनमध्ये १४० टक्के आणि ब्राझीलमध्ये ७१ टक्के होते. ५ त्याचप्रमाणे, २०१५ मध्ये बँक ठेवी आणि बँक कर्ज यातील गुणोत्तर भारतात ७७ टक्के होते तर तुलनेने ब्राझीलमध्ये ते ११९ टक्के आणि चीनमध्ये ३१२ टक्के होते.

काही नव्याने प्रवेश केलेल्या बँकांसह मोठ्या बँकांचे बँकिंग व्यवस्थेवर वर्चस्व आहे. मार्च २०१६ मध्ये, सर्वोच्च १० बँकांकडे (संपत्तीनुसार क्रमवारी) एकूण संपत्तीतील ५८ टक्के संपत्ती

**आकृती १ : ठेवी धन बँकांच्या जीडीपीतील संपत्तीचा वाटा, २०१५**



होती. १९९१ पासून, केवळ १४ सार्वत्रिक बँकांना परवाने मंजूर करण्यात आले आहेत. त्या उलट, अमेरिकेत १९७६ आणि २००९ या दरम्यान वार्षिक सरासरी १३० नव्या बँकांना सनद बहाल करण्यात आली. भारतात परदेशी बँकांची संख्या लहान राहिली आहे. मार्च २०१६ नुसार, एकूण बँकांच्या संपत्तीमध्ये परदेशी बँकांची संपत्ती केवळ ६ टक्के इतकी होती.

**पुढील वाटचाल**

भविष्यात, भारताने कर्जवाटप करण्याची वाढीव क्षमता आणि साधनसंपत्तीचे उत्पादक वाटप करण्यास सुयोग्य प्रोत्साहक रचनेसह अधिक मजबूत आणि उत्तम भांडवलीकृत बँकिंग व्यवस्था आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. मजबूत बँकिंग व्यवस्था उभारण्यासाठी, फेरभांडवलीकरणाला कॉर्पोरेट प्रशासकीय सुधारणा, नव्या बँकांना प्रवेश करण्यासाठी कमी अडसर, सुधारित वित्तीय देखरेख, चैतन्यशील कॉर्पोरेट कर्ज बाजारपेठ आणि कर्ज वसुलीची कार्यक्षम यंत्रणा यासह अनेक इतर उपायांची जोड द्यावी लागेल.

तीन विशिष्ट क्षेत्रांना प्राधान्य दिले जाऊ शकेल. प्रथम विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या बाबतीत प्रशासन सुधारणा आणि संस्था मजबूत करणे हे आहे. क्रमवारीच्या संदर्भात, या सुधारणा फेरभांडवलीकरणा इतक्याच महत्वाच्या आहेत आणि त्याच्या इतक्याच तातडीने पाठपुरावा करण्याची गरज आहे. बुडीत कर्जाचा मुकाबला करण्यासाठी बँकिंग क्षेत्रात सुधारणा करण्याच्या महत्वावर जागतिक उदाहरणे प्रकाशझोत टाकतात. उदाहरणार्थ, चीनमध्ये, फेरभांडवलीकरणाशिवाय, बँकिंग क्षेत्रात सुधारणांमध्ये वित्तीय नियमन आणि देखरेख मजबूत करण्यावर,

**नव्या बँकांना प्रवेश करताना असलेले गरजांचे अडथळे आणखी कमी करून त्यांचा प्रवेश अधिक सोपा करता येईल. पूरक रचनेमुळे परदेशी बँकांना भारतीय बँकिंग क्षेत्रात प्रवेश करण्यास प्रोत्साहन तर मिळेलच, परंतु जागतिक धक्क्यांमुळे होणारा परिणाम मर्यादित करण्यास त्याची मदत होऊ शकेल. दीर्घकाळात, अधिक स्पर्धेचा फायदा कार्यक्षमता आणि नफाक्षमता वाढण्यास मदत होईल.**

कॉर्पोरेट प्रशासनात सुधारणा आणि पारदर्शकता वाढवण्यावर स्पष्टपणे भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या पूर्व आशियन वित्तीय पेचप्रसंगानंतर बँकांवरील देखरेख सुनिश्चित करण्यासाठी वित्तीय देखरेख सेवा (FSS) स्थापन केली. काही प्रमाणात, सरकारने बँकांच्या अधिक चांगल्या प्रशासनाची गरज मान्य केली आहे. बँक अधिकाऱ्यांच्या नियुक्तीवर देखरेख करण्यासाठी स्वायत्त बँक बोर्ड ब्युरो तयार करण्याची सूचना इंद्रधनुष योजनेने केली आहे. जर असे खऱ्या अर्थाने स्वायत्त बोर्ड स्थापन केले तर सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या प्रशासनावर अत्यंत चांगला परिणाम होईल. अधिक उत्तरदायित्व निश्चित केल्याने बँकांची कर्ज देण्याची व्यवस्था कर्जाच्या उत्पादक वाटपाच्या धर्तीवर आहे याची खात्री केली जाईल. याची अंमलबजावणी कालबद्ध पद्धतीने व्हावी, याची खात्री करण्याची गरज आहे.

सुधारणा करण्यास वाव असलेले दुसरे क्षेत्र म्हणजे कॉर्पोरेट रोखे बाजारपेठेचा विकास हे होय. रोखे बाजारपेठांनी बँकांसाठी महत्वाचा आर्थिक स्त्रोत म्हणून पूरक भूमिका बजावण्याची गरज आहे. तरल आणि किमतीवर जास्त परिणाम न होता ज्यात समभागांची मोठ्या प्रमाणावर खरेदी – विक्री केली जाते अशा डीप मार्केट्समुळे कंपन्यांना कमी किमतीवर कर्ज उभारणे शक्य होईल. कालांतराने, कॉर्पोरेट कर्जासाठी स्त्रोत म्हणून रोखे बाजारांचा वाटा वाढेल आणि कर्जवाटपात बँकांचा वाटा कमी होत जाईल.

बँकिंग क्षेत्रातल्या सुधारणांचे तिसरे क्षेत्र बँकिंग क्षेत्र अधिक स्पर्धात्मक बनवण्याचे काम सतत सुरु ठेवणे हे आहे. अधिक स्पर्धा

आणि संशोधन यांना खतपाणी घालण्यासाठी भारताने खासगी आणि परदेशी बँकांना प्रवेश करण्यास उत्तेजन देणे सुरु ठेवले पाहिजे. नवीन 'ऑन टॅप' धोरण हे या दिशेने उचललेले सकारात्मक पाऊल आहे. तरीसुद्धा, नव्या बँकांना प्रवेश करताना असलेले गरजांचे अडथळे आणखी कमी करून त्यांचा प्रवेश अधिक सोपा करता येईल. पूरक रचनेमुळे परदेशी बँकांना भारतीय बँकिंग क्षेत्रात प्रवेश करण्यास प्रोत्साहन तर मिळेलच, परंतु जागतिक धक्क्यांमुळे होणारा परिणाम मर्यादित करण्यास त्याची मदत होऊ शकेल. दीर्घकाळात, अधिक स्पर्धेचा फायदा कार्यक्षमता आणि नफाक्षमता वाढण्यास मदत होईल.

ऐतिहासिक दृष्ट्या, भारतातल्या बँकिंग क्षेत्राच्या विशेषत: ९० च्या दशकातल्या सुधारणांचा भर स्पर्धा वाढवणे, प्रशासन मजबूत करणे आणि नियमनावर राहिला आहे. भविष्यातल्या सुधारणा याच आधारावर केल्या पाहिजेत आणि पूर्वीच्या अनुभवातून धडे शिकले पाहिजेत.

■■■

*लेखका निती आयोगामध्ये अर्थतज्ञ पदावर कार्यरत असून त्यांनी जागतिक बँकेसाठीही काम केले आहे.*

*email :atisha.kumar@nic.in*



# ग्रामीण बँकव्यवस्थेपुढील समस्या आणि आव्हाने

**मंजुला वधवा**



**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून, धोरणकर्त्यांनी ग्रामीण भागाचा उत्कर्ष होण्यावर मुख्य भर दिला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या ७० वर्षांत,सुरुवातीला सहकारी पत रचनेपासून सुरुवात करण्यात आली.त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.त्यानंतर १९७६मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँका सुरु करण्यात आल्या. अशा प्रकारे, औपचारिक ग्रामीण संस्थात्मक रचनेचा अनेक पटीने वाढ आणि विस्तार झाला.**

राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणायचे, 'खरा भारत ग्रामीण भागातच राहतो'. म्हणूनच देशाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास होणे आवश्यक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून, धोरणकर्त्यांनी ग्रामीण भागाचा उत्कर्ष होण्यावर मुख्य भर दिला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या ७० वर्षांत, सुरुवातीला सहकारी पत रचनेपासून सुरुवात करण्यात आली.त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतर १९७६मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँका सुरु करण्यात आल्या. अशा प्रकारे, औपचारिक ग्रामीण संस्थात्मक रचनेचा अनेक पटीने वाढ आणि विस्तार झाला. दुर्दैवाने, इतके सारे विस्तार कार्यक्रम हाती घेऊनसुद्धा ग्रामीण लोकसंख्येचा बराच मोठा भाग आर्थिक प्रक्रियेत सामावू शकला नाही. अजूनही तो सावकारी पाशात अडकलेला आहे,आणि अर्थातच ही चिंतेची बाब आहे.

जागतिक संदर्भात विचार केल्यास, बँक व्यवहार करत नसलेले २४% प्रौढ हे भारतात राहतात. दक्षिण आशियाचा विचार करता हे प्रमाण दोन तृतियांश इतके आहे. बँकेचे व्यवहार करण्याची क्षमता असलेल्या सुमारे ३१कोटी ग्रामीण भारतीयांना औपचारिक बँकिंग सेवा उपलब्ध नाही.राज्यस्तरीय बँकर्स समिती च्या ३० जून,२०१६ रोजी सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार, भारतातील एकंदर सहा लाख खेडेगावांपैकी चार लाख ५२हजार १५१ गावांमध्ये बँकेच्या सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. यामध्ये१४ हजार,९७६ बँक शाखांमार्फत,चार लाख, १६हजार ६३६ व्यवसाय प्रतिनिधींमार्फत आणि वीस हजार, ५३९ इतर मार्गांनी म्हणजे एटीएम, मोबाइल व्हॅन या मार्गांनी बँकेच्या सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांची फारशी समाधानकारक नसलेली परिस्थिती उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील विद्युतीकरणाचे वास्तव यांचाही आर्थिक सेवांच्या उपलब्धतेवर परिणाम होतो.

देशातील ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण सरासरी ७१% आहे.

त्यांच्यापैकी एखाद्याचे जर बँकेत एखादे काम असेल तर त्यासाठी त्याला बँकेत जावे लागते .तिची कामकाजाची वेळ असते सकाळी १० ते संध्याकाळी ५. हे काम करण्यासाठी त्याला त्या दिवसाचे वेतन बुडवावे लागण्याची शक्यता असते.कारण बँकेची शाखा काही त्याच्या कामाच्या ठिकाणाजवळ नसते.त्यासाठी त्याला प्रवास करून जावे लागते.या अडचणी लक्षात घेऊन बँका, पत पुरवठा आणि बचत खात्यांच्या कामात सुधारणा घडवून आणून या सेवा ग्राहकाला त्वरित आणि सहजी उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रयत्न करीत आहेत.यासाठी त्या स्वयंसेवी संस्था, स्वयंसहायता गट(बचत गट),सूक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था,तसेच बँकेचे प्रतिनिधी किंवा व्यवसाय प्रतिनिधी यांच्यासारख्या अर्ध औपचारिक वितरण माध्यमांचा मध्यस्थ म्हणून वापर करतात.असे असले तरी ही सर्व माध्यमे सध्याच्या त्यांच्या स्वरुपात मर्यादित स्वरूपातच सेवा देऊ शकतात आणि साहजिकच त्यामुळे या पद्धतींमध्ये काही उणीवा राहून जातात.

याशिवाय,आणखी एक मुद्दा म्हणजे अनेक बँका ग्रामीण बाजारपेठेकडे आर्थिक संधी म्हणून न बघता एक कायदेशीर(नियामक) गरज म्हणून बघतात.उघड-उघड याची अनेक कारणे दिसतात.ती म्हणजे ग्रामीण घरांमध्ये उत्पन्न आणि खर्चाच्या पद्धती या दोन्हीमध्ये अनियमितता असल्यामुळे बरीचशी कुटुंबे कर्जाची मुख्य रक्कम तर राहू देतच पण व्याजही भरू शकत नाहीत,असा बँकांचा अनुभव आहे. या सगळ्याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था ही पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे.तसेच कर्जमाफीही बऱ्याचदा राजकीय हेतूने प्रेरित असते.त्यामुळे बँकांच्या अडचणीत आणखी भर पडते. लहान गावांमध्ये सर्वसाधारणपणे ठेवींबाबतचे व्यवहार किंवा पत व्यवहार याचे प्रत्येक खातेदारनिहाय प्रमाण कमी असते.त्यामुळे प्रत्येक शाखेमध्ये किंवा माध्यमामध्ये बँकेला अधिक ग्राहकांची जरुरी भासते.ग्रामीण भागातील बरेच लोक साक्षर नसल्याने ते तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या एटीएम,फोन बँकिंग,इंटरनेट बँकिंग यांसारख्या सुविधांचा सहजपणे वापर करू शकत नाहीत.त्यांना बहुतेक व्यवहारांसाठी बँकेच्या शाखांवरच अवलंबून राहावे लागते परिणामी बँकांवर याचा आर्थिक भार पडतो. ग्रामीण भागात उत्पन्नाचे स्रोत हे अतिशय अनियमित आणि अस्थिर असल्याने तसेच वैद्यकीय आणि सामाजिक कारणांसाठी अचानकपणे उदभवणारे खर्चाचे प्रमाणही जास्त असल्याने कर्ज देताना,बँकांना मोठा धोका पत्करावा लागतो. बँकांनी उत्पादन खर्च वसूल होण्याइतपत किंवा निकडीच्या काही कारणांसाठी प्राथमिक बचत सेवा किंवा सूक्ष्म कर्ज द्यावीत अशी गरीब गटांची अपेक्षा असते.त्याच वेळी शेतकरी आणि शेतकरी संस्था यांच्या आर्थिक गरजा मोठया असतात.त्यांना उत्पादन, गुंतवणूक,प्रक्रिया आणि बाजारपेठेत विक्री या सर्व कारणांसाठी तसेच उत्पादनाशी निगडीत असलेल्या जोखमींचे निराकरण करण्यासाठी मोठया रकमेची कर्जे हवी असतात. जोखमीच्या कारणांमध्ये जीवित किंवा मालमत्तेची हानी झाल्यास विम्याची तरतूद असावी अशी अपेक्षा असते.

**ग्रामीण भागातील बरेच लोक साक्षर नसल्याने ते तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या एटीएम,फोन बँकिंग,इंटरनेट बँकिंग यांसारख्या सुविधांचा सहजपणे वापर करू शकत नाहीत.त्यांना बहुतेक व्यवहारांसाठी बँकेच्या शाखांवरच अवलंबून राहावे लागते परिणामी बँकांवर याचा आर्थिक भार पडतो.ग्रामीण भागात उत्पन्नाचे स्रोत हे अतिशय अनियमित आणि अस्थिर असल्याने तसेच वैद्यकीय आणि सामाजिक कारणांसाठी अचानकपणे उदभवणारे खर्चाचे प्रमाणही जास्त असल्याने कर्ज देताना,बँकांना मोठा धोका पत्करावा लागतो.**

'ग्रामीण ग्राहक हे विश्वसनीय आहेत',आणि ग्रामीण ग्राहक म्हणजे केवळ शेतकरी आणि अशिक्षित लोक नव्हेत तर नवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि स्वीकार करू शकणाऱ्या नवीन पिढीचाही यामध्ये समावेश आहे. या नवीन

गृहितकावर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार होणे आवश्यक आहे.म्हणूनच सर्वसमावेशक आर्थिक क्षेत्राची निर्मिती करून त्यामध्ये मागणीनुसार आराखडा तयार करणे,कार्यक्षम बहुविध आर्थिक उत्पादनांची आणि सेवांची तरतूद करणे आणि ग्रामीण भागातील वैविध्यपूर्ण ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या शाश्वत संस्थांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे.अशा प्रकारे सर्वसमावेशक,तरीही शाश्वत ग्रामीण आर्थिक व्यवस्था विकसित करणे हे अत्यंत आव्हानात्मक असे काम आहे.हे करत असताना पूरक प्रश्नांचे भान आणि समज असणे आवश्यक आहे.त्यांचे पुढील सात प्रकारांत वर्गीकरण करता येईल :

- **उत्पादन धोरण** : लहान आर्थिक व्यवहाराच्या गरजा लक्षात घेऊन तसेच लवचिकता, उपलब्धतेत सातत्य आणि सोय याबाबत कोणतीही तडजोड न करता वैविध्यपूर्ण उत्पादने आणि सेवा विकसित करता येईल का? ग्रामीण भागातील वंचित समाजातील गरिबी कमी करण्यासाठी आणि विकासाचा दर वाढवण्यासाठी कोणत्या प्रकारची आर्थिक उत्पादने अतिशय परिणामकारक ठरतील? या प्रश्नांवर विचार होणे आवश्यक आहे.

- **कार्यपद्धती**: समाजातील वंचित आणि असुरक्षित घटकांपर्यंत पोचण्यास बँकांना मदत करण्यासाठी विना अडथळा, कोणत्याही आर्थिक व्यवहार्यतेला धक्का न पोचवता ग्राहकांच्या थेट दारापर्यंत सेवा पोचवण्यासाठी कशा प्रकारची व्यवसाय कार्यपद्धती असू शकते?शाखा प्रमुख असलेल्या बँकेच्या कार्यपद्धतीत येणारे अडथळे टाळून आपण शाखाविरहीत कार्यक्षम केंद्र(हब) आणि बोलक्या प्रतिकृतीची निर्मिती करू शकू का?

**सर्वसमावेशक आर्थिक क्षेत्राची निर्मिती करून त्यामध्ये मागणीनुसार आराखडा तयार करणे,कार्यक्षम बहुविध आर्थिक उत्पादनांची आणि सेवांची तरतूद करणे आणि ग्रामीण भागातील वैविध्यपूर्ण ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या शाश्वत संस्थांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे.अशा प्रकारे सर्वसमावेशक,तरीही शाश्वत ग्रामीण आर्थिक व्यवस्था विकसित करणे हे अत्यंत आव्हानात्मक असे काम आहे**

- **भागीदारी**: बँक व्यवस्थेची सुविधा मिळणाऱ्या आणि न मिळणाऱ्या लोकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवठादारांकडून सेवा मिळताना कोणत्या अडचणींशी सामना करावा लागतो? बँका आणि इतर संस्थांची भागीदारी आर्थिक सेवा सहजपणे उपलब्ध होण्यासाठी कार्यक्षम आणि परिणामकारक ठरते का?इतर संस्था यामध्ये व्यवसाय प्रतिनिधी,स्वयं-सहायता गट,सूक्ष्म वित्त संस्था,इत्यादींचा समावेश होतो.

- **संरक्षण**: ग्रामीण वित्त पुरवठा करणाऱ्या आणि त्याचा लाभ घेणाऱ्या दोघांनाही अशा प्रकारच्या सेवा पुरवताना आणि त्याचा लाभ घेताना त्याचा दुरुपयोग किंवा गैरवापर होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील?कोणत्या यंत्रणा राबवता येतील.

आर्थिक क्षेत्रात असलेली वाढती असुरक्षितता लक्षात घेता कर्जदारांना त्यांच्या जोखमींचे निराकरण होईल यासाठी योग्य अशी काही यंत्रणा आहे का? पत संस्कृतीमध्ये असणाऱ्या आर्थिक चढ-उतार आणि अनिश्चिततेबाबत कर्ज पुरवठादारांना काही संरक्षण दिले जाते का?

- **नफा (किफायतशीरपणा)**: एकाच वेळी ग्रामीण ग्राहकांना वाजवी किंमतीत आणि स्वीकारार्ह ठरू शकतील अशा आर्थिक सेवा पुरवताना त्या पुरवठादारांनाही सातत्याने टिकून राहण्यासाठी फायदेशीर ठरू शकतील अशा स्वरुपाची व्यवसायविषयक धोरणे आणि वितरण पद्धती आखण्यात आली आहेत का? कोणत्या प्रतिकृतीमध्ये ग्राहक स्वेच्छेने योग्य ती किंमत द्यायला तयार असतात याची चाचपणी कशाप्रकारे करता येईल?

- **उत्पादकता**: ग्रामीण भागात पुरवल्या जाणाऱ्या आर्थिक सेवांची उत्पादकता आपल्याला कशी वाढवता येईल? आर्थिक सेवा अधिक उत्पादनक्षम आणि

अनुकूल ठरण्यासाठी वित्त आणि इतर साधनसंपत्ती ( यामध्ये 'क्रेडीट प्लस' ॲपरोच चा विचार येतो.या दृष्टिकोनात केवळ कर्ज देणे (सूक्ष्म वित्त पुरवठा) एवढाच विचार नसतो तर कर्ज देताना मोठया प्रमाणावर त्याचा विकास प्रक्रियेसाठी कसा उपयोग होईल याचा विचार होतो. उदाहरणार्थ – समुदाय संघटन,नेतृत्व प्रशिक्षण,उद्योजकता विकास अशा प्रकल्पांना कर्ज पुरवठा केला जातो) यांच्यात समन्वय साधण्यासाठी कोणती धोरणे आखणे गरजेचे आहे?

● **लोक(बँक कर्मचारी):** आर्थिक समावेशकता ही संकल्पना राबवताना ग्रामीण भागातील बँक शाखांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ज्ञान,कौशल्य आणि दृष्टिकोन याविषयीचे योग्य प्रशिक्षण दिले जाते का? ते काम करताना सुसज्ज असतात का? हे नव्या प्रकारचे काम करण्यासाठीची अनुकूल मानसिकता त्यांच्यात निर्माण केली जाते का? संभाव्य ग्राहक कोण आहेत हे ओळखून त्यांना योग्य सल्ला देण्याची,तसेच बँकेच्या विविध प्रकारच्या सेवांबाबत माहिती देण्याची क्षमता,आकलन आणि बांधिलकी या कर्मचाऱ्यांच्यात असते का?

नेल्सन मंडेला म्हणाले होते, ''ज्यांच्याकडे मुबलक प्रमाणात आहे त्यांनाच आणखी देणे यावर आपल्या प्रगतीची कसोटी अवलंबून नाही,तर ज्यांच्याकडे अत्यल्प आहे,त्यांना पुरेशी मदत करणे म्हणजे खरा विकास आणि प्रगती''.

भारतात आर्थिक समावेशकतेचा पहिला रचनात्मक प्रयत्न २००५मध्ये करण्यात आला.

**वर्षाला ५०,००० रुपयांपेक्षा कमी ठेवी ठेवू शकणाऱ्या लोकांना जर खाती उघडायची असतील तर त्यासाठी काही नियम शिथिल करण्यात आले आहेत.गरीब आणि वंचित लोकांना सहजी कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी जनरल क्रेडीट कार्ड देण्यात येतात.शेतकऱ्यांना सहजपणे आणि वेळेवर कर्ज पुरवठा करता यावा या उद्देशाने बँकिंग व्यवस्थेने किसान क्रेडीट कार्ड देण्यास सुरुवात केली. सप्टेंबर,२०१६ अखेर पाच कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड देण्यात आली.**

भारतीय बँकेचे अध्यक्ष के सी चक्रवर्ती यांच्या हस्ते या उपक्रमाचा प्रारंभ झाला. गावातील सर्व घरांमध्ये बँकेच्या सुविधा पुरवण्यात आल्या आहेत असा सन्मान मिळणारे 'मंगलम' हे पहिले खेडेगाव ठरले. भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक समावेशकतेचे उपक्रम एक मोहीम म्हणूनच हाती घेतले आहेत.यामध्ये नव्या उत्पादनांची तरतूद,नियामक मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शिथिलता आणि मदतीचा हात देणाऱ्या इतर उपाययोजना अशी धोरणे एकत्रित आणली आहेत. याचा मुख्य उद्देश शाश्वत आणि मोठया प्रमाणावर आर्थिक समावेशकता आणणे. यासंबंधात,रिझर्व्ह बँकेने काही पावले उचलली आहेत. 'नो फ्रील' खाती उघडण्यास प्रोत्साहन देणे(नो फ्रील खाते म्हणजे खात्यामध्ये शून्य किंवा अगदी कमी रक्कम असली तरी ते खाते चालू राहते.आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरीब लोकांसाठी ही योजना बँकेने सुरु केली आहे). याचबरोबर जनरल क्रेडीट कार्ड देणे ही योजनाही सुरु करण्यात आली आहे.लहान ठेवी आणि लहान कर्जे या योजनांद्वारे मिळू शकतात. वर्षाला ५०,००० रुपयांपेक्षा कमी ठेवी ठेवू शकणाऱ्या लोकांना जर खाती उघडायची असतील तर त्यासाठी काही नियम शिथिल करण्यात आले आहेत.गरीब आणि वंचित लोकांना सहजी कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी जनरल क्रेडीट कार्ड देण्यात येतात.शेतकऱ्यांना सहजपणे आणि वेळेवर कर्ज पुरवठा करता यावा या उद्देशाने बँकिंग व्यवस्थेने किसान क्रेडीट कार्ड देण्यास सुरुवात केली.सप्टेंबर,२०१६ अखेर पाच कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना किसान क्रेडीट कार्ड देण्यात आली. भारतीय रिझर्व्ह बँकेने, जानेवारी, २००६ मध्ये व्यावसायिक बँकांना, आर्थिक आणि बँकिंग सेवा पुरवण्यासाठी,बिगर सरकारी संस्था (स्वयंसेवी संस्था,स्वयं सहायता गट), सूक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था आणि इतर नागरी सामाजिक संघटना आणि संस्था यांची मध्यस्थ

म्हणून मदत घेण्यास परवानगी दिली.हे मध्यस्थ, व्यावसायिक बँकांच्या वतीने व्यावसायिक सुविधा देणारे किंवा व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून काम करतात. रिझर्व्ह बँकेने व्यावसायिक बँकांना विविध भागांमध्ये १००% आर्थिक समावेशन मोहीम राबवण्याचे निर्देश दिले. परिणामी, पुदुचेरीसारख्या केंद्रशासित प्रदेशांनी आणि हिमाचल प्रदेश,केरळ यांसारख्या राज्यांनी त्यांच्या सर्व जिल्ह्यांमध्ये १००% आर्थिक समावेशन झाल्याचे जाहीर केले.रिझर्व्ह बँकेने,२०२०पर्यंत, सुमारे ६० कोटी नव्या ग्राहकांची खाती उघडण्याचे आणि त्यांना माहिती तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन विविध माध्यमांच्या मदतीने सेवा देण्याचे ठरवले आहे.असे असले तरी, निरक्षरता, कमी उत्पन्न, बचतीची सवय नसणे आणि ग्रामीण भागात बँकांच्या शाखांची संख्या कमी असणे इत्यादी कारणांमुळे अनेक राज्यांमध्ये आर्थिक समावेशकतेत अडथळे येत आहेत. याशिवाय, अपुरी कायदेशीर आणि आर्थिक रचना हे ही एक कारण आहे.

आर्थिक समावेशकतेत येणाऱ्या अडथळ्यांचा एक एक मुद्दा घेऊन विचार करूया :

१) ग्रामीण भागातील,गरीब लोकांपर्यंत पोचण्यासाठी,व्यवसाय प्रतिनिधी ही संकल्पना प्रभावीपणे राबवण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे :

● कायम कमी उत्पन्न असणाऱ्या ग्राहकांशी संपर्क आणि आर्थिक व्यवहारही कमी रकमेचे त्यामुळे व्यवसाय प्रतिनिधींना ते देत असलेल्या सेवांचा पुरेसा मोबदला मिळत नाही.व्यवसाय प्रतिनिधींच्या

**पुदुचेरीसारख्या केंद्रशासित प्रदेशांनी आणि हिमाचल प्रदेश,केरळ यांसारख्या राज्यांनी त्यांच्या सर्व जिल्ह्यांमध्ये १००% आर्थिक समावेशन झाल्याचे जाहीर केले.रिझर्व्ह बँकेने,२०२०पर्यंत,सुमारे ६० कोटी नव्या ग्राहकांची खाती उघडण्याचे आणि त्यांना माहिती तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन विविध माध्यमांच्या मदतीने सेवा देण्याचे ठरवले आहे.**

सेवांचा इष्टतम वापर करायचा असेल तर बँकांनी त्यांना पुरेसा, योग्य तो मोबदला दिला पाहिजे. म्हणजे मग त्यांना गावागावातील गावकऱ्यांच्या घरोघरी जाऊन बँकिंग सेवा पोचवण्याबद्दल प्रोत्साहन मिळेल.

● व्यवसाय प्रतिनिधींच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी आणि रोख पैशाचे व्यवस्थापन करण्यासाठी,ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी बँकांनी योग्य अंतरावर शाखा उघडणे आवश्यक आहे.

● व्यवसाय प्रतिनिधींनी प्रभावीपणे काम करण्यासाठी बँकांनी पुढाकार घेऊन त्यांच्यासाठी योग्य ते प्रशिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे.

२) गावात राहणाऱ्या गरीब गावकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना वाजवी किंमतीत,परवडतील अशा दराने वापरता येतील अशी योग्य आणि नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

● गावकऱ्यांना सावकारांकडून कर्जे घेण्यापासून परावृत्त करण्यासाठी बँकांनी कर्ज वितरण करण्याच्या आपल्या कार्यपद्धतीत सोपेपणा आणि लवचिकता आणली पाहिजे.

३) माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाने सक्षम झालेल्या वातावरणात या यंत्रणेचा व्यावहारिक उपयोग करून घेऊन कार्यशील आर्थिक समावेशनाचे अंतिम ध्येय लवकरात लवकर साध्य करणे आवश्यक आहे.

● ग्रामीण भागात आणि बँकेची सुविधा नसलेल्या भागात गावकऱ्यांना सेवा देण्यासाठी बँकांनी एटीएमचे जाळे वाढवणे गरजेचे आहे.त्याचबरोबर,योग्य त्या सुरक्षा उपाययोजना करणे आणि आर्थिक साक्षरता मोहीम राबवणे गरजेचे आहे.

● ग्रामीण भागात एकंदरच लहान रकमेच्या आर्थिक व्यवहारावर होणारा खर्च कमी करण्यासाठी रूपे कार्ड वापर वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

● आपल्या देशातील कृषी आणि ग्रामीण विकासासाठी असलेली शिखर बँक,नाबार्डने,जरी या अगोदरच किसान क्रेडीट कार्डचे इलेक्ट्रॉनिक क्रेडीट कार्ड आणि रूपे किसान क्रेडीट कार्डमध्ये रूपांतरण करण्यासाठी अनेक नवी पावले उचलली असली तरी ग्रामीण भागात गरजेनुसार ज्या कार्डचा वापर डेबिट कार्ड,किसान क्रेडीट कार्ड आणि जनरल क्रेडीट कार्ड म्हणून करता येईल,असे एकत्रित बहुउद्देशीय कार्ड देता येईल का, अशी शक्यता बँकांनी पडताळून पाहणे आवश्यक आहे.

● देशातील ग्रामीण भागात, मार्च,२०१७ अखेर ५०.६०कोटी मोबाइल ग्राहक आहेत. त्यांना एसएमएस द्वारे सांकेतिक भाषा वापरून निधीचे, पैशाचे हस्तांतरण करता येईल का? त्यासाठी लागणारे आणि मोबाइलच्या कोणत्याही हँडसेटवर वापरता येईल असे ॲप विकसित करता येईल का?आणि असे पर्याय देणे व्यवहार्य ठरेल काय यावर बँकांनी विचार करणे गरजेचे आहे.

● नाबार्डने नुकत्याच जारी केलेल्या परिपत्रकानुसार,बँकांना आता, ग्रामीण भागात असलेल्या प्राथमिक कृषी पत संस्था या देशातील सर्वात मोठया सहकारी यंत्रणेचा वापर व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून करता येईल.

● स्थलांतर करणाऱ्या लोकांसाठी पैसे भरण्याची सुविधा ही अत्यंत महत्त्वाची बाब असते. अशा लोकांना पैसे भरण्याचे सहज आणि स्वस्त मार्ग उपलब्ध करून देणे अतिशय आवश्यक आहे.

● गावांत राहणाऱ्या गरीब लोकांशी सहृदयतेने,मानवतावादी दृष्टिकोनातून कसे वागावे

**ग्रामीण भागात, मार्च, २०१० अखेर, बँकांच्या ३३३७८ शाखा होत्या. त्यामध्ये वाढ होऊन मार्च,२०१६ अखेर, ही संख्या ५१,८३० इतकी झाली. याशिवाय, ग्रामीण भागात, शाखाविरहित बँकिंग सेवा देणाऱ्या केंद्रांची संख्या मार्च,२०१०पर्यंत ३४३१६ होती. ती मार्च,२०१६ मध्ये ५,३४,४७७ इतकी झाली. शाखाविरहित बँकिंग सेवेमध्ये झालेली वाढ लक्षणीय मानावी लागेल.**

याचे प्रशिक्षण बँकांनी आपल्या कर्मचाऱ्यांना आणि व्यवसाय प्रतिनिधींना देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे.

● अर्थपूर्ण आर्थिक समावेशकता हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बँकांनी कर्ज मंजूर करताना मोठया शेतकऱ्यांपेक्षा लहान शेतकऱ्यांना प्राधान्य द्यावे.

● कोअर बँकिंग सोल्युशन्स अर्थात केंद्रीय पद्धतीने ग्राहकांच्या खात्यांची माहिती यामध्ये त्यांचे आर्थिक व्यवहार,व्यवसाय,उत्पन्न,कुटुंबातील सदस्य इत्यादी विषयीची माहिती बँकांनी मोठया प्रमाणावर जमा करणे आवश्यक आहे.

● ग्रामीण भागात बँकिंग व्यवस्थेला चालना देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पैसे हस्तांतरण करण्यासाठीच्या पद्धतीचा प्रभावीपणे प्रसार करणे आवश्यक आहे.

● ग्रामीण भागात रोजगार आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकार आणि बँकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे लोकांच्या वारंवार कर्ज घेण्याच्या वृत्तीमध्ये बदल होईल.

● नुकत्याच उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भागात,मार्च,२०१० अखेर,बँकांच्या ३३३७८ शाखा होत्या. त्यामध्ये वाढ होऊन मार्च,२०१६ अखेर,ही संख्या ५१,८३० इतकी झाली.याशिवाय,ग्रामीण भागात,शाखाविरहित बँकिंग सेवा देणाऱ्या केंद्रांची संख्या मार्च,२०१०पर्यंत ३४३१६होती. ती मार्च,२०१६ मध्ये ५,३४,४७७ इतकी झाली. शाखाविरहित बँकिंग सेवेमध्ये झालेली वाढ लक्षणीय मानावी लागेल.याचाच अर्थ जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत या सेवा पोचवण्याचा बँका प्रयत्न करीत आहेत.असे असले तरी,खाजगी क्षेत्रातील बँका मात्र ग्रामीण भागात तितक्या मोठया प्रमाणावर अजून पोचल्या नाहीत.मार्च,२०१७ मध्ये ग्रामीण भागातील एकूण शाखांच्या तुलनेत खाजगी बँकांच्या शाखांचे

प्रमाण केवळ २०% इतके होते.हे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

● देशातील एकूण ६ लाख गावांपैकी सुमारे १८ हजार गावांत अद्याप वीज पोचली नाही. या भागात भौतिक आणि डिजिटल जोडणी करणे,अखंडित वीज पुरवठा करणे इत्यादिंसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा सरकारने युद्धपातळीवर उभारणे गरजेचे आहे.

● बँकेचे व्यवहार त्या त्या प्रादेशिक, निदान महत्त्वाच्या प्रादेशिक भाषांमध्ये होणे आवश्यक आहे. आर्थिक साक्षरतेची मोहीम राबवत असताना बँकांनी सामान्य लोकांना त्यांच्या मनातील्र इंग्रजी भाषेची भीती काढून टाकण्यासाठी आणि त्यांच्या रोजच्या वापरातील भाषेत व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

● भारतातील टपाल व्यवस्था ही जगभरातील सर्वात मोठी यंत्रणा मानली जाते. देशात एकूण १,५४,८८२ टपाल कार्यालये असून त्यापैकी १,३९,१८२(८९.८६%)टपाल कार्यालये ग्रामीण भागात कार्यरत आहेत.या पार्श्वभूमीवर,टपालयंत्रणेचे महत्त्व लक्षात घेऊन बँकिंग सेवेसाठी तिचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल यासाठी सर्वांगीण प्रयत्न करणे गरजेचे आहे.केंद्र सरकारने भारतीय टपाल बँकेची केलेली सुरुवात हे नि:संशयपणे या दिशेने टाकलेले उल्लेखनीय पाऊल म्हणावे लागेल.

● स्वयं-सहायता गट बँकांना जोडण्याचा नाबार्डचा उपक्रम हा जगातील सर्वात मोठा सूक्ष्म पत पुरवठा कार्यक्रम ठरला असला तरी त्याची शाश्वतता आणि सूक्ष्म उद्योगाशी संबंधित असलेले इतर प्रश्न याकडे अजून म्हणावे तसे लक्ष देण्यात आले नाही.

● व्यवसाय प्रतिनिधींमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा या ज्यांना

**देशात एकूण १,५४,८८२ टपाल कार्यालये असून त्यापैकी १,३९,१८२ (८९.८६%) टपाल कार्यालये ग्रामीण भागात कार्यरत आहेत.या पार्श्वभूमीवर, टपालयंत्रणेचे महत्त्व लक्षात घेऊन बँकिंग सेवेसाठी तिचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल यासाठी सर्वांगीण प्रयत्न करणे गरजेचे आहे.केंद्र सरकारने भारतीय टपाल बँकेची केलेली सुरुवात हे नि:संशयपणे या दिशेने टाकलेले उल्लेखनीय पाऊल म्हणावे लागेल.**

दिल्या जातात ते बहुतेक लोक अशिक्षित आणि तंत्रज्ञानाशी फारसा परिचय नसलेले असतात.त्यामुळे व्यवसाय प्रतिनिधींकडून त्यांची दिशाभूल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केंद्र सरकार बरोबरच भारतीय रिझर्व्ह बँकेनेही वरील सर्व प्रश्नांची दखल घेऊन काही उपाययोजना हाती घेतल्या आहेत,त्या पुढीलप्रमाणे :

१) जन धन योजनेअंतर्गत सुमारे २६ कोटी खाती उघडण्यात मिळालेले प्रचंड यश.

२) सूक्ष्म कर्ज पुरवठा करण्यासाठी सुरु करण्यात आलेली सूक्ष्म एकक विकास पुनर्वित्त संस्था (मुद्रा).

३) अटल निवृत्तीवेतन (पेन्शन) योजना,प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना आणि प्रधानमंत्री जीवनज्योती बिमा योजना यांसारख्या सामाजिक सुरक्षा देऊ शकणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील योजनांची सुरुवात.

४) बँक आणि व्यवसाय प्रतिनिधींद्वारे बँकिंग सेवा-सुविधा पुरविण्यास चालना.

५) जमा खर्च व्यवहारांवरील प्रस्तावित सवलती.

६) रोख व्यवहारांऐवजी आधारचा वापर करून सूक्ष्म एटीएम आणि रुपेचा वापर.

७) वेगळ्या प्रकारच्या बँकिंग सेवांना प्रोत्साहन.या योजने अंतर्गत ११देयक(पेमेंट) बँकांना आणि १० लघु वित्त बँकांना नवे परवाने (लायसन्स).

असे असले तरी या उपक्रमांमुळेही काही आव्हाने उभी राहिली आहेत :

● प्रधानमंत्री जनधनयोजने अंतर्गत मोठया प्रमाणावर उघडण्यात आलेली खाती ही एक मोठीच समस्या निर्माण झाली आहे. या

योजनेअंतर्गत मोठया प्रमाणावर खाती उघडण्यात आली असली तरी यापैकी बऱ्याच खात्यांमध्ये पैसे नसतात आणि ती निष्क्रीय असतात. खात्यांची संख्या इतक्या मोठया प्रमाणावर वाढल्याने बँकांना ती चालू ठेवण्यासाठी बराच खर्च करावा लागतो.गरीब लोक पोटापाण्यापुरता पैसा कमवून कसाबसा उदरनिर्वाह करत असतात.त्यांना उत्पन्नाचे असे काही नियमित साधन नसते.त्यांना काही अतिरक्त पैसे मिळत नाहीत त्यामुळे बँक खात्यामध्ये बचतीसाठी पैसे टाकणे त्यांना शक्य होत नाही. कष्टाशिवाय त्यांना उत्पन्नाचे दुसरे कोणतेच साधन उपलब्ध नसते. परिणामी,आर्थिक समावेशकता या संकल्पनेला तसा अर्थ उरत नाही.

● तंत्रज्ञानावर आधारित ज्या सेवा आहेत उदाहरणार्थ – जन धन,आधार आणि मोबाइल यांची जोडणी.ती मंद गतीने सुरु होणारी प्रक्रिया राहते.

देयक (पेमेंट) बँका या मोठया प्रमाणावर लोकांपर्यत पोचू शकत असल्या तरी संगणकाची गुंतागुंतीची यंत्रणा, इंटरनेट सुविधांचा अभाव,तक्रार निवारण यंत्रणेचा अभाव इत्यादी कारणे या बँकांच्या सुविधा वापरण्याची इच्छा असणाऱ्यांना नाउमेद करण्याची शक्यता आहे.याशिवाय, या नव्या देयक बँका या रिझर्व्ह बँकेच्या संकल्पनेतून निर्माण झाल्या असल्याने आणि तिच्या अखत्यारित असल्याने रिझर्व्ह बँकेला ही आणखी एक जबाबदारी वाढण्याची शक्यता आहे.

● पूर्वीचे मध्यस्थ आणि बँक कर्मचारी यांची युती होऊन थेट लाभ हस्तांतरण योजनेचा लाभ लाभार्थींना मिळण्यास उशीर किंवा तो लाभ त्यांना नाकारला जाण्याचीही शक्यता आहे.

**प्रधानमंत्री जनधनयोजने अंतर्गत मोठया प्रमाणावर उघडण्यात आलेली खाती ही एक मोठीच समस्या निर्माण झाली आहे. या योजनेअंतर्गत मोठया प्रमाणावर खाती उघडण्यात आली असली तरी यापैकी बऱ्याच खात्यांमध्ये पैसे नसतात आणि ती निष्क्रीय असतात. खात्यांची संख्या इतक्या मोठया प्रमाणावर वाढल्याने बँकांना ती चालू ठेवण्यासाठी बराच खर्च करावा लागतो.**

● पेमेंट बँकांचा मोठया प्रमाणावर प्रसार झाल्यास नेहमीच्या बँकांना ग्राहकांकडून शुल्काच्या रूपाने विविध मार्गांनी जे उत्पन्न मिळते ते हिरावून घेतले जाण्याची शक्यता आहे.हे विविध प्रकारचे उत्पन्न त्यांना ग्राहकांना डिमांड ड्राफ्ट, पैसे हस्तांतरण, पैसे भरणे, धनादेशाद्वारे पैसे काढणे, एटीएम व्यवहार इत्यादिंसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कातून मिळते.

● प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना,प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या योजनांचे यश मुख्यत: बँका गरीब लोकांपर्यत किती प्रमाणावर पोचतात यावर अवलंबून आहे आणि हे खरोखरच दुष्कर काम आहे.कारण या वर्गातील बहुसंख्य लोकांना पेन्शन (निवृत्तीवेतन) किंवा विमा याविषयीची माहिती उपलब्ध नसते,त्याचे महत्त्व कळत नाही किंवा त्याबाबत जागरूकताही नसते.

● अगदी काही प्रकरणांमध्ये,व्यवसाय प्रतिनिधींनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

● बँकिंग तंत्रज्ञानाशी संबंधित फसवणुकीच्या घटनांचे वाढते प्रमाण भयावह आहे.

● ग्रामीण आणि समुद्र किनाऱ्याच्या मागील बाजूचा प्रदेश याठिकाणी अजूनही मोबाइलद्वारे संपर्क साधला जाऊ शकत नाही.

● प्राधान्य क्षेत्र कर्ज योजनेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी बँका खऱ्या गरजू आणि पात्र व्यक्तींपर्यंत पोचतीलच असे नाही कारण अनेक बँका गरिबांना कर्ज देण्याबाबत नाराज असतात.त्यामुळे केवळ उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी बँका, हे कर्ज मिळवण्यासाठी बनावट

कागदपत्रे सादर करणाऱ्या अपात्र व्यक्तींना कर्ज मंजूर करतात. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांसाठी सोने तारण ठेवून कमी व्याजदराने कर्ज देण्याची योजना आहे.पण ज्यांचा शेतीशी संबंधही नाही, असे लोक बँकांशी संधान बांधून ही कर्ज मिळवतात. त्यामुळे प्राधान्य क्षेत्र योजना स्वत:च्या उद्दिष्टापासून ढळते आणि अपात्र व्यक्तींना पात्र ठरवले जाते.सरकारने अशा प्रकरणांमध्ये लक्ष घालून पात्र अर्जदारांनाच कर्ज मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.तसेच जे बनावट अर्जदार आहेत आणि त्यांना साथ देणारे जे बँक कर्मचारी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांसाठी सोने तारण ठेवून कमी व्याजदराने कर्ज देण्याची योजना आहे.पण ज्यांचा शेतीशी संबंधही नाही, असे लोक बँकांशी संधान बांधून ही कर्ज मिळवतात. त्यामुळे प्राधान्य क्षेत्र योजना स्वत:च्या उद्दिष्टापासून ढळते आणि अपात्र व्यक्तींना पात्र ठरवले जाते.सरकारने अशा प्रकरणांमध्ये लक्ष घालून पात्र अर्जदारांनाच कर्ज मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच जे बनावट अर्जदार आहेत आणि त्यांना साथ देणारे जे बँक कर्मचारी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे.**

या लेखाचा समारोप करताना, आर्थिक स्थैर्य धोक्यात न आणता आर्थिक संस्थांनी विनाअडथळा गरिबांना आर्थिक सेवा द्याव्यात यासाठी लागणारे उपयुक्त नियामक वातावरण निर्माण करण्यास रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी अपेक्षा मी बाळगते. त्या त्या संदर्भानुसार, बँकांना त्यांच्या एकंदर व्यावसायिक तत्त्वज्ञानाचा भाग म्हणून स्वत:चे असे आर्थिक समावेशकतेचे धोरण ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे.मात्र,हे धोरण ठरवत असतानाच,बँकांनी व्यावसायिक दृष्टिकोन,जोखीम स्वीकारण्याची तयारी आणि उत्पादनातील अत्याधुनिकता या सर्वांचा विचार करून स्वत:चे कार्यक्रम आखणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील आर्थिक चित्र बदलत आहे.दोन आर्थिक पुरवठादार विशेषत: पूर्वीचे सूक्ष्म वित्त सेवा देणारे पुरवठादार यांना आता बँकांचे काम करण्यास परवानगी देण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नव्या धोरणानुसार,लहान बँका आणि पेमेंट बँकांनाही परवाने देण्यात येणार आहेत.याशिवाय,प्राधान्य क्षेत्र गरजांनुसार परदेशी बँकांनाही प्रवेश देण्यात येण्याची शक्यता आहे.या सर्व बाबींचा विचार करता ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आकार आणि व्याप्ती वाढीस लागेल अशी अपेक्षा आहे. म्हणूनच ग्रामीण आर्थिक बाबींशी संबंधित जी आव्हाने निर्माण होत आहेत त्यांचा सातत्याने आणि चिकाटीने सामना करणे आवश्यक आहे.त्यामुळेच ग्रामीण भागातील लोकांच्या परिस्थितीमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक अशी भरीव सुधारणा घडून येणार आहे. चला,ग्रामीण बँकिंग व्यवस्थेमध्ये अंतर्निहित असलेली दूरदृष्टी वास्तवात आणण्याचा प्रयत्न करूया!

■■■

*लेखिका 'नाबार्ड'च्या चंदिगड प्रादेशिक कार्यालयात सहाय्यक महाव्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत.*

*email : manjula.jaipur@gmail.com*

**<u>आगामी अंक</u>**

**सार्वजनिक तक्रार निवारण**

**फेब्रुवारी २०१८**

# अनुत्पादक मालमत्ता- आव्हाने व भविष्य

**दीपक नारंग**




**जेव्हा बँका कर्ज देतात तेव्हा उत्पादक साधने निर्माण होतात व जे लोक वस्तू व सेवा पुरवतात त्यांचे उत्पन्न यातून वाढते. त्यातून देशांतर्गत उत्पन्न वाढते व उत्पादक वाढ जोरात होते. जेव्हा कर्जपुरवठा कमी होतो तेव्हा त्याचे उलटे परिणाम होऊन अर्थव्यवस्थेची वाढ खुंटते. पतवाढ न होण्याचे एक कारण म्हणजे अनुत्पादक मालमत्ता हे आहे. अनुत्पादक कर्जात ७२ टक्के वाटा हा सरकारी बँकांचा आहे. त्याचा गुंतवणुकीवर परिणाम होत आहे.**

बँकांकडून दिले जाणारे कर्ज व त्यातून निर्माण होणारे उद्योग व रोजगार हे देशाच्या आर्थिक वाढीत महत्वाची भूमिका पार पाडत असतात. त्यातून पैसा अर्थव्यवस्थेत खेळत असतो. ज्यांच्याकडे जास्त पैसा आहे, त्यांच्याकडून ठेवी घेतल्या जातात व त्यातून इतरांना कर्ज दिले जाते. त्याचे अर्थव्यवस्थेवर अनेक पैलूंनी परिणाम होत असतात. जेव्हा बँका कर्ज देतात तेव्हा उत्पादक साधने निर्माण होतात व जे लोक वस्तू व सेवा पुरवतात त्यांचे उत्पन्न यातून वाढते. त्यातून देशांतर्गत उत्पन्न वाढते व उत्पादक वाढ जोरात होते. जेव्हा कर्जपुरवठा कमी होतो तेव्हा त्याचे उलटे परिणाम होऊन अर्थव्यवस्थेची वाढ खुंटते. पतवाढ न होण्याचे एक कारण म्हणजे अनुत्पादक मालमत्ता हे आहे. अनुत्पादक कर्जात ७२ टक्के वाटा हा सरकारी बँकांचा आहे. त्याचा गुंतवणुकीवर परिणाम होत आहे.

भारतातील बँकात ३० सप्टेंबर २०१७ अखेर एकूण अनुत्पादक कर्जे ८.४० लाख कोटींची होती त्यात १.३१ टक्के वाढ झाली आहे. ३० जून २०१७ रोजी ही अनुत्पादक कर्जे ही ८.२९लाख कोटी होती. अनुत्पादक मालमत्तात सप्टेंबर २०१५ पासून वाढली आहे. २००८ पासून मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करण्यात आले होते. २००८ ते २०१४ दरम्यान सार्वजनिक बँकांचे कर्ज व अग्रीमे १८ लाख कोटींवरून ५४ लाख कोटी झाली होती. सप्टेंबर २०१७ मध्ये हे कर्ज ५५.०१ कोटी झाले. त्यातून सार्वजनिक बँकांचे अनुत्पादक कर्ज ९० टक्के झाले.

गेल्या दुसऱ्या तिमाहीत २०१७-१८ मध्ये अनुत्पादक कर्जे ही सार्वजनिक बँकांमध्ये पहिल्या तिमाहीइतकी म्हणजे ७.३३ कोटी इतकीच राहिली. खासगी बँकातील कर्जे १०.५ टक्क्यांनी वाढून १.०६ लाख कोटी झाली.

यात मोठ्या म्हणजे पाच कोटी किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे कर्ज व्यावसायिक बँकांकडून घेणाऱ्या कर्जदारांचे प्रमाण ५६ टक्के असले तरी अनुत्पादक कर्जात त्यांचा वाटा हा ८६.५ टक्के आहे. अनुत्पादक कर्जांचे प्रमाण व संख्या हे वाढत गेले. आधी २० ते ५० कोटींची कर्जे अनुत्पादक होती. आता त्याचे

प्रमाण ५० कोटी ते १०० कोटी या टप्प्यात आहे. पहिल्या पंधरा मोठ्या कर्जदारांमध्ये १५.२ कोटींची अग्रीमे होती. त्यांचा व्यावसायिक बँकातील एकूण अनुत्पादक मालमत्तेतील वाटा २५.६ टक्के आहे. धोक्याच्या पातळीतील अग्रीमाचे प्रमाण मार्च २०१७ मध्ये व्यावसायिक बँकात २३ टक्के होते. त्याचे कृषी, सेवा व किरकोळ विक्री क्षेत्रातील प्रमाण अनुक्रमे ६.३ टक्के, ७ टक्के व २.१ टक्के होते. यात सार्वजनिक बँका व परदेशी बँकातील त्याचे प्रमाण ९.३ टक्के व ७.१ टक्के होते. धातू, सिमेंट, कापडउद्योग व पायाभूत उद्योगातील त्यांचे प्रमाण यात समाविष्ट आहे.

ही सगळी परिस्थिती निर्माण होण्याची जी कारणे आहेत त्यांचा आता विचार करू

★ थकित कर्जामुळे ताळेबंद पत्रकाचा आकार वाढलेला दिसतो. मागचा इतिहास न बघता दिलेली कर्जे ही नंतर परतफेड होण्यास अवघड असतात.

★ जागतिक मागणी व पुरवठा यांच्या स्थितीचा विचार न करता, क्षमतेचा अंदाज न घेता काही वेळा कर्जे दिली जातात.


★ प्रकल्पांना अनेक कारणांनी विलंब होणे, यामागील एक प्रमुख कारण आहे.

★ कर्जांची वसुली अतिशय असमाधानकारक असणे.

★ अनेक वेळा कंपन्या समभाग व इतर कर्ज साधनातून भांडवल उभारणी करण्यात अपयशी ठरतात व कर्जाचा पैसा त्यासाठी वापरतात. त्यामुळे दुहेरी जोखीम निर्माण होते. त्यामुळे बँकांनी कंपन्यांचे समभाग नेमके कशा प्रकारचे आहेत, याचाही विचार करणे आवश्यक ठरते.

★ अतिआशादायी अंदाजांमुळे काही वेळा उद्योग अपयशी ठरतात.

★ काहीवेळा कर्जाचा निधी हा विहित कामासाठी न वापरता विस्तार, आधुनिकीकरण यासाठी वापरला जातो.




**Note:** Numbers given in parenthesis with the legend is share of the respective sub-sector's credit in total credit to industry.


✯ जाणन बुजून कर्ज थकवण्याचे प्रकारही होतात, त्यात गैरविनियोग व घोटाळे यांचा समावेश आहे.

✯ कर्जापोटी दिलेला पैसा कसा वापरला जातो यावर लक्ष ठेवण्याची सुविधा बँकाकडे नसते. त्यामुळे हा पैसा बनावट कंपन्यामार्फत वापरला जातो.

✯ कर्ज मूल्यमापन व कर्ज परतफेडीत होणारी ढिलाई

**कर्जातील वाढ व अनुत्पादक मालमत्ता**

जेव्हा नवीन कर्जे घेतली जातात तेव्हा ती अनुत्पादक झाली आहेत हे कळायला ३ ते ४ वर्षे लागतात. वाढीच्या काळात कर्ज अनुत्पादक होत आहे हे लपून राहते. ढोबळ अनुत्पादक कर्जांचा आलेख हा चढता नसतो. त्यात अग्रीमाचे प्रमाण अनुत्पादक मालमत्तांच्या तुलनेत सुरवातीला वाढताना दिसतो. या कर्जाची परतफेड न होण्यामागची कारणे लक्षात घेऊन त्यासाठी सुधारणात्मक उपाय करणे गरजेचे असते. जे लोक ठरवून कर्जबुडवेगिरी करतात त्यांना कर्ज नाकारले पाहिजे. रिझर्व बँकेचे याबाबतचे पत्रक बघून त्यानुसार सूचक इशारे लक्षात घेतले पाहिजेत. चुकार कर्जदारांना असहकार्य करणारे कर्जबुडवे जाहीर करायला हवे, कंपनी कायद्यातील काही तरतुदी बघितल्या तर त्यातून अशा कर्जबुडवेगिरी करणाऱ्यांवर कारवाईसाठी अनेक कारणे दिसून येतात पण त्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.




| अनुत्पादक मालमत्ता | वाढ | कर्जातील वाढ |
|---|---|---|
| २००१-०२ | ११ | २३.६ |
| २००२-०३ | ९.५ | १४.४ |
| २००३-०४ | ७.४ | १६.२ |
| २००४-०५ | ५.२ | ३१ |
| २००५-०६ | ३.५ | ३१ |
| २००६-०७ | २.६ | २८.५ |
| २००७-०८ | २.४ | २३.१ |
| २००८-०९ | २.४ | १९.६ |
| २००९-१० | २.५ | १७.१ |
| २०१०-११ | २.४ | २२.३ |
| २०११-१२ | २.९ | १६.९ |
| २०१२-१३ | ३.४ | १५.१ |
| २०१३-१४ | ३.८ | १०.९ |
| २०१४-१५ | ४.३ | १२.६ |
| २०१५-१६ | ७.६ | १०.७ |
| २०१६-१७ | ९.३ | ५.०८ |

कंपनी कायदा २०१३ च्या कंपनी कामकाजाच्या तुलनेत घोटाळ्याचा गुन्हा याची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. लपवाछपवी किंवा गैरप्रकाराची कुठलीही बाब किंवा पदाचा गैरवापर यांचा यात समावेश होतो. कंपनीच्या हितसंबंधांना यात धक्का लावून भागधारक व कर्जदार यांना अडचणीत आणणारी परिस्थिती निर्माण केली जाते. यात फायदा किंवा तोटा काहीही झाले असले तरी त्याची चौकशी गंभीर घोटाळा चौकशी संस्थेमार्फत (एसएफआयओ) केली जाऊ शकते. ठरवून कर्ज बुडवणे व इतर अफरातफरीचे गुन्हे एसएफआयओकडे चौकशीसाठी सोपवता येतात. कंपनी कायदा कलम ४४७ अनुसार असे घोटाळे हे गंभीर गुन्हे ठरतात.

पण यात मुख्य अडचण अशी की, यात अप्रमाणिकपणाचा हेतू सिद्ध करणे, कर्जदारांकडून चुकीचे दावे केले जाणे सिद्ध करणे अवघड असतेत्यामुळे यात गुन्हेगारी कारवाई सुरू करणे अवघड जाते.

यात एखादी व्यक्ती दोषी आढळली तर तिला किमान सहा महिने व कमाल दहा वर्षे तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते. यात घोटाळ्यातील रकमेच्या कमी रकमेइतका किंवा त्यापेक्षा अधिकच दंड होऊ शकतो. घोटाळ्याच्या रकमेच्या तीन पट इतका कमाल दंड आकारला जाऊ शकतो.

जर घोटाळा लोकहिताला बाधा आणणारा असेल तर त्यात किमान तीन वर्षे तुरूंगवास होऊ शकतो. बँकांना कर्जवसुली करण्यासाठी आरडीडीबीएफआय कायदा एसएआरएफएइएसआय कायदा व दिवाळखोरी व अवसायन संहिता २०१६ यांचा उपयोग करता येऊ शकतो. एसएआरएफएइएसआय कायद्यात बँक मालमत्तेचा ताबा घेऊ शकते. न्यायालयाच्या मदतीशिवाय त्याचा लिलाव करू शकते. कर्जवसुलीसाठी हे सर्वात शक्तीशाली हत्यार आहे. त्यात जप्त केलेली मालमत्ता विकणे व इतर नियोजन योग्य प्रकारे करावे लागते. कारण जप्त मालमत्तेचा लिलाव होणार नाही यासाठी कर्जदार हे नाना युक्त्या वापरत असतात. यात मालमत्तेत अनाधिकाराने प्रवेश करणे व इतर खोटे आरोप ठेवून बँक अधिकाऱ्यांना अडचणीत आणले जाते. त्यामुळे वसुली करणारे अधिकारी कर्मचारी यांचे नीतीधैर्य खच्ची होते. दीपक नारंग व हरयाना सरकार यांच्यातील प्रकरणात १४ सप्टेंबर २००६ रोजी पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाने अलाबाहाबाद बँकेचे सहायक महाव्यवस्थापक असलेले दीपक नारंग यांच्या बाजूने निकाल दिला होता. कपोलकल्पित बाबींच्या आधारे एफआयआर दाखल करण्याचा आदेश देणाऱ्या दंडाधिकाऱ्यांना फटकारले होते. न्यायाधीश आर.एस मदान यांनी असे म्हटले होते की, या प्रकरणात याचिकाकर्त्यांना गुन्हेगारी दंडसंहितेच्या कायदा २००२ मधील कलम १९७ अन्वये खटल्यापासून संरक्षण आहे. सरकारी सेवकाविरोधात त्याने केलेल्या गुन्ह्यासाठी खटला भरण्याकरिता परवानगी लागते. कर्तव्य बजावताना केलेली कृती ही कलम १९७ अनुसार केलेली असते.

**कायद्याच्या कलम ६४ (५१९) अन्वये बँकांनी २०१५-१६ मध्ये १७ जून अखेर जप्त मालमत्तांची संख्या ३३९२८ होती. ती खरे तर जास्त असायला हवी होती. सरकारने हा कायदा बदलताना जिल्हाधिकाऱ्यांना व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना संबंधित मालमत्तेचा ताबा तसा अर्ज केल्यानंतर बँकेला देणे बंधनकारक केले आहे. असे असले तरी कर्जदार यात अनेक अडथळे आणतात, गेली अनेक वर्षे त्यांचा बँकिंग व्यवस्थेशी हा खेळ सुरू आहे.**

सिक्युरिटायझेशन ॲक्ट २००२ कलम ३२ योग्य हेतूने कर्जदारावर केलेली कारवाई ही खटल्यास पात्र ठरत नाही. त्यात कुणी अधिकारी, व्यवस्थापक यांनी कर्जदारावर केलेली कारवाई ही या कायद्यानुसार योग्य ठरते.

यात एवढा निकाल देऊनही कर्जबुडवेगिरी करणाऱ्या विरोधात बँका काही कारवाई करीत नाहीत. त्यामुळे कर्जवसुलीत अडचणी येतात. या कायद्याच्या कलम ६४ (५१९) अन्वये बँकांनी २०१५-१६ मध्ये १७ जून अखेर जप्त मालमत्तांची संख्या ३३९२८ होती. ती खरे तर जास्त असायला हवी होती. सरकारने हा कायदा बदलताना जिल्हाधिकाऱ्यांना व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना संबंधित मालमत्तेचा ताबा तसा अर्ज केल्यानंतर बँकेला देणे बंधनकारक केले आहे. असे असले तरी कर्जदार यात अनेक अडथळे आणतात, गेली अनेक वर्षे त्यांचा बँकिंग व्यवस्थेशी हा खेळ सुरू आहे. खरेतर कुठलाही बँकर हा प्रामाणिक कर्जदाराच्या अडचणी समजू शकतो. लुधियानातील उद्योगपती संजय लोंगवालिया यांनी एकदा असे सांगितले की, इतर उद्योजक ज्या वस्तू लुधियानात तयार करतात त्याच मीही तयार करतो पण कागदोपत्री जे ठरले आहे ते व्याज मात्र देत आहे, हप्ते वेळेवर फेडत आहे, सर्व करही भरत आहे पण बँका कर्जाचा दर

कमी करण्याची विनंती मान्य करीत नाहीत. पैसा दुसरीकडे वळवणाऱ्या व अप्रामाणिकपणा करणाऱ्या अनेकांना ही सवलत काही वेळा दिली जाते. त्याच्या कर्जाची फेररचना होते मग प्रामाणिक कर्जदारांना वाईट वागणूक का मिळते, असा त्याचा सवाल होता. त्यावेळी माझ्या मनात पंतप्रधानांनी केलेले वक्तव्य आले. ते म्हणाले होते की, जे लोक बदमाशी करून कर्जाची परतफेड करीत नाहीत त्यांना मी कायद्याचा धाक जाणवून देणार आहे. सध्याच्या सरकारने दिवाळखोरी व अवसायन कायदा १ डिसेंबर २०१६ मध्ये लागू करून स्वागतार्ह प्रयत्न केले आहेत. दुसरे म्हणजे सरकारने बँकांच्या वसुलीसाठी संबंधित कायद्यातील पळवाटा बंद केल्या आहेत. अनुत्पादक मालमत्ता नष्ट करण्यासाठी आता हा कायदा म्हणजे ब्रह्मास्त्र ठरत आहे. या कायद्यातील तरतुदींचा वापर करणाऱ्यांची इच्छाशक्ती व प्रामाणिक हेतू यावर त्याची परिणामकारकता ठरणार आहे. कायदयाच्या हेतूलाच हरताळ फासण्याचे काम मात्र कुणी करू नये. कारण, त्यामुळे व्यवस्था बदनाम होते. आताच्या नवीन कायद्यानुसार जे लोक कर्जबुडवेगिरी करतात त्यांना आता कर्जाची रक्कम इतरत्र वळवून गैरप्रकार करणे, त्यांच्याच कंपन्यांची फेरखरेदी करणे, असे प्रकार शक्य होणार नाहीत. त्यामुळे प्रवर्तकांना आता लबाडी करता येणार नाही. यात सरकारचा उद्देश सफल होणार असून अनुत्पादक

**सध्याच्या सरकारने दिवाळखोरी व अवसायन कायदा १ डिसेंबर २०१६ मध्ये लागू करून स्वागतार्ह प्रयत्न केले आहेत. दुसरे म्हणजे सरकारने बँकांच्या वसुलीसाठी संबंधित कायद्यातील पळवाटा बंद केल्या आहेत. अनुत्पादक मालमत्ता नष्ट करण्यासाठी आता हा कायदा म्हणजे ब्रह्मास्त्र ठरत आहे. या कायद्यातील तरतुदींचा वापर करणाऱ्यांची इच्छाशक्ती व प्रामाणिक हेतू यावर त्याची परिणामकारकता ठरणार आहे.**

मालमत्ता कमी होण्यास मदत होणार आहे. कंपनी कायदा २०१३ मधील कलम ४४७ चा वापर याबरोबर केला तर त्याचा प्रभाव आणखी वाढून मदत होणार आहे. हेतुपुर्वक कर्जबुडवेगिरी करणे हा गंभीर गुन्हा ठरवणे या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे. त्यामुळे कर्जदारांच्या वर्तनातही फरक पडणार आहे. सध्या जे लोक बँकेकडून कर्ज घेतात त्यांना कर्जाची परतफेड न करणे हा जन्मसिद्ध हक्क वाटतो. चुकार कर्जदारांना चाप बसण्याची आता वेळ आली आहे. यापुढे जाऊन बँकांनी कर्जापोटी दिलेला पैसा नेमका कशासाठी वापरला जातो याचाही शोध बँकांनी घेतला पाहिजे. डाटा अॅनॅलिसिस व इतर आयटी साधनांचा वापर त्यासाठी केला पाहिजे अर्थतंत्र कंपन्या ही साधने वापरत असतात, तसाच तो बँकांनीही केला पाहिजे. यात कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रांचा वापरही करता येतो. डी टू के तंत्रज्ञान कंपनी नवी मुंबईत आहे. त्यांनी यासाठी जे सॉफ्टवेअर तयार केले आहे त्याचे निष्कर्ष चांगले आहेत. बँकांनी त्यांच्या मनुष्यबळाला प्रशिक्षण दिले पाहिजे. सरकारनेही संचालक मंडळावर बँकांच्या कामकाजाचे ज्ञान असलेले संचालक नेमणे गरजेचे आहे.निवृत्त पण चांगले व्यवस्थापकीय संचालक व कार्यकारी संचालक सरकारने संचालक मंडळावर नेमणे गरजेचे आहे. कर्जाची वसुली वाढवण्यासाठी एनसीएलटी व डीआरटी आणखी असणे आवश्यक आहे. न्यायाधीशांची संख्याही वाढवणे आवश्यक आहे. कारण दिवाळखोरीचे प्रकार निकाली काढणे आवश्यक असते. नवीन दिवाळखोरी व अवसायन कायद्यामुळे कर्ज संस्कृती बदलणार आहे. बँक व कर्जदार या सगळ्यांनाच सुरक्षित वातावरण त्यातून तयार होईल. यातून बँकांना सुटकेचा निश्वास टाकता येणार आहे. त्यासाठी सरकार अभिनंदनास पात्र आहे. यातून कर्जदारांची मानसिकता बदलून कर्ज परतफेड चुकवण्याची मनोवृत्ती बदलेल.

■■■

*लेखक युनायटेड बँकेचे माजी कार्यकारी संचालक असून पुण्यातील एनआयबीएम संस्थेत अभ्यागत प्राध्यापक म्हणून सध्या कार्यरत आहेत.*

*email : d.narang@nibm india.org*

विचार

# बँकांचे पुनर्भांडवलीकरण

रमेश झवर



**देशाची अर्थव्यवस्था उड्डाण करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना अनुत्पादित कर्जाचा गंभीर विषय संसदेत आला. आंतरराष्ट्रीय बाजार नरम आणि बँक कर्जाची ठप्प मागणी हा काळजीचा विषयदेखील नेमका ह्या प्रश्नात गुंतलेला आहे. संकटाचे स्वरूप अधिक गहिरे होत असताना सरकारच्या असे लक्षात आले की केवळ लहान बँका मोठ्या बँकांत विलीन करून हा प्रश्न चुटकीसरशी सोडवण्यासारखा नाही. अर्थात विलीनीकरण तर करावेच लागणार असल्यामुळे ते अधिक पध्दतशीर कसे करता येईल ह्यासंबंधी वित्त मंत्रालयात विचारविनिमय सुरू झाला.**

गेल्या वर्षापासून राष्ट्रीयीकृत बँकांच्या थकित आणि बुडित कर्जाचा विषय हा राष्ट्राच्या चिंतेचा झाला. विशेषत: देशाची अर्थव्यवस्था उड्डाण करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना अनुत्पादित कर्जाचा गंभीर विषय संसदेत आला. आंतरराष्ट्रीय बाजार नरम आणि बँक कर्जाची ठप्प मागणी हा काळजीचा विषयदेखील नेमका ह्या प्रश्नात गुंतलेला आहे. संकटाचे स्वरूप अधिक गहिरे होत असताना सरकारच्या असे लक्षात आले की केवळ लहान बँका मोठ्या बँकांत विलीन करून हा प्रश्न चुटकीसरशी सोडवण्यासारखा नाही. अर्थात विलीनीकरण तर करावेच लागणार असल्यामुळे ते अधिक पध्दतशीर कसे करता येईल ह्यासंबंधी वित्त मंत्रालयात विचारविनिमय सुरू झाला. अनेकांनी ह्या संदर्भात आतापासूनच निराशेचा सूर लावला आहे. निराशेच्या सूरामागे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष छुपे हितसंबंध, काही बँकांच्या अनुत्पादित कर्जात मूळ ॲसेटपेक्षाही झालेली वाढ, थकित कर्ज दिसू नये म्हणून करण्यात आलेले कर्जाचे नूतनीकरण इत्यादि अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत. विलीनीकरणात खोडा घालण्याचा कर्मचारी संघटनांनी केलेला प्रयत्न हेही कारण आहेच. अर्थात मोठ्या प्रमाणावर 'व्हीआरएस' राबवून ह्या प्रश्नातून मार्ग काढता येऊ शकतो. सर्वात महत्त्वाचा मुद्दा नुकसानीत असलेल्या बँकांपायी चांगल्या चालणाऱ्या बँका डबघाईला येण्याचा धोका हा आहे. त्याखेरीज वेगवेगळ्या बँकांची कार्यसंस्कृती, भिन्न भिन्न बँकात प्रचलित असलेले सॉफ्टवेअर इत्यादि अडचणी आहेत. अर्थात ह्या अडचणींचा बाऊ करण्यापेक्षा 'वन टाईम लॉस' पत्करून का होईना बँकांच्या विलीनीकरण आणि पुनर्भांडवलीकरण हे दोन्ही पुढे रेटण्याचा तत्वत: निर्णय गेल्या ऑगस्टमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला

सरकारी मालकीच्या २१ बँका एकमेकात विलीन करून ह्या बँकांची संख्या १० ते १५ पर्यंत आणणे हा मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा गाभा आहे. त्यानुसार बँक विलीनीकरणाची तपशीलवार योजना तयार करण्यासाठी समिती नेमण्याचे ठरले. अनेक लहान मोठ्या बँकांना

आलेल्या तोट्याचे काय करायचे ह्या समस्येतून विलीनीकरणाची कल्पना पुढे आली. आता नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार बँक विलीनीकरणाचा तपशीलवार प्रस्ताव पुढे येणार आहे. येणाऱ्या काळात फक्त बड्या बँकांनाच भवितव्य राहील अशी कल्पना बँकिंग व्यवसायतल्या तज्ञांनी मांडली.

स्टेट बँक समूहातल्या पाच बँकांचे विलीनीकरण तुलनेने सोपे असल्याने ह्या पाच बँकांची विलीनीकरणाची प्रक्रिया दोन वर्षांपासून सुरू झाली आणि ती पूर्णही झाली. आता पंजाब नॅशनल बँक आणि बँक ऑफ बडोदा ह्या दोन मोठ्या बँकात दक्षिण भारतातील लहान बँका विलीन करण्याबाबत विचारविनिमय सुरू आहे. ह्या विचारविनिमयाचे फलित लौकरच पाह्यला मिळेल अशी आशा आहे. एक मात्र निश्चित की विलीनीकरणात कर्मचारी संघटनांनी घातलेला खोडा दूर करण्यात सरकारला बरेच यश आले आहे. आता, त्या त्या बँकांचे बॅलन्सशीट, त्यांचे समभाग मूल्य, एकूण कारभार, व्यावसायिक अडचणी ह्या सगळ्याचा समग्र विचार केल्याखेरीज विलीकरणाचा तपशीवार प्रस्ताव मंत्रिमंडळास सादर करता येणार नाही आणि विलीनीकरणाची प्रक्रियाही सुरू होणार नाही. म्हणूनच बँकांच्या विलीनीकरणास वेळ लागत आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांखेरीज अन्य लहान शेड्युल्ड बँका, तिपेडी राज्य सहकारी बँकांचा विषयही स्वतंत्र विषय असून त्यांची अवस्था राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा वाईट आहे. देशात एकूण ३० राज्य शिखर सहकारी बँका असून सुमारे ५० शेड्युल्ड अर्बन सहकारी बँका आहेत. महाराष्ट्रात राज्य सहकारी बँक ही शिखर बँक असून ३१ जिल्हा सहकारी बँका ह्या बँकेच्या सदस्य आहेत. साखर उद्योगास मोठ्या प्रमाणावर जिल्हा सहकारी बँकामार्फत वित्तपुरवठा करण्यात आला. परंतु गेल्या पाचसहा वर्षांत काही सन्माननीय अपवाद वगळता जिल्हा बँकांचेही काही ठीक चाललेले नाही. पावसाअभावी पीक हंगाम मार खाल्ल्याने ह्या बँकांची हालत अतिशय खराब झाली असून त्यांना अडचणीतून कसे काढायचे हा बिकट प्रश्न आहे. त्यात शेतकऱ्यांना कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे सुमारे ३८ लाख कोटींचा बोजा पडणार आहे. ह्याही वर्षी उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्रात शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणावर हे वित्तसाह्य दिले. त्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमाखेरीज सरकारला पर्याय नाही.

**स्टेट बँक समूहातल्या पाच बँकांचे विलीनीकरण तुलनेने सोपे असल्याने ह्या पाच बँकांची विलीनीकरणाची प्रक्रिया दोन वर्षांपासून सुरू झाली आणि ती पूर्णही झाली. आता पंजाब नॅशनल बँक आणि बँक ऑफ बडोदा ह्या दोन मोठ्या बँकात दक्षिण भारतातील लहान बँका विलीन करण्याबाबत विचारविनिमय सुरू आहे. ह्या विचारविनिमयाचे फलित लौकरच पाह्यला मिळेल अशी आशा आहे. एक मात्र निश्चित की विलीनीकरणात कर्मचारी संघटनांनी घातलेला खोडा दूर करण्यात सरकारला बरेच यश आले आहे.**

सुरूवातीस शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास सरकार अनुकूल नव्हते. परंतु जीडीपीत कृषी उत्पन्नाचा वाटा कमी होता कामा नये ह्या एकच हेतूने सरकारने कर्जमाफीला अनुकूलता दर्शवली. राष्ट्रियीकृत बँका, सहकारी बँका ह्याखेरीज नव्याने आलेल्या खासगी बँकांना प्रत्यक्ष मदत द्यावी लागली नाही. त्यांना भांडवल उभारणीसाठी परवानगी देताना मात्र सरकारने उदार धोरण अवलंबले. त्यामुळे त्या बँका अडचणीत येण्याचा प्रश्न आला नाही. नव्या खासगी बँकांना अमेरिकेत डिपॉझिटरी रिसीटच्या माध्यमातून भांडवल उभारण्याची परवानगी देण्यात आल्यामुळे त्यांचा मार्ग थोडा सोपा झाला. त्याखेरीज अन्य वित्तीय सेवा देण्याच्या व्यवसायात पदार्पण केलं. त्यांनी सुरूवातीलाच संगणकीय तंत्रज्ञानाची मदत घेतल्यामुळे औद्योगिक ग्राहक त्यांच्याकडे वळला. परिणामी त्यांना झपाट्याने प्रगती करता आली. अर्थात् संगणकीकरण आणि

आधुनिक बँकिंग तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास सरकारी मालकीच्या बँकांनाही परवानगी देण्यात आल्यामुळे त्यांचीही प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. परंतु दरम्यानच्या काळात सरकारी बँका अनुत्पादित कर्जाच्या विळख्यात सापडल्या. अनेक बँकांचे भांडवल त्यात 'साफ' झाले. त्यातून मार्ग काढण्याचे नेटाने प्रयत्न सुरू झाले आहेत.

पुनर्भांडवलीकरणासाठी सर्वंकष प्रयत्न करावा लागणार आहे ह्याची सरकारला जाणीव आहे. बँकांच्या विलीकरणानंतर १५-२० मोठ्या बँका जरी निर्माण करण्यात आल्या तरी त्या चालवण्यासाठी फार मोठ्या भांडवलाची आवश्यकता राहील हे हळुहळू स्पष्ट झाले आहे. ज्या काही बँकांनी भांडवल बाजारातून थोडेफार भांडवल गोळा केले तेही कमी पडते असे बँकांच्या लक्षात आले आहे. अधिक भांडवल गोळा करण्यासाठी आणखी निर्गुंतवणूक करणे आवश्यक होऊन बसणार आहे. निर्गुंवणुकीच्या बाबतीत अडचण अशी आहे की मुंबई भांडवल बाजारातून भांडवल उभे करण्यासाठी बॅलन्सशीट्सच्या बाबतीत सेबीने घालून दिलेल्या निकषांची पूर्तता करणे बँकांना अवघड ठरणारे आहे. काही वर्षांपासून सरकारी मालकीच्या प्रत्येक बँकेने सरकारला भांडवलावर परतावा दिलाच पाहिजे असे धोरण सरकारने अवलंबले. अर्थात ते योग्यच होते. त्याखेरीज परतावा देण्याइतका नफा त्यांना का होत नाही, ह्या प्रश्नात गेल्या दहा वर्षांपासून रिझर्व्ह बँकेने सातत्याने लक्ष घातले. अजूनही घालत आहे.

रिझर्व्ह बँकेने जेव्हा त्या प्रश्नाचा अभ्यास केला तेव्हा असे लक्षा येते की निव्वळ टार्गेट पूर्ण करून हा प्रश्न सुटणार नाही. बँकांची व्यवसायक्षमता, व्याजाचे दर, स्पर्धा, भांडवलपूर्तता, कर्ज देण्याच्या पध्दतीचा वेळोवेळी घेण्यात येणारा आढावा वगैरे विषयांचा अधिक तपशीलवा विचार करणे आवश्यक आहे. संसदेत ह्याविषयी होणाऱ्या चर्चा राजकीय अंगाने चालतात. परंतु समस्या सोडवताना राजकीय विचार करून चालत नाही. दरम्यानच्या काळात बँक व्यवसायाचे संगणकीकरण, कर्मचारीवृंदाचा सुटसुटीत ताफा, अधिकारीवर्गाचा सावध परंतु लवचिक दृष्टीकोन ह्या बाबतीत भारतातल्या बँकांची प्रगती झाली हे निश्चित. ही प्रगती थोडी मंद असली तरी ती निश्चितपण सुरू आहे. विशेष म्हणजे संगणकीकरणानंतर सायबर सुरक्षेच्या प्रश्नावर मात करण्यात बँकांना बऱ्यापैकी यश मिळाले आहे. सरकारी मालकीच्या सर्व आणि सहकारी व शेड्युल्ड बँकांची संगणकीय तंत्रज्ञानावर चांगली पकड निर्माण झाली आहे.

**पुनर्भांडवलीकरणासाठी सर्वंकष प्रयत्न करावा लागणार आहे ह्याची सरकारला जाणीव आहे. बँकांच्या विलीकरणानंतर १५-२० मोठ्या बँका जरी निर्माण करण्यात आल्या तरी त्या चालवण्यासाठी फार मोठ्या भांडवलाची आवश्यकता राहील हे हळुहळू स्पष्ट झाले आहे. ज्या काही बँकांनी भांडवल बाजारातून थोडेफार भांडवल गोळा केले तेही कमी पडते असे बँकांच्या लक्षात आले आहे. अधिक भांडवल गोळा करण्यासाठी आणखी निर्गुंतवणूक करणे आवश्यक होऊन बसणार आहे.**

नव्या डिजिटल सेवा सुरू करून त्या चालण्यासाठी करावा लागलेला भांडवली खर्च पुरतेपणाने वसूल झालेला नाही. विशेषत: एटीएम चालवण्याचा खर्च अधिक आहे. तंत्रज्ञानासाठी करण्यात आलेला अफाट खर्च परवडत नाही. त्यामुळे हा खर्च भरून काढण्यासाठी बँका कसोशीने प्रयत्न करत आहेत. परंतु त्याला मर्यादा आहेत. तंत्रज्ञानात्मक सेवांत गुणात्मक वाढ करण्यासाठी आणि अंगभूत सुरक्षितता विकसित करण्यासाठी भांडवली खर्च पुन्हा पुन्हा करावा लागतो. हा खर्च तुलनेने ह्यापूर्वी करण्यात आलेल्या खर्चापेक्षा कितीतरी अधिक असू शकतो.

सध्या एकीकडे बँकांचे मार्जिन कमी झाले असल्याचे चित्र दिसत आहे. सर्व प्रकारच्या बँकिंग सेवांसाठी येणाऱ्या खर्चापैकी अंशत: का होईना थोडा खर्च ग्राहकांनी उचलला पाहिजे तरच बँकांना वाजवी

नफा कमावता येईल. म्हणून बँकांना वेगवेगळे शुल्क आकारण्यास परवानगी देण्यात आली. कार्ड पेमेंट, नेटबँकिंग, कर्ज प्रोसेसिंग, कार्डपेमेंट इत्यादि सेवांसाठी थोडा खर्च सहन करण्याची ग्राहकांनीसुध्दा मनाची तयारी केली पाहिजे. तशी ती अद्याप झालेली नाही, असे चित्र दिसत आहे. कार्डवापरावरील बंधने, डिजिटल पेमेंटवरील मर्चंटस् कमिशन देण्यावरून कटकट इत्यादि प्रश्नावरून अनेक प्रकारची मते व्यक्त करण्यात येत असली तरी बँक व्यवसायाचे अद्यावतीकरण करण्यासाठी येणारा वाढता खर्च करावा लागणारच हाही मुद्दा भांडवल उभारणी करताना आवर्जून लक्षात घेण्यात आला आहे.

सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे येत्या तीनचार वर्षांत भारताच्या सर्वांगिण आर्थिक औद्यागिक प्रगतीचे लक्ष्य निर्धारित करण्याचा आहे. जीडीपी वाढवण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी बँकांची वित्तपुरवठा करण्याची क्षमता वृध्दिंगत होणेही गरजेचे आहे. म्हणूनच सरकारी बँकांना किती भांडवल लागणार आहे ह्याच अंदाज घेण्याचे काम अधिक तपशीवारपणे सुरू आहे. दरम्यानच्या काळात भांडवल उभारणी करण्याचा नेहमीचा अर्थसंकल्पाचा मार्ग फार उपयुक्त ठरणार नाही हे उघड आहे. त्यामुळे बँक भांडवल उभारणीसाठी खास बाँड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय सरकार प्रथमच घेत आहे असे नाही. ह्यापूर्वी १९८०-१९९० ह्या दशकात १९८५ ते १९९९ वर्षांत २०४ सहस्र रुपयांचे बाँड उभारण्यात आले होते. आता हे भांडवल पुरेसे ठरणार नाही. त्यामुळे ह्या वेळी बाँड उभारताना २०१९ वर्षाचे बॅलन्सशीट विचारात घेण्याचे ठरले आहे. त्यानुसार १.५ ते १.६ ट्रिलियन रुपयांची गरज पडू शकेल. भांडवलाचा हा आकडा अनेकांना जास्त वाटण्याचा संभव आहे. हे भांडवल अर्थातच एकाच वेळी द्यावे लागणार नाही हे एक आणि दुसरे म्हणजे हा आकडा ठरवताना तरता निधी आणि सध्याच्या समभागाचे बुकव्हॅल्यूपेक्षा अधिक मूल्य इत्यादि बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत. मुळात २०१७ वर्षांत समभागांचे मूल्य जास्त असले तरी ते एकच एक विचारात घेता येत नाही. कॉमन इक्विटी टायर 1 चा विचार करताना आणीबाणीची परिस्थितीदेखील विचारात घ्यावी लागते. ती तशी घेण्यात आल्यामुळे हा आकडा 'प्रचंड' वाटतो. थकित आणि बुडित कर्जाचे आकडेही विचारात घेण्यात आले आहेत. त्याखेरीज बँकिंग व्यवसायात ९.५ टक्के वाढही गृहित धरण्यात आली आहे.

ह्या वेळी बाँड उभारताना किती रकमेची गरज पडणार आहे, हे लक्षात घेण्यात आली असले तरी बँकांना भांडवल पुरवठा करताना त्या त्या बँकांची कारभारक्षमता, नफा मिळवण्याची क्षमता ह्या दोन मुद्द्यांचा विचार महत्त्वाचा असला पाहिजे असेही स्पष्ट मत व्यक्त करण्यात आले आहे. थोडक्यात, बँका कशी कामगिरी बजावतात ह्या मुद्द्याला आवर्जून महत्त्व देण्यात येणार आहे. बँकांनी त्यांच्या गरजेनुसार मागितले म्हणून त्यांना तेवढे भांडवल दिले असा प्रकार घडणार नाही. भांडवल पुरवठा करण्याची ही 'स्कीम' साधी नाही. नुसताच तोट्याच्या आकड्याचा विचार ह्यात नाही. जागतिककरणाच्या वातावरणात भारतातल्या बँकांना जागतिक स्पर्धेत उतरावे लागेल हेही ध्येय ठेवण्यात आले आहे. जागतिक बँक व्यवसायात भारत कुठेच नाही. ह्यापुढील काळात बँकांना आंतरराष्ट्रीय बँक व्यवसायातही दमदार पावले टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी लागणार आहे. त्यादृष्टीने मजबूत भांडवल योजना करण्याचे ध्येय ठेवावे लागेल. अनेक सरकारी प्रकल्पांना वित्तपुरवठा करताना सरकारी मालकीच्या बँका कमी पडल्या नाही हे खरे; परंतु ह्या पुढील काळ 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपचा' राहणार आहे. नव्या परिस्थितीत बँका कमी पडता काम नये हे ध्येय ठेवावे लागणार आहे. म्हणून एनपीएच्या संकटाचे संधीत रूपान्तर करण्याचा निर्णय अभूतपूर्व आहे.

■■■

*लेखक आर्थिक विषयाचे अभ्यासक आणि स्तंभलेखक आहेत.*

*email : rzawar@gmail.com*

## आपणास माहित आहे का?

# भारतीय नौदलाची अत्याधुनिक पाणबुडी आयएनएस कलवरी राष्ट्राला समर्पित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच भारतीय नौदलाची पाणबुडी आयएनएस कलवरी राष्ट्राला समर्पित केली. गेल्या महिन्यात मुंबईत झालेल्या नौदलाच्या एका विशेष सोहळयात बोलतांना देशातल्या जनतेचे अभिनंदन करत पंतप्रधान म्हणाले की, आयएनएस कलवरी म्हणजे 'मेक इन इंडिया' चे उत्तम उदाहरण आहे. या पाणबुडीच्या निर्मितीसाठी झटणाऱ्या सर्वांची प्रशंसा करताना ही पाणबुडी म्हणजे भारत आणि फ्रान्स यांच्यातल्या वेगाने वाढणाऱ्या धोरणात्मक भागिदारीचे प्रतिक असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. आयएनएस कलवरीमुळे भारतीय नौदलाच्या सामर्थ्यात आणखी भर पडेल, असा विश्वासही यावेळी पंतप्रधानांनी व्यक्त केला. गेल्या तीन वर्षात संरक्षणविषयक संपूर्ण परिसंस्थेत बदल व्हायला सुरुवात झाली आहे. आधुनिक काळात युध्द नीतीमध्ये, विनाशी, शक्तीशाली आणि आधुनिक तंत्रज्ञानयुक्त पाणबुडया आपल्या राष्ट्राच्या शांततेसाठी आणि जरब ठेवण्यासाठी अतिशय आवश्यक आहेत, असेही पंतप्रधान म्हणाले.

जागतिक स्तरावर २१ वे शतक हे आशियाचे शतक मानण्यात आले आहे, असे सांगताना पंतप्रधान म्हणाले की, निश्चितच या शतकात, विकासाचा मार्ग हिंदी महासागराद्वारे जाईल व म्हणूनच सरकारच्या धोरणात हिंदी महासागराला विशेष स्थान देण्यात आले आहे. Security and Growth for All in the Region- SAGAR, अर्थात प्रदेशातल्या सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास याद्वारे हा दृष्टिकोन समजून घेता येईल असेही ते म्हणाले. हिंदी महासागरात, जागतिक धोरणात्मक आणि आर्थिक हिताबाबत



INS Kalvari Dedicated to the Nation

भारत पूर्णत: जागरुक असून त्यामुळेच आधुनिक आणि बहुआयामी भारतीय नौदल, या प्रदेशात शांतता आणि स्थैर्याला प्रोत्साहन देण्यात महत्वाची भूमिका बजावत असल्याचेही पंतप्रधानांनी यावेळी सांगितले.

सागराच्या अंगभूत क्षमतेमुळे आपल्या राष्ट्राच्या विकासाला आर्थिक ताकदीची जोड मिळाली असल्याचे सांगून पंतप्रधान म्हणाले की, समुद्राशी संबंधित दहशतवाद, तस्करी, अंमली पदार्थांची वाहतूक या केवळ भारताला भेडसावणाऱ्या नव्हे तर इतर राष्ट्रांनाही सामोरे जावे लागणाऱ्या समस्यांविषयी पूर्ण जाणीव ठेऊन या आव्हानांचा मुकाबला करण्यात भारत महत्वाची भूमिका बजावत आहे. पंतप्रधान असेही म्हणाले की,'वसुधैव कुटुंबकम्' अर्थात संपूर्ण जग हे एक कुटुंबच आहे, अशी आपल्या देशाची धारणा असून त्याला अनुसरुनच भारत आपल्या जागतिक जबाबदाऱ्या निभावत आहे, तसेच आपल्या सहकारी राष्ट्रांना, संकटाच्या काळात मदतीचा हात देण्यासाठी आपण तत्पर असल्याचेही पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले. भारतीय राजनैतिक आणि सुरक्षा आस्थापनातला मानवी चेहरा हे आपले वैशिष्टय आहे, असे सांगत पंतप्रधान म्हणाले की, सामर्थ्यवान भारत मानवतेसाठी महत्वाची भूमिका बजावत आहे. शांतता आणि स्थैर्याच्या मार्गावर भारताच्या बरोबरीने वाटचाल करायची जगातल्या इतर देशांची इच्छा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भारतीय नौदल आणि फ्रान्सच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या प्रोजेक्ट ७५ अंतर्गत आयएनएस कलवरी मुंबईतल्या माझगाव बंदरात बांधण्यात आली आहे. फ्रान्सची नौदल संरक्षण आणि ऊर्जा कंपनी डीसीएनएस यांनी या पाणबुडीचे आरेखन केले आहे. स्कॉर्पेन वर्गातल्या भारतीय नौदलात समाविष्ट होणाऱ्या सहा पाणबुडयांपैकी ही पहिली पाणबुडी आहे. हिंदी महासागरात आढळणाऱ्या विक्राळ शार्कच्या नावावरुन कलवरी हे नाव देण्यात आले आहे.

■■■



# बँकांचे भांडवली पुनर्भरण

-आशुतोष कुमार



**सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या बुडीत कर्जाची रक्कम जून २०१७ मधे तब्बल ७ लाख ३३ कोटी रुपयांवर पोहचली. मार्च २०१५ मधे ती २ लाख ७३ कोटी रुपये होती. गेल्या दोन वर्षात बुडीत कर्जाच्या रकमेत तिपटीने वाढ झाली. स्थानिक बँकाच्या बुडीत कर्जाच्या प्रमाणात दहा टक्क्यांपेक्षा जास्त झालेली वाढ हे बँकींग प्रणाली समोर उभे ठाकलेले आव्हान आहे.**

बुडीत कर्जांमुळे गेल्या पाच वर्षात संकटात आलेल्या सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांना मोठा दिलासा देणारा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने २४ ऑक्टोबर २०१७ रोजी घेतला. बुडीत कर्जांमुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या ताळेबंदावर प्रचंड भार पडत होता. त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या कर्ज देण्याच्या क्षमतेवर होत होता. साहजिकच खाजगी क्षेत्रातली गुंतवणूक आणि भांडवल उभारणीलाही त्यामुळे मोठा फटका बसत होता. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या बुडीत कर्जाची रक्कम जून २०१७ मधे तब्बल ७ लाख ३३ कोटी रुपयांवर पोहचली. मार्च २०१५ मधे ती २ लाख ७३ कोटी रुपये होती. गेल्या दोन वर्षात बुडीत कर्जाच्या रकमेत तिपटीने वाढ झाली. स्थानिक बँकाच्या बुडीत कर्जाच्या प्रमाणात दहा टक्क्यांपेक्षा जास्त झालेली वाढ हे बँकींग प्रणाली समोर उभे ठाकलेले आव्हान आहे.

स्थानिक बँकांना आर्थिक मदत करण्यासाठी २ लाख ११ हजार कोटी रुपयांच्या अर्थ सहाय्याची घोषणा केंद्रीय मंत्रिमंडळाने २४ ऑक्टोबर रोजी केली. यात बाजारातून निधी उभारणी, अर्थसंकल्पीय पाठिंबा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बँकाचे पुनर्भांडवली रोखे बाजारात आणणे यांचा यात समावेश आहे. बँकांच्या सक्षमीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल , अधिक गुंतवणूक, पर्यायाने वेगाने विकास होईल असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी योजनेची घोषणा करताना व्यक्त केला. जाहिर केलेल्या २ लाख ११ हजार कोटी रुपयांपैकी १८ हजार कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतुदीतून, ५८ हजार कोटी बँकांनी समभागातून उभारायचे आहेत. तर, १ लाख ३५ हजार कोटी रुपये बँक पुनर्भांडवली रोख्यांच्या माध्यमातून उभे केले जाणार आहेत.

हे पुनर्भांडवली रोखे नेमके काय आहेत आणि बँकिंग क्षेत्राला कसे लाभदायक ठरणार आहेत याचा एकदा आढावा घेऊयात. अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक सेवा आणि वित्त व्यवहार विभागांनी संयुक्तपणे या रोख्यांचा सविस्तर आराखडा तयार

केला आहे. कोणत्या बँकेला संबंधित रोख्यातून किती भांडवल मिळणार आहे याची घोषणा लवकरच होईल. रोख्यांमधून उभारली जाणारी १ लाख ३५ हजारांची कोटींची राशी बँकिंग प्रणालीतच काही महिन्यात वळती केली जाईल. त्याने संकटात सापडलेल्या बँकिंग उद्योगाला अर्थसंजीवनी मिळणार आहे असं घोषणेवेळीच स्पष्ट करण्यात आले आहे.

पुनर्भांडवली रोख्यांची कार्यपद्धती आणि अर्थव्यवस्थेवर त्याच्या होणाऱ्या सकारात्मक परिणामांबाबतही जाणून घेऊया. केंद्र सरकार हे रोखे जारी करेल आणि बँका थेट ते खरेदी करतील अशी शक्यता आहे. यामुळे उभारलेला पैसा व्यवस्थेच्या बाहेर जाणार नाही. त्याची योग्य पद्धतीने नोंद होईल. पैसा दुसऱ्या हातात जाणार नाही. तो प्रणालीतच राहिल. पर्यायाने सरकारवरचे आर्थिक ओझे कमी होईल. बँकांना हे रोखे विकत घेतल्यावर बाजारात खुले करण्याची परवानगी सरकार देणार आहे की नाही हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. रोख्यांच्या रुपरेषेवर अर्थ मंत्रालय अजून काम करत आहे. त्यातल्या तपशीलांची पूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी अजून थोडी प्रतिक्षा करावी लागेल. या रोख्यांमुळे बँकांना लाभ होईल आणि त्यांची भांडवली क्षमता वाढेल. याबाबत चर्चा होऊ शकते. बँकांना हे रोखे बाजारात आणण्याची परवानगी मिळाली तर, बँका यातून पैसा उभारु शकतात. त्यामुळे, कर्जासंबंधित त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी हाती पैसा राहू शकतो. दुसऱ्या बाजुने विचार करता, रोखे विकण्याची परवानगी बँकांना मिळाली नाही तर, रोख्यांच्या स्वरुपात त्यांची गुंतवणूक होईल. व्याजाच्या रुपात नियमित उत्पन्न मिळत राहिल. दोन्ही बाजुंनी विचार करता पुनर्भांडवली रोखे बँकिंग व्यवस्थेसाठी लाभदायकच आहेत.

**हेअरकटच्या पार्श्वभूमीवर अनेक कर्जबाजारी कंपन्या प्रकरणांच्या सोडवणूकीसाठी पुढे येत आहेत. तज्ज्ञांच्या मते मोठ्या बुडीत कर्जांप्रकरणी ६० टक्केपर्यंत हेअरकट लागू होऊ शकते. हेअरकट म्हणजे कर्ज घेणाऱ्याने तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेचा बाजारभाव आणि कर्जाची रक्कम यातली तफावत. ही तफावत जेवढी जास्त तेवढी कर्ज देणाऱ्या बँकेची जोखीम अधिक.**

विमुद्रीकरणानंतर बँकांमधे प्रचंड प्रमाणात जमा झालेल्या चलनाच्या पार्श्वभूमीवर पुनर्भांडवली रोख्यांचे पाऊल योग्य दिशेने उचलले असल्याचे स्पष्ट होते. रिझर्व बँकेने जाहीर केल्याप्रमाणे चलनातून बाद केलेल्या ५०० आणि १००० रुपयांच्या ९९ टक्के नोटा बँकांच्या माध्यमातून परत आल्या आहेत.

दिवाळखोरी आणि प्रलंबित आर्थिक प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर कायद्याच्या दृष्टीने पाहाता या रोख्यांचे मोठे महत्व आहे. संबंधित नियमाचा मसुदा गेल्या वर्षी तयार करण्यात आला. ३०० खात्यांप्रकरणी सोडवणुकीसाठी आतापर्यंत त्याचा उपयोग झाला आहे. यातली बारा खाती तब्बल २ लाख २५ हजार कोटी रुपये बुडीत कर्जांची होती. रिझर्व बँकेने ती नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलकडे या वर्षी जूनमधे पाठवली होती. बँका आणि काळ्या यादीतल्या संबंधित कंपन्यांनी आपली प्रकरणे मिळून सोडवली नाहीत तर आणखी २९ प्रकरणेही पुढल्या महिन्यात लवादाकडे पाठवली जाण्याची शक्यता आहे. हेअरकटच्या पार्श्वभूमीवर अनेक कर्जबाजारी कंपन्या प्रकरणांच्या सोडवणूकीसाठी पुढे येत आहेत. तज्ज्ञांच्या मते मोठ्या बुडीत कर्जांप्रकरणी ६० टक्केपर्यंत हेअरकट लागू होऊ शकते. हेअरकट म्हणजे कर्ज घेणाऱ्याने तारण म्हणून ठेवलेल्या मालमत्तेचा बाजारभाव आणि कर्जाची रक्कम यातली तफावत. ही तफावत जेवढी जास्त तेवढी कर्ज देणाऱ्या बँकेची जोखीम अधिक.

क्रिसिलचा अहवाल जुलै महिन्यात प्रसिद्ध झाला. त्यानुसार बुडीत कर्जाची मोठी संख्या असलेल्या ५० खात्यांच्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बँकांना हेअरकटची मोठी जोखीम घ्यावी लागली. कारण प्रश्न होता ४ लाख कोटी रुपयांचा. अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या क्षेत्रासंबंधित या कंपन्या होत्या. उदाहरणार्थ, मेटल उद्योग ( एकूण कर्जाच्या ३० टक्के खाती), बांधकाम उद्योग ( २५ टक्के),

ऊर्जा क्षेत्र(१५ टक्के) , एकूण बुडीत कर्जांपैकी अर्धे कर्ज याच क्षेत्रातल्या कंपन्याच्या खात्याचे होते. ही गोष्ट आहे यावर्षीच्या ३१ मार्चची.

मानांकन एजन्सीच्या अहवालानुसार चार लाख कोटींच्या बुडीत कर्जांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी बँकांना ५० मोठ्या खात्यांप्रकरणी तब्बल ६० टक्के हेअरकटची जोखीम घेत २ लाख ४० हजार कोटी रुपये मिळवावे लागतील.

या हेअरकटचे चार श्रेणींमधे एजन्सीने वर्गीकरण केले आहे. गाळात गेलेल्या ( ७५ टक्केपेक्षा जास्त), अतितीव्र (५०-७५ टक्के), मध्यम(२५-५० टक्के), साधारण(२५ टक्केपेक्षा कमी). साधारण आणि मध्यम कर्ज प्रकरणी २५ तर अतितीव्र आणि गाळात गेलेल्या प्रकरणी ४० टक्केपर्यंतचे हेअरकट पाऊल अशी रचना असू शकते असते, असे एजन्सीचे म्हणणे आहे.

**रोखे जारी झाल्यानंतर अतिसूक्ष्म अर्थव्यवस्थेवर ते कसा परिणाम करतील तसेच आर्थिक तुटीवर त्याचा काय प्रभाव पडेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. या रोख्यांची वार्षिक व्याज राशी ८ हजार ते ९ हजार कोटी रुपयांदरम्यान असणार आहे. पुनर्भांडवली रोख्यांमुळे चलनफुगवठा किंवा आर्थिक तुटीत वाढ होणार नसल्याचेही मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रहमण्यम यांनी स्पष्ट केले आहे.**

क्षेत्रांचा विचार करता ऊर्जा क्षेत्राला मध्यम हेअरकटची, मेटल आणि बांधकाम क्षेत्राला अतितीव्र हेअरकटची गरज आहे. अशाश्वत उद्योग क्षेत्राला गाळातून बाहेर काढण्यासाठी त्या दर्जाच्या हेअरकटची गरज असल्याचे क्रिसिलचे म्हणणे आहे. भांडवल उभारणी आणि प्रकल्प सुरु ठेवण्यासाठी तसेच वेळेत पूर्ण करण्यातकरिता ही हेअरकट गरजेची आहे. नाहीतर कंपन्यांना फटका बसेल.

याशिवाय, तात्पुरतं नुकसान झालेल्या कंपन्यांना सावरण्यासाठी मध्यमस्वरुपाच्या हेअरकटची गरज असल्याचे क्रिसिलच्या अहवालात म्हटले आहे. अर्थव्यवस्थेच्या हितासाठी अगदीच नुकसान सोसण्यापेक्षा हेअरकटची कडू गोळी गिळणं अधिक बरे असल्याचे एजन्सीचे म्हणणे आहे.



BASEL III, PSBs नियमांतर्गत ही प्रकरणं मार्गी लावण्याची प्राथमिक जबाबदारी केंद्र सरकारची आहे. यादृष्टीने पुनर्भांडवली रोखे अगदी योग्य आहेत. यासंदर्भातल्या तपशीलांची घोषणा सरकारने केल्यावर त्यात अधिक स्पष्टता येईल.

रोखे जारी झाल्यानंतर अतिसूक्ष्म अर्थव्यवस्थेवर ते कसा परिणाम करतील तसेच आर्थिक तुटीवर त्याचा काय प्रभाव पडेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. या रोख्यांची वार्षिक व्याज राशी ८ हजार ते ९ हजार कोटी रुपयांदरम्यान असणार आहे. पुनर्भांडवली रोख्यांमुळे चलनफुगवठा किंवा आर्थिक तुटीत वाढ होणार नसल्याचेही मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रहमण्यम यांनी स्पष्ट केले आहे. खात्यांवर होणारा रोख्यांचा परिणामच आर्थिक तुटीबाबतचे चित्र स्पष्ट करु शकेल.

१ लाख ३५ हजार कोटी रुपयांच्या पुनर्भांडवली रोख्यांवरच्या व्याजामुळे चलनफुगवटा वाढणार नाही की आर्थिक तुटीला त्यामुळे गती मिळणार नाही, असे मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रह्मण्यम यांनी म्हटले आहे. ते रोख्यांची घोषणा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी दिल्ली विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलत होते. आपल्याकडची लेखापद्धत लक्षात घेता, पुनर्भांडवली रोख्यांमुळे कर्जामधे वाढ होईल, त्यामुळे आर्थिक तुटही होऊ शकते पण IMF प्रणाली अंतर्गत सज्जता राहिल्यास असे होणार नाही, असे त्यांनी व्याख्यानात स्पष्ट केले.

केंद्र सरकार करत असलेल्या व्यापक आर्थिक तसेच बँकिंग सुधारणांचाच हे पुनर्भांडवली रोखे हा ही एक भागच आहे. या सुधारणांसाठी सरकार वचनबद्ध आहे. गुरगाव इथे १२ नोव्हेंबर २०१७ रोजी झालेल्या पीएसबी मंथन कार्यक्रमात बँकिंग आणि आर्थिक सेवा सचिव राजीव कुमार यांनीही भांडवलाचा पाया वाढवणे हे जबाबदारीशी जोडले जाणार असल्याचे संकेत दिले होते. सर्व काही बँकिंग सुधारणांशी जोडले जाणार आहे. तुम्ही उद्योग कशाप्रकारे पुढे नेणार आहात? प्रत्येक पैशाची देवाण घेवाण महत्वाची आहे. बँकिंग सुधारणांमधे हे सारे अंतर्भूत असलेच पाहिजे. बँक मंडळे सक्षम व्यवस्था उभारण्याच्या दृष्टीने विस्तृत आणि स्पष्ट आराखड्याची भूमिका घेत आहेत असेही कुमार यांनी सांगितले.

पुनर्भांडवलीकरण स्वत: येणार नाही तर आर्थिक आणि बँकिंग सुधारणांच्या मागोमाग त्याला यावे लागेल. पुनर्भांडवली रोखे ही प्राथमिकता असून यंदाच ते आणले जातील असे कुमार यांनी सांगितले.

दरम्यान, कॉर्पोरेट जगतानेही बँकांच्या पुनर्भांडवलीकरणाला भक्कम पाठिंबा दर्शवला आहे. बँकिंग क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी सल्ला द्यावा असे भारतीय औद्योगिक महासंघाने अर्थसंकल्पपूर्व सादरीकरणावेळी केंद्रिय अर्थ मंत्री अरुण जेटली यांनी सूचवले होते. बँकांना रोखे बाजारात आणण्याची परवानगी द्यावी म्हणजे विविध गुंतवणूकदार संस्था आणि अगदी सामान्य नागरिकही ते खरेदी करु शकतील असे महासंघाने यावेळी सांगितले.

■■■

*लेखक बीटीव्हीआय या वृत्तवाहिनीत सहाय्यक संपादक असून पायाभूत सुविधा, सूक्ष्म अर्थव्यवस्था आणि कररचना यासह अनेक आर्थिक विषयाच्या पत्रकारितेचा त्यांना १२ वर्षांचा अनुभव आहे.*

*Email :kr.ashuog@gmail.com*


## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, हे नम्र आवाहन.

उपाय

# मिशन इंद्रधनुष्य आणि बँकिंगमधील फेरबदल

**डी. एस. मलिक**




**बँकांच्या विलिनीकरणासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे जलदगतीने विलिनीकरण घडवून आणणाऱ्या एका पर्यायी यंत्रणेची उभारणी करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग प्रणालीमध्ये फेरबदल करण्यासाठी होणारे हे तातडीचे प्रयत्न असल्याचे वाटू शकते. मात्र, सरकारने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने ही पावले उचलली आहेत आणि त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत.**

सार्वजनिक क्षेत्रातील बँकाना बळकटी देण्यासाठी पुढील दोन वर्षात २.११ लाख कोटी रुपयांचे भांडवल या बँकांना देण्याच्या सरकारच्या घोषणेमुळे गेल्या दोन महिन्यांपासून आर्थिक सेवा क्षेत्रात मोठी हालचाल दिसू लागली आहे. दिवाळखोरी कायद्यातील सुधारणांच्या अनुषंगाने आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या विलिनीकरणावर भर देण्याच्या उद्देशाने सरकारने ही घोषणी केली. बँकांच्या विलिनीकरणासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे जलदगतीने विलिनीकरण घडवून आणणाऱ्या एका पर्यायी यंत्रणेची उभारणी करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग प्रणालीमध्ये फेरबदल करण्यासाठी होणारे हे तातडीचे प्रयत्न असल्याचे वाटू शकते. मात्र, सरकारने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने ही पावले उचलली आहेत आणि त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका असल्याने विद्यमान सरकारने २०१४ मध्ये सत्ता हाती घेतल्यापासून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामगिरीबाबत सातत्याने चर्चा होत आहेत. गेल्या काही वर्षात पायाभूत सुविधा क्षेत्राला अर्थसाहाय्य उपलब्ध करण्यामध्ये मोठा वाटा उचलणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या योगदानावर जमीन संपादन आणि मंजुरीमधील विलंब, जागतिक आणि स्थानिक पातळीवर मागणीत झालेली घट अशा विविध कारणांनी परिणाम झाला आणि त्यांच्या नफ्यामध्ये घट झाली. अशा प्रकारच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी २०१५ मध्ये सरकारने 'इंद्रधनुष योजना' या नावाने लोकप्रिय झालेली योजना तयार केली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना पुन्हा भांडवलाचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने १४ ऑगस्ट २०१५ रोजी देशाच्या राजधानीत या योजनेची घोषणा केली. १९७० साली बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या प्रक्रियेनंतर आतापर्यंत सरकारने हाती घेतलेल्या सर्वाधिक समावेशक सुधारणांपैकी ही एक सुधारणा आहे.

**नियुक्त्या:** यापुढे जी पदे भरण्यात येतील त्यामध्ये सीईओला व्यवस्थापकीय संचालकाचे व सीईओचे पद मिळेल आणि आणखी एक पद असे असेल ज्या पदावरील व्यक्ती सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा बिगर कार्यकारी अध्यक्ष असेल, असे नमूद करून सरकारने अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांची पदे वेगळी करण्याचा निर्णय घेतला.

✯ **बँक बोर्ड ब्युरो:** बँक बोर्ड ब्युरो हे नामवंत व्यावसायिक आणि अधिकारी यांचे मंडळ असेल जे पूर्ण वेळ संचालक आणि सार्वजनिक बँकांच्या बिगर कार्यकारी अध्यक्षांच्या नियुक्ती मंडळाची जागा घेईल. सार्वजनिक बँकांची वृद्धी आणि विकास याकरता योग्य धोरणाची आखणी करण्यासाठी ते सर्व सार्वजनिक बँकांच्या संचालक मंडळाच्या सातत्याने संपर्कात राहील.

✯ **भांडवलीकरण**: सद्यस्थितीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडे पुरेसे भांडवल आहे आणि त्यांच्याकडून बेसिल ३ आणि रिझर्व बँकेच्या निकषांची पूर्तता होत आहे. मात्र, बँकांकडे बेसिल ३ निकषांपेक्षा अधिक जास्त राखीव रकमेचा एक सुरक्षित साठा असावा असा भारत सरकारचा हेतू आहे आणि त्यासाठी या बँकांना आणखी पुरेशा भांडवलाचा पुरवठा करायचा आहे. २०१९ या आर्थिक वर्षापर्यंतच्या पुढील चार वर्षांपर्यंत अतिरिक्त भांडवलाची गरज सुमारे १,८०,००० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.सध्याच्या वर्षातील १२% आणि पुढील तीन वर्षात १२% ते१५% या कर्जाच्या वृद्धीदरावर आधारित हा अंदाज आहे. बँकांचे आकारमान आणि त्यांची वृद्धी क्षमता यावर तो अवलंबून आहे. एकूण गरजेपैकी चार वर्षांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदी व्यतिरिक्त ७०००० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचा भारत सरकारचा प्रस्ताव आहे.

**सद्यस्थितीमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडे पुरेसे भांडवल आहे आणि त्यांच्याकडून बेसिल ३ आणि रिझर्व बँकेच्या निकषांची पूर्तता होत आहे. मात्र, बँकांकडे बेसिल ३ निकषांपेक्षा अधिक जास्त राखीव रकमेचा एक सुरक्षित साठा असावा असा भारत सरकारचा हेतू आहे आणि त्यासाठी या बँकांना आणखी पुरेशा भांडवलाचा पुरवठा करायचा आहे. २०१९ या आर्थिक वर्षापर्यंतच्या पुढील चार वर्षांपर्यंत अतिरिक्त भांडवलाची गरज सुमारे १,८०,००० कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.सध्याच्या वर्षातील १२% आणि पुढील तीन वर्षात १२% ते१५% या कर्जाच्या वृद्धीदरावर आधारित हा अंदाज आहे.**

✯ (अ) सरकारी बँकांची ताणमुक्ती: गेल्या दशकांमध्ये पायाभूत सुविधा क्षेत्र आणि विविध प्रमुख प्रकल्पांना सार्वजनिक बँकांकडून मोठ्या प्रमाणावर अर्थसाहाय्य उपलब्ध करण्यात आले. पण विविध कारणांमुळे हे प्रकल्प ठप्प झाले/ अडचणीत आले आणि त्यामुळे त्यांना अर्थसाहाय्य करणा-या बँकांवरील थकित कर्जाचा बोजा वाढला. अलीकडेच घेतलेल्या एका आढाव्यानुसार उर्जा, पोलाद आणि रस्तेबांधणी क्षेत्रांवर परिणाम करणा-या घटकांचा अभ्यास करण्यात आला. विशिष्ट क्षेत्रातील संबंधितांशी चर्चा करण्यात आली. या बैठकांनंतर खालीलप्रमाणे काही उपाययोजना करण्यात आल्या:-

✯ प्रकल्प देखरेख गट (मंत्रिमंडळ सचिवालय)/संबंधित मंत्रालये प्रलंबित मंजुरी/ परवान्याच्या मुद्द्याचा त्वरेने निपटारा करण्यासाठी संबंधित संस्थांशी संपर्क साधून पाठपुरावा करतील.

✯ प्रकल्प अंमलबजावणी/ कार्यान्वयनाला चालना देण्यासाठी संबंधित मंत्रालयांकडून/ विभागांकडून प्रलंबित धोरणांच्या निर्णयाचा मुद्दा हाती घेतला जातो.

✯ कोळसा/पीएनजी मंत्रालय या प्रकल्पांसाठी दीर्घकाळ इंधन उपलब्ध करणारी धोरणे तयार करेल.

✯ संबंधित वितरण कंपन्यांना तातडीच्या सुधारणांबाबत मदतीचा हात देण्यात येईल

✯ या प्रकल्पांची खालावत जाणारी स्थिती सुधारण्यासाठी प्रवर्तकांना अतिरिक्त अर्थसाहाय्याचा पुरवठा करण्यास सांगितले जाईल.

ज्या ज्या वेळी प्रवर्तकांना ही गरज पूर्ण करणे शक्य होणार नाही त्या वेळी इतर पर्यायांचा किंवा व्यवस्थापन आपल्या नियंत्रणात आणण्याचा विचार बँका करू शकतील.

✯ निम्न स्तरावरील वापरकर्त्या उद्योगावर विपरित प्रभाव न टाकता कररचनेमध्ये बदल करण्याच्या शक्यतेचा सरकार विचार करू शकेल. पोलादावरील आयात शुल्क वाढवण्याचा निर्णय सरकारने आधीच घेतला आहे.

✯ ज्या ज्या ठिकाणी बँकांना व्यवहार्य वाटेल त्या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जाची पुनर्रजना करण्यामध्ये आणखी काही प्रमाणात लवचिकता आणण्याची परवानगी देण्याची विनंती रिझर्व बँकेला करण्यात आली आहे.

**(ब) जोखीम नियंत्रण उपायांना बळकटी व थकित कर्जाची माहिती जाहीर करणे**

थकित कर्जाच्या समस्येची हाताळणी करण्यासाठी कर्जवसुलीच्या प्रयत्नांव्यतिरिक्त डीआरटी व सरफासी यंत्रणेअंतर्गत खालील अतिरिक्त उपाय करण्यात आले आहेत.:

✯ २०१४ मध्ये रिझर्व बँकेने 'आर्थिक वैफल्याचे जलद निदान, हाताळणीसाठी तातडीचे उपाय व कर्जपुरवठादाराच्या कर्जाची न्याय्य वसुली: अर्थव्यवस्थेतील अडचणीत असलेल्या मालमत्तांना नवी उर्जा पुरवण्यासाठी आराखडा' यांसाठी संकटात असलेल्या मालमत्तांना ओळखण्यासाठी आणि त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध उपाय सुचवणारी मार्गदर्शक तत्वे जारी केली.

✯ रिझर्व बँकेने आता सहकार्य न करणारे कर्जदार अशी कर्जदारांची नवी श्रेणी तयार केली आहे. एखाद्या कर्जपुरवठादाराकडे पुन्हा कर्ज मागणाऱ्या कर्जदाराला सहकार्य न करणारा कर्जदार समजले जाईल आणि त्यावर अधिक जास्त कारवाई केली जाईल.

**रिझर्व बँकेने मालमत्ता पुनर्रचना कंपन्याचे निकष अधिक कडक केले आहेत. यापूर्वी सिक्युरिटी रिसिप्ट्समध्ये किमान गुंतवणुकीची मर्यादा ५ टक्के होती ती आता १५ टक्के करण्यात आली आहे. या पावलामुळे मालमत्ता पुनर्रचना कंपन्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तांमधील त्यांच्या रोख रकमेच्या वाट्यामध्ये वाढ होईल आणि त्यामुळे रोख रकमेचा साठा वाढून बँकांना त्यांचा ताळेबंद स्वच्छ राखण्यासाठी मदत होईल.**

✯ मालमत्ता पुनर्रचना कंपन्या (ARCs): रिझर्व बँकेने मालमत्ता पुनर्रचना कंपन्याचे निकष अधिक कडक केले आहेत. यापूर्वी सिक्युरिटी रिसिप्ट्समध्ये किमान गुंतवणुकीची मर्यादा ५ टक्के होती ती आता १५ टक्के करण्यात आली आहे. या पावलामुळे मालमत्ता पुनर्रचना कंपन्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तांमधील त्यांच्या रोख रकमेच्या वाट्यामध्ये वाढ होईल आणि त्यामुळे रोख रकमेचा साठा वाढून बँकांना त्यांचा ताळेबंद स्वच्छ राखण्यासाठी मदत होईल.

✯ सहा नव्या कर्जवसुली न्यायाधिकरणांची(डीआरटी) स्थापना: बँकिंग क्षेत्रातील थकित कर्जाची जलदगतीने वसुली करण्यासाठी चंदीगड, बंगळूरु, एर्नाकुलम, डेहराडून, सिलिगुडी, हैदराबाद या ठिकाणी सहा नव्या कर्जवसुली न्यायाधिकरणांची(डीआरटी) स्थापना करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

✯ सक्षमीकरण: सरकारकडून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही आणि संस्थेचे व्यावसायिक हित लक्षात घेऊन आपले निर्णय स्वतंत्रपणे घेण्यास बँकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे, असे परिपत्रक सरकारने काढले आहे.

✯ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामगिरीसाठी प्रमुख कामगिरी निर्देशांकाच्या चौकटीचे मोजमाप करणे.

✯ अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक सेवा विभागाने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसाठी एक परिपत्रक जारी करून आर्थिक गैरव्यवहारांच्या तक्रारी सीबीआयकडे दाखल

करण्याबरोबरच प्रत्येक प्रकरणावर जवळजवळ दररोज देखरेख करण्यासाठी अतिशय कठोर कालमर्यादा निर्धारित केली आहे.

✯ आपल्या कर्मचाऱ्यांचे संगनमत असलेल्या प्रकरणांसह मोठ्या घोटाळ्यांची तपासाची प्रक्रिया अतिशय सरळसोपी करणे. कर्जाच्या घोटाळ्यांशी संबंधित प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी रिझर्व बँकेने मे, २०१५ मध्ये मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.

✯ **प्रशासनविषयक सुधारणा**:

प्रशासनविषयक सुधारणांची प्रक्रिया २०१५ मध्ये पुण्यामध्ये आयोजित केलेल्या 'ग्यानसंगम' या सार्वजनिक क्षेत्रातील बँका व वित्तीय संस्थांच्या परिषदेत सुरू झाली. या परिषदेला रिझर्व बँकेचे गव्हर्नर, सर्व सार्वजनिक बँका आणि वित्तीय संस्था यांचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक(सीएमडी) यांच्यासह सर्व संबंधित उपस्थित होते. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी, अर्थमंत्री श्री. अरुण जेटली, तत्कालिन अर्थराज्यमंत्री श्री. जयंत सिन्हा यांनी सर्व संबंधितांना या परिषदेत मार्गदर्शन केले आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला. बँकिंग क्षेत्राला आर्थिक स्वायत्तता देण्यासह ही प्रणाली सुधारण्याबाबत सरकारचा दृष्टिकोन पंतप्रधानांनी त्यांच्यासमोर मांडला आणि त्यांच्या दैनंदिन वाणीज्य व्यवहारात सरकारकडून कोणताही हस्तक्षेप होणार नसल्याची ग्वाही दिली.मात्र, हे सर्व उत्तरदायित्वावर अवलंबून असेल असे पंतप्रधान म्हणाले आणि त्यांच्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत ते सांगितले. जोखीम व्यवस्थापन पद्धतींना बळकटी देण्याचा समावेश 'ग्यानसंगम' ने केलेल्या अनेक शिफारशींमध्ये आहे. मनुष्यबळ व्यवस्थापन पद्धतींमध्ये सुधारणा करण्यावर आणि अडथळे दूर करण्यावर भर देण्यात आला आहे जेणेकरून सामायिक संसाधनांचा एकमेकांसोबत वापर करू शकतील आणि त्यावर काम करू शकतील. बँकांच्या मंडळांना सक्षम करण्यासाठी विविध पावले उचलण्यात आली आहेत.

**बँकिंग क्षेत्राला आर्थिक स्वायत्तता देण्यासह ही प्रणाली सुधारण्याबाबत सरकारचा दृष्टिकोन पंतप्रधानांनी त्यांच्यासमोर मांडला आणि त्यांच्या दैनंदिन वाणीज्य व्यवहारात सरकारकडून कोणताही हस्तक्षेप होणार नसल्याची ग्वाही दिली.मात्र, हे सर्व उत्तरदायित्वावर अवलंबून असेल असे पंतप्रधान म्हणाले आणि त्यांच्याकडून कोणत्या अपेक्षा आहेत ते सांगितले.**

गेल्या एका वर्षात, बँकिंग सुधारणांसदर्भात खूप मोठा बदल घडवून आणणाऱ्या उपायांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

✯ दिवाळखोरी आणि विलयनरोधी संहिता- विलयनरोधी आणि दिवाळखोरी संहिता २०१६(संहिता) २८ मे २०१६ रोजी लागू करण्यात आली. कंपन्याचे विलयन आणि मर्यादित उत्तरदायित्व संस्था( मर्यादित उत्तरदायित्व भागीदारी आणि मर्यादित उत्तरदायित्व असलेल्या संस्थांसहित) अमर्यादित उत्तरदायित्व भागीदाऱ्या आणि व्यक्ती या सध्या वेगवेगळ्या कायद्यांच्या कक्षेत असलेल्या विषयांचे एकत्रिकरण करून त्यांना एकाच कायद्याच्या कक्षेत आणण्याच्या उद्देशाने ही संहिता लागू करण्यात आली. जाणीवपूर्वक कर्ज थकवणाऱ्यांना त्यांच्या ज्या गहाण मालमत्तांनी बँकांच्या थकबाकीचे आकारमान वाढवले त्यांना त्यांच्या या मालमत्तासाठी नव्याने बोली लावता येऊ नये यासाठी अलीकडेच आयबीसी मध्ये सुधारणा करण्यात आल्या.

✯ सार्वजनिक बँकांचे पुनर्भांडवलीकरण– कर्जाच्या वृद्धीला आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी सरकारने सार्वजनिक बँकांचे पुनर्भांडवलीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये चालू आर्थिक वर्षात जास्तीत जास्त भांडवलाचे संकलन, पुढील दोन वर्षात सुमारे २,११,००० कोटी रुपयांचे संकलन १८,१३९ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद आणि

रोख्यांचे सुमारे १,३५,००० रुपयांचे पुनर्भांडवलीकरण आणि उर्वरित भांडवलाची उभारणी बाजारातून बँकाकरवी उचल करून सरकारी समभागांचे विरलीकरण करण्याची व्यवस्था आहे. यातून कर्जाच्या मागणीत वाढ आणि रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

✯ बँकांचे एकत्रिकरण- गेल्या काही वर्षांपासून रिझर्व बँकेच्या समोर बँकांच्या एकत्रिकरणाचा विषय असला तरी बँकिंग क्षेत्रात एसबीआयच्या सहा सहयोगी बँका आणि भारतीय महिला बँकेचे एसबीआयसोबतचे विलिनीकरण वगळता विशेष प्रमुख विलिनीकरण प्रक्रिया झालेल्या नाहीत. खाजगी क्षेत्रात काही विलिनीकरण प्रक्रिया घडल्या आहेत. रिझर्व बँकेचे गव्हर्नर उर्जित पटेल यांनी म्हटले आहे की जर सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील काही मोजक्याच परंतु भक्कम बँकांचे विलिनीकरण झाले तर भारतीय बँकिंग प्रणाली आणखी चांगली होऊ शकेल. संकटात असलेल्या मालमत्तांची समस्या त्यामुळे दूर होऊ शकेल.

दरम्यान, केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या एकत्रिकरणासाठी केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री श्री. अरुण जेटली यांच्या अध्यक्षतेखाली एक पर्यायी यंत्रणा निर्माण केली आहे. या पर्यायी यंत्रणेची रचना खालीलप्रमाणे आहे.

अध्यक्ष: श्री. अरुण जेटली, अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री

सदस्य : श्री. पियुष गोयल, रेल्वे आणि कोळसा मंत्री

सदस्य : श्रीमती निर्मला सीतारमण, संरक्षणमंत्री.

बँकांच्या एकीकरणाच्या योजना तयार करण्यासाठी बँकांकडून तत्वत: मान्यता मिळवण्यासाठी आलेले प्रस्ताव सदर पर्यायी

---

**केंद्र सरकार नजीकच्या भविष्यात इंद्रधनुष २.० आणण्याच्या विचारात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कर्जपुरवठादारांच्या पुनर्भांडवलीकरणाची ही एक सर्वसमावेशक योजना आहे. या बँका विलयक्षम राहतील आणि जागतिक भांडवल उपलब्धतेच्या बेसिल-३ निकषांचे अनुपालन करणाऱ्या असतील. मात्र, रिझर्व बँकेकडून घेतल्या जाणाऱ्या मालमत्ता दर्जा आढाव्याचे तपशीलवार मूल्यमापन केल्यानंतरच ही योजना अंतिम केली जाईल.**

---

यंत्रणेसमोर मांडले जातील. या प्रस्तावावरील पर्यायी यंत्रणेने मंजूर केलेला अहवाल दर तीन महिन्यांनी मंत्रिमंडळाकडे पाठवला जाईल. एकीकरणाचे प्रस्ताव पडताळून पाहण्याचे निर्देश देखील ही यंत्रणा बँकांना देऊ शकेल. पर्यायी यंत्रणा तत्वत: मान्यता देण्यापूर्वी रिझर्व बँकेकडून माहिती मिळवेल. ही यंत्रणा बँकांकडून प्राप्त झालेल्या एकीकरणाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी स्वत:ची प्रक्रिया निर्माण करेल आणि राष्ट्रीयीकरण कायदे( बँकिंग कंपन्या( अधिग्रहण व उपक्रमांचे हस्तांतरण) कायदे १९७० व १९८० यानुसार राबवेल.

तयार झालेल्या अंतिम योजनेला केंद्र सरकार मंजुरी देईल व संसदेच्या दोन्ही सभागृहात ती सादर केली जाईल. या उद्देशाने अर्थसाहाय्य सेवा विभागाकडून पर्यायी यंत्रणेचा वापर करण्यात येईल.

वरील योजने व्यतिरिक्त केंद्र सरकार नजीकच्या भविष्यात इंद्रधनुष २.० आणण्याच्या विचारात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कर्जपुरवठादारांच्या पुनर्भांडवलीकरणाची ही एक सर्वसमावेशक योजना आहे. या बँका विलयक्षम राहतील आणि जागतिक भांडवल उपलब्धतेच्या बेसिल-३ निकषांचे अनुपालन करणाऱ्या असतील. मात्र, रिझर्व बँकेकडून घेतल्या जाणाऱ्या मालमत्ता दर्जा आढाव्याचे तपशीलवार मूल्यमापन केल्यानंतरच ही योजना अंतिम केली जाईल. या आकड्यांना नव्याने विचारात घेतले जाईल आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या भांडवलीकरण कार्यक्रमाकडे नव्याने पाहिले जात असून एक सुधारित कार्यक्रम इंद्रधनुष-२ चा भाग म्हणून सुरू केला जाईल.

■■■

*लेखक भारत सरकारच्या पत्रसूचना कार्यालयाचे महासंचालक असून अर्थ मंत्रालय, कंपनी व्यवहार मंत्रालय आणि स्पर्धा आयोगाचे प्रसारमाध्यमविषयक काम पाहत आहेत.*

*email :dprfinance@gmail.com*

# वित्तीय समावेशन सुविधा देण्यात बँकांची भूमिका

चरण सिंग आणि शिवकुमार रेड्डी के



**भारत हा वित्तीय समावेशन क्षेत्रातील अग्रणी देश आहे. भारतातील १९०४ चा सहकारी पतसंस्था कायदा, देशातल्या सहकारी संस्थांना कायद्याचे बळ देणारा ठरला आहे. (रॉय २०११) ह्या सहकारी संस्थांचे उद्दिष्ट बँकिंग सुविधांची व्यापकता वाढवणे विशेषत: सावकाराकडून मिळणाऱ्या कर्जापेक्षा कमी दरात आणि सोप्या अटी आणि शर्ती घालून कर्ज उपलब्ध करून देणे हा आहे.**

वित्तीय समावेशन ही वित्तीय उत्पादनांमध्ये आणि सेवांमध्ये समाजाच्या सर्व स्तरातल्या लोकांना, विशेषत: दुर्बल, मागास घटकांना माफक दरात आणि सुयोग्य तसेच पारदर्शी पद्धतीने प्रवेश देणारी प्रक्रिया आहे. या वित्तीय सेवा आणि उत्पादने मुख्य प्रवाहातल्या वित्तीय संस्थाच्या नियमनाखाली कार्यरत असाव्यात (भारत सरकार २००८). या वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट गरीब आणि वंचित घटकांना बँकिंग वित्तव्यवस्थेत प्रवेश देऊन स्थिर उत्पन्न मिळवण्यासाठी सक्षम करणे हा आहे. (रेड्डी, २०१७)

खरं तर, भारत हा वित्तीय समावेशन क्षेत्रातील अग्रणी देश आहे. भारतातील १९०४ चा सहकारी पतसंस्था कायदा, देशातल्या सहकारी संस्थांना कायद्याचे बळ देणारा ठरला आहे. (रॉय २०११) ह्या सहकारी संस्थांचे उद्दिष्ट बँकिंग सुविधांची व्यापकता वाढवणे विशेषत: सावकाराकडून मिळणाऱ्या कर्जापेक्षा कमी दरात आणि सोप्या अटी आणि शर्ती घालून कर्ज उपलब्ध करून देणे हा आहे.

भारतात वित्तीय समावेशनाची प्रक्रिया बँकेच्या राष्ट्रीयीकरणापासून सुरु झाली. १९६७ साली, बँकांच्या सामाजीकीकरणाबाबत बरीच चर्चा झाली. मोठ्या चर्चेनंतर १९६९ साली १४ खाजगी क्षेत्रातल्या बँकाचे राष्ट्रीयीकरण झाले, मोठ्या जनसमुदायाला बँकिंग क्षेत्रात आणण्याची ती सुरुवात होती. महत्वाच्या क्षेत्रांना कर्ज देण्याची संकल्पना १९७४ सालापासून महत्वाची झाली, त्यातून बँक क्षेत्रात नसलेल्याना कर्ज देण्यास सुरुवात झाली. आणि १९८० साली, ग्रामीण भागात आणि समाजातल्या दुर्बल घटकांपर्यत बँकिंग क्षेत्र पोहोचवण्यासाठी आठ खाजगी बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हापासून समाजातल्या ज्या घटकांना अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात प्रवेश मिळाला नव्हता,

अशा क्षेत्रांना बँकिंग सहाय्य पुरवून विकासप्रक्रियेला गती देण्यास सुरुवात झाली.

भारतीय रिझर्व्ह बँक, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांनीही देशभर बँकेचे जाळे पसरवण्यासाठी बरेच प्रयत्न केले. याच प्रयत्नांचा भाग म्हणून सूक्ष्म उद्योग वित्तसहाय्य आणि व्यापार संवाद व्यवस्था सुरु करण्यात आली. त्याशिवाय इतर उपक्रमांमध्ये, प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना (१९७५),सेवा क्षेत्राला सामावून घेण्याचा दृष्टीकोन आणि स्वयंबचत गटांना बँकांशी जोडण्याचा कार्यक्रम ( १९८९, १९९०) सुरु झाला.

अगदी अलीकडच्या काही वर्षात, विशेषत: नोव्हेंबर २००५ पासून वित्तीय समावेशनाची सुरुवात झाली.त्यासाठी रिझर्व्ह बँकेने 'तुमच्या ग्राहकांना जाणून घ्या' मोहिमेसाठीचे नियम शिथिल केले. तसेच, अधिक सोपस्कार नसलेली खाती सुरु केली. वित्तीय समावेशनाच्या धोरणात समभाग आणि कार्यक्षमता तसेच, बँकांची वित्तीय स्थिती आणि कर्ज देण्याची भूमिका लक्षात घेत, सावध भूमिका घेतली आहे. बँकांना पूरक दृष्टीकोन आणि तंत्रज्ञानावर आधारित संशोधनावर भर देत, बँकांना ग्रामीण भागापर्यंत पोचवण्याची क्षमता वाढवण्याचा रिझर्व बँकेचा प्रयत्न आहे.

## बँकिंग सुविधा आणि सेवांचे मर्यादित क्षेत्र

भारतातील वित्तीय चित्र बदलवण्यासाठी वित्तीय समावेशनाअंतर्गत राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांनंतरही बँकिग क्षेत्राची सेवा काही मर्यादित क्षेत्रातच पोहोचली होती. गरीबी , अल्प उत्पन्न स्तर तसेच मर्यादित आणि दूर असलेल्या बँकेच्या शाखा-सुविधा या बाबींमुळे, वंचित—दुर्बल घटकांपर्यत बँक सेवा पोहोचण्यात अडथळे निर्माण झाले होते. २०११ च्या जणगणनेनुसार, भारतातील एकूण कुटुंबांपैकी केवळ ५८.७% कुटुंबापर्यंतच आणि ग्रामीण भागात केवळ ५४.४% कुटुंबापर्यंत औपचारिक बँकिंग सेवा पोचल्या होत्या. (तक्ता १).

## बँकिंग सेवेचा भारतात विस्तार आणि सावकारांची भूमिका

सरकार आणि रिझर्व बँकेने केलेल्या प्रयत्नांमुळे देशात बँकिंग सेवेचा विस्तार झाला. मात्र सावकारांची अजूनही कर्ज देण्यामध्ये महत्वाची भूमिका आहे. रिझर्व बँकेची स्थापना होण्यापूर्वी म्हणजे १९३५ साली भारतात बँकांची ९४६ कार्यालये होती. १९६९ मध्ये जेंव्हा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले त्यावेळी एकूण ८२६२ बँक कार्यालयांपैकी ग्रामीण भागात केवळ १८३३ बँक शाखा तर निमशहरी भागात

**तक्ता क्र १ : बँकिंग सेवा उपलब्ध असलेल्या घरांची टक्केवारी:** (घरे कोटींमध्ये)

| एकूण घरे | २००१ च्या जनगणनेनुसार | | | २०११ च्या जनगणनेनुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण घरे | बँक सेवा उपलब्ध असलेली घरे | टक्केवारी | एकूण घरे | बँक सेवा उपलब्ध असलेली घरे | टक्केवारी |
| ग्रामीण | १३.८ | ४.२ | ३०.१ | १६.८ | ९.१ | ५४.४ |
| शहरी | ५.४ | २.७ | ४९.५ | ७.९ | ५.३ | ६७.८ |
| एकूण | १९.२ | ६.८ | ३५.५ | २४.७ | १४.५ | ५८.७ |

संदर्भ : भारत सरकार


३३४२ बँक कार्यालये होती. याचा अर्थ तीन लाख लोकसंख्येसाठी केवळ एक बँक शाखा उपलब्ध होती. अशा परिस्थितीत सावकार कर्ज देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत होते. विशेषत: ग्रामीण भागात बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतरही बँक शाखेच्या मर्यादित संख्येमुळे सावकारांना महत्व होते. बँकांच्या शाखांचा विस्तार मोठा झाला असला तरीही आणि बँक सेवा खालच्या स्तरांपर्यंत पोचविण्याच्या सरकारच्या प्रयत्नानंतरही ग्रामीण भागात १९९१ नंतर व्यावसायिक सावकारांमार्फत कर्ज घेण्याची पध्दत सुरूच होती.

**सरकारचे विशेष प्रयत्न**

देशातल्या प्रत्येक घरापर्यंत बँकिंग सेवा पोचून बँक खाते उघडले जावे यासाठी विद्यमान पंतप्रधानांनी कार्यभार स्वीकारल्यानंतरच्या स्वातंत्र्य दिनी म्हणजेच १५ ऑगस्ट २०१४ ला केलेल्या भाषणात आर्थिक समावेशनासाठी विशेष प्रयत्नांची गरज असल्याचे अधोरेखित केले. त्याच दृष्टीने देशातल्या घरा-घरांमध्ये बँकिंग सेवा पोचविण्यासाठी तसेच प्रत्येक घरातल्या किमान एका व्यक्तीचे बँक खाते सुरु करण्यासाठी सरकारने सर्वांना बँकिंग व्यवस्थेत प्रवेश देणारी प्रधानमंत्री जनधन योजना सुरु केली.

६ डिसेंबर २०१७ पर्यंत उपलब्ध आकडेवारी नुसार या योजने अंतर्गत ३०.७ कोटी खाती उघडली गेली असून त्यापैकी १८.१ कोटी खाती ग्रामीण भागात तर १२.७ कोटी खाती शहरी भागात उघडली गेली आहेत. रूपे कार्डची संख्याही २३.१ कोटी पर्यंत वाढली आहे. ६ डिसेंबर पर्यंत बँकांमध्ये या खात्यात जमा झालेली ६९८४१.२ कोटी रुपये ही आकडेवारी लक्षात घेतली तर या योजनेची प्रगती उत्तम असल्याचें निदर्शनास येईल. (तक्ता क्र २)

**संस्थात्मक आणि बिगर संस्थात्मक ग्रामीण पतव्यवस्था**




*व्यावसायिक बँकांचा समावेश आहे.*

*संदर्भ: अखिल भारतीय कर्ज आणि गुंतुवणूक सर्वेक्षण, एन एस एस ओ.*

*टीप: अनौपचारिक स्त्रोतांमध्ये सावकार तर औपचारिक स्त्रोतांमध्ये सहकारी पातसंस्था/बँका आणि*

**तक्ता २: प्रधानमंत्री जनधन योजनेची सद्यस्थिती (६ डिसेंबर २०१७ पर्यंत)**

(आकडे-कोटींमध्ये)

| बँकेचे नाव/प्रकार | लाभार्थ्यांची संख्या | | | खात्यांमध्ये जमा रक्कम (रु कोटी मध्ये) | लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रूपे कार्डची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | | |
| सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका | १३.३ | ११.५ | २४.८ | ५५६४६.६ | १८.६ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ४.२ | ०.८ | ४.९ | १२०३३.९ | ३.६ |
| खाजगी क्षेत्रातल्या बँका | ०.६ | ०.४ | १.० | २१६०.६ | ०.९ |
| एकूण संख्या | १८.१ | १२.७ | ३०.७ | ६९८४१.२ | २३.१ |

स्रोत: भारत सरकार https://pmjdy.gov.in/account

ग्रामीण भागात बँकिंग जाळे वेगाने पसरत आहे. मात्र नागरी विशेषत: मोठ्या शहरांमध्ये बँकेच्या शाखा सुरु होण्याचं प्रमाण अधिक आहे. २०१५ मधे ग्रामीण भागात भारतीय स्टेट बँक, तिच्या सहयोगी बँका आणि इतर राष्ट्रीयीकृत बँकांचे प्रमाण सर्वाधिक होते. (तक्ता क्र ४)

**तक्ता ३: लोकसंख्येच्या समूहावर आधारित बँक शाखांची संख्या**

| वर्ष | ग्रामीण | निमशहरी | शहरी | महानगरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९६९ | १८३३ | ३३४२ | १५८४ | १५०३ | ८२६२ |
| १९७९ | १३३३७ | ७८८९ | ५०३७ | ३९३९ | ३०२०२ |
| १९८९ | ३३०१४ | १११६६ | ७५२४ | ५९९५ | ५७६९९ |
| १९९९ | ३२८५७ | १४१६८ | ९८९८ | ८०१६ | ६४९३९ |
| २००९ | ३०९४३ | १९२८२ | १५३५६ | १४२८८ | ७९८६९ |
| २०१७ | ४८८०६ | ३८२०१ | २४५७४ | २६४७८ | १३८०५९ |

टिप: या आकडेवारीत 'प्रशासकीय कार्यालयांना' वगळण्यात आले आहे.

स्रोत: रिझर्व बँक ऑफ इंडिया, भारतीय अर्थव्यवस्थेवरील सांख्यिकी पुस्तिका.

**तक्ता ४: बँक समूह -२०१५ पर्यंत बँक शाखांची संख्या**

| बँकेचे प्रकार | ग्रामीण | निमशहरी | शहरी | महानगरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| स्टेट बँक आणि सहयोगी बँका | ८०२९ | ६५९३ | ४३०४ | ३६२२ | २२५४८ |
| राष्ट्रीयीकृत बँका | २१६०५ | १६९५६ | १३०८३ | ११७०३ | ६३३४७ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | १४६१३ | ३७४८ | १०७१ | २२८ | १९६६० |
| खाजगी क्षेत्रातील बँका | ४३०२ | ६४५७ | ४५२१ | ४६९८ | १९९७८ |
| परदेशी बँका | ८ | १२ | ५७ | २४७ | ३२४ |
| अखिल भारतीय | ४८५५७ | ३३७६६ | २३०३६ | २०४९८ | १२५८५७ |

स्रोत: भारत सरकार

देशातल्या ज्या भागात बँकिंग सेवा पोचल्या नाहीत अशा ठिकाणी बँक सेवा पोचविण्यात सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची नेहमीच महत्वाची भूमिका राहिली आहे. मात्र, गेल्या दशकातली आकडेवारी पहिली बँक विरहित क्षेत्रात पोचल्या होत्या. याच योजनांचे रुपांतर नंतर बचत खात्यांमध्ये झाले.

उत्तर भारतात विशेषत: ग्रामीण आणि निमशहरी भागात पत पुरवठा करण्यात व्यावसायिक बँकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. (तक्ता क्र ६). पूर्व आणि ईशान्य भारतात बँकिंग पतपुरवठा करण्याची संख्याही लक्षणीयरीत्या वाढली आहे.

***तक्ता ५ : शेड्युल्ड व्यावसायिक बँकांमध्ये कर्ज थकबाकीची एकूण रक्कम (बँक समूहानुसार)***

*(खाती दशलक्ष मध्ये आणि रक्कम अब्ज रुपये मध्ये)*

| | १९९६ मार्च | | २०१६ मार्च | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | थकबाकी रक्कम | खात्यांची संख्या | थकबाकी रक्कम |
| स्टेट बँक आणि सहयोगी बँका | १४.२ | ७४२ | २६.८ | १६११३ |
| राष्ट्रीयीकृत बँका | २५.७ | १३०० | ५६.४ | ३५१४६ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | १३.१ | ७३ | २३.४ | २०६८ |
| खाजगी क्षेत्रातील बँका★ | २.४ | २०२ | ५०.३ | १८१२९ |
| परदेशी बँका | १.२ | २२९ | ५.५ | ३७७० |
| एकूण बँका | ५६.७ | २५४७ | १६२.४ | ७५२२६ |

★१९९६ मधे इतर शेड्युल्ड व्यवसायिक बँका

स्रोत: आर बी आय, शेड्युल्ड व्यावसायिक बँकांची आकडेवारी

असता खाते उघडण्याची संख्या आणि जमा रक्कम या दोन्ही आघाड्यांवर खाजगी बँकांची कामगिरीही लक्षणीय ठरली आहे. (तक्ता ५). या आधी काही बँकांनी छोट्या स्तरावर केलेल्या कामांमुळे किंवा त्यांच्या मार्फत चालविल्या गेलेल्या मधुसंचय अथवा जीवन निधी सारख्या योजनांमुळे या बँका,



**तक्ता क्रमांक ६ : व्यावसायिक बँकांमधला थकीत पतपुरवठा(संख्या अब्जांमध्ये)**

| | १९९६ | | | | २०१६ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निमशहरी | शहरी | महानगरे | ग्रामीण | निमशहरी | शहरी | महानगरे |
| उत्तर भारत | ७७ | ५३ | ८५ | २६१ | १७७४ | १९९० | २९६४ | १०५०२ |
| ईशान्य भारत | १२ | ८ | ८ | - | १८१ | २५२ | २२० | - |
| पूर्व भारत | ५९ | ३७ | ४६ | ११६ | ८६६ | ७१४ | १३५१ | २८३७ |
| मध्य भारत | ६६ | ५८ | ७१ | ४७ | १३५२ | १२२६ | २२३१ | १७०८ |
| पश्चिम भारत | ६४ | ५७ | ६० | ६४६ | ९१३ | १३६८ | १४१४ | २०७०३ |
| दक्षिण भारत | १०९ | १५५ | १७२ | २७८ | २२७० | ३८१३ | ४७८४ | ९७८९ |
| अखिल भारत | ३८६ | ३६९ | ४४४ | १३४८ | ७३५८ | ९३६३ | १२९६६ | ४५५४० |

*स्रोत : आरबीआय, शेड्युल्ड व्यावसायिक बँकाची आकडेवारी*

कृषीक्षेत्राला पतपुरवठा करताना, व्यावसायिक बँकाची कामगिरी प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँकापेक्षा अधिक चांगली असल्याचे निदर्शनास आले आहे. (तक्ता ७ : कृषी पतपुरवठ्याचे उद्दिष्ट आणि कामगिरी (रुपये : अब्ज))

| वर्ष | व्यावसायिक बँक | सहकारी बँका | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उद्दिष्ट | कामगिरी | उद्दिष्ट | कामगिरी | उद्दिष्ट | कामगिरी | उद्दिष्ट | कामगिरी |
| २०१३-१४ | ४,७५० | ५,०९० | १,२५० | १,१९९ | १,००० | ८२७ | ७,००० | ७,११६ |
| २०१६-१७ | ६,२५० | ७,९९८ | १,५०० | १,४२८ | १,२५० | १,२३२ | ९,००० | १०,६५८ |

★: तात्पुरती .

**स्रोत** : आरबीआय वार्षिक अहवाल

पतपुरवठा करण्यातले नवनवीन उपक्रम :

बँकिंग सेवा नसलेल्या लोकवस्तीत बँक पोहोचवण्यासाठी, व्यावसायिक बँकांनी नवनवीन उपक्रम राबवायला सुरुवात केली आहे . यात मोबाईल गाड्या, जागोजागी तात्पुरते तंबू उभारुन बँक सेवा लोकांपर्यंत पोहोचवणे, अशा उपक्रमांचा समावेश आहे. आजही असे अनेक खातेधारक आहेत ज्यांनी बँकेच्या शाखेत प्रवेश केला नाही, बीसी (बँकिंग प्रतिनिधी) सेवेमार्फत त्यांचे सगळे बँकिंग व्यवहार करुन बँकिंग क्षेत्रात त्यांना सामावून घेण्याचा या बँकांचा प्रयत्न आहे. बीसी सुविधेमुळे केवळ बँकिंग व्यवहार सोपे झाले नाहीत, तर ग्राहकांना त्यांच्या घराजवळ बँकिंग सेवा घेण्याची सवय लागली तसेच, बँकिंग व्यवहारांवर त्यांना मोठी सवलतही देण्यात आली. यामुळे ग्राहकांना, बँक शाखांमध्ये जाऊन दिवसाचा रोजगार बुडवून बँकेचे काम करण्याची गरज उरली नाही. त्यांचे व्यवहार त्यांच्या परिसरातच पूर्ण होऊ शकतात. अनेकदा ग्रामीण भागात, बचत खात्यात मोठी रक्कम असते, अशावेळी बँकेच्या शाखेत जाऊन काम पूर्ण होण्यासाठी २ ते ६ तासही लागू शकतात. अशावेळी ग्राहकांची इतर कामे किंवा रोजगार खोळंबून राहतो. अशा वेळी, बी सी सुविधेसह बँक सेवा मिळाली तर, ग्राहक त्याचा वापर करू शकतात.

आता झोपडपट्टी किंवा बँक सेवा नसलेल्या इतर भागात ह्या सुविधेसह बँकिंग क्षेत्र पोचले आहे. त्याचप्रमाणे, व्यावसायिक बँकांनी आतापर्यंत आपले कार्यक्षेत्र विस्तारत बीसी (बँकिंग प्रतिनिधी) सुविधेच्या माध्यमातून ६ लाख गावांपर्यंत बँकिंग सेवा पोचवली आहे. मार्च २०१० ते मार्च २०१७ या काळात व्यवहार आणि खात्यांची संख्या यात अनेकपटीने वाढ झाली आहे. बँकिंग प्रतिनिधींच्या मार्फत बचत खात्यांमध्ये जमा झालेली रक्कम २६ पटीने वाढली तर शाखांमध्ये जमा झालेली रक्कम १५ पटीने वाढली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वापरातून झालेल्या बँकिंग व्यवहाराच्या रकमेत याकाळात सर्वाधिक वाढ

### निवडक मुद्दे आणि सूचना

वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल, तर काही अडथळे आताच दूर करण्याची गरज आहे. विशेषत:, दिव्यांग व्यक्तींना, तसेच ज्यांच्या शारीरिक हालचाली, दृष्टी आणि श्रवणक्षमता अधू झाली आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांपर्यंत

**तक्ता ८ : बँकांच्या मार्फत वित्तीय समावेशनाची प्रगती**

**(मार्च मध्ये संपणारे वर्ष )**

| **रक्कम** | | | | | | **(अब्ज रुपयांमध्ये)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **बीएसबीडीए** | | **ओडी** | **केसीसी** | **जीसीसी** | **आय सी टी** |
| | **शाखा** | **बँकिंग प्रातिनिधी** | | | | |
| **२०१०** | ४४ | ११ | ०.१ | १,२४० | ३५ | ७ |
| **२०१४** | २७३ | ३९ | १६ | ३,६८४ | १,०९७ | ५२४ |
| **२०१७** | ६९१ | २८५ | १७ | ५,८०५ | २,११७ | २,६५२ |
| Volume | | | | | | **(अब्ज )** |
| **वर्ष** | **बीएसबीडीए** | **ओडी** | **केसीसी** | **जीसीसी** | **आय सी टी** | |
| | **शाखा** | **बँकिंग प्रातिनिधी** | | | | |
| **२०१०** | ६० | १३ | ०.२ | २४ | १ | २७ |
| **२०१४** | १२६ | ११७ | ६ | ४० | ७ | ३२९ |
| **२०१७** | २५४ | २८० | ९ | ४६ | १३ | १,१५९ |

*टीप: बीएसबीडीए – बचत खाते, ओडी – ओवरड्राफ्ट, केसीसी – किसान क्रेडीट कार्ड , जीसीसी – जनरल क्रेडीट कार्ड, बी सी – व्यापार प्रतिनिधी, आयसीटी- माहिती आणि संवाद तंत्रज्ञान*
*स्त्रोत : आरबीआय*

बीसी सेवेच्या माध्यमातून बँकिंग सेवा केंद्रांची संख्या ३३,३७८ पासून ते ५,४७,२३३ पर्यंत पोचली आहे.

गेल्या सात वर्षात, बँकिंग झाली आहे. या सगळ्यापेक्षा जास्त प्रभाव प्रधानमंत्री जनधन योजनेमुळे पडला आहे. -२०१४ नंतर, या योजनेअंतर्गत बचत खात्यांमध्ये लक्षणीय रक्कम जमा झालेली आहे बँकिंग सेवा पोचवणे गरजेचे आहे. सर्व दिव्यांगापर्यंत बँकिंग सेवा पोहोचवण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानंतरही, या बाबतीत विशेष प्रगती झालेली दिसत नाही. देशात

अद्याप दिव्यांग व्यक्तींसाठी सुकर अशा बँक शाखा आणि एटीएम केंद्रांची संख्या कमी आहे.

वित्तीय समावेशन विस्तार करण्यासाठी अद्याप अनेक गोष्टी करता येतील. मात्र त्यासाठी तंत्रज्ञानात सुधारणा करणे, अनौपचारिक बँकिग व्यवस्थेविषयी ग्राहकांना विश्वास वाटावा, यासाठी, तांत्रिकदृष्ट्या व्यवस्था सक्षम करणे, आवश्यक आहे. बायोमेट्रिक सुविधा आणि सोपीसहज बहुभाषी बँकिग उपकरणे अशा सुविधा ग्रामीण ग्राहकांच्या मनात बँकिंग व्यवस्थेविषयी विश्वास निर्माण करू शकतात. त्याशिवाय, तंत्रज्ञानावर आधारित संशोधन, म्हणजेच, खाते उघडण्यासाठी किंवा कर्ज वितरणासाठी साध्या मशीन्स, उपलबद्ध सुविधांची सतत माहिती देण्याची सोय, यातून बँक सुविधा अधिकाधिक लोकांपर्यत पोहोचण्यास मदत मिळेल.

वित्तीय समावेशनाअंतर्गत दिली जाणारी उपकरणे आणि सुविधांमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांची सामाजिक आर्थिक परिस्थिती अतिशय वेगळी असते. त्यामुळे या सर्व वर्गाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना सोयीच्या वित्तीय सुविधा तयार कराव्यात.

विस्ताराने सांगायचे झाल्यास, व्यावसायिक बँका नोकरदार व्यक्तींसाठी ज्या योजना देतात, त्यापेक्षा ग्रामीण जनतेच्या गरजा वेगळ्या असतात कारण त्यांचे उत्पन्न कृषीउत्पादनांवर आधारित असते.

वित्तीय समावेशनाच्या प्रगतीवर देखरेख ठेवण्यासाठी, वित्तीय संस्थांना एक निश्चित जबाबदारी देणे आवश्यक असते.



ग्रामीण भागात वित्तीय समावेशन साध्य करायचे असल्यास नाबार्ड किंवा ग्रामीण भागातल्या संस्थाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. वित्तीय साक्षरता ही एक निरंतर आव्हान देणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे ग्राहकांना सतत बँकिंग सेवेकडे आकर्षित करण्यासाठी बँक कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी, विशेषत: ग्रामीण भागातल्या ग्राहकांशी सतत सौहार्दाचे संबंध राखण्याची गरज आहे. वित्तीय साक्षरता वाढवण्यासाठी अनेक बँकांनी विविध उपक्रम राबवले असून त्या उपक्रमांना जनतेचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

**सारांश :**

शेवटी सांगायचे झाल्यास, व्यावसायिक बँक, विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी देशात बँकिग सेवेचा विस्तार करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. खासकरून, ग्रामीण आणि निमशहरी भागात या बँका पोहोचल्या आहेत. या बँकांच्या यशस्वी विस्ताराशी पायाभूत सुविधांची सांगड घालून सर्वसामान्य जनतेपर्यत विमा आणि निवृत्तीवेतन निधी अशा सुविधा पोचवणे ही पुढची पायरी ठरेल.

■■■

*लेखकद्वयी बंगळूरू येथील आयआयएममध्ये अनुक्रमे अतिथी अध्यापक आणि संशोधक/ विश्लेषक आहेत.*

email: shivakumara.reddy@iimb.ac.in

# दिवाळखोरीचे निवारण होणाऱ्या नव्या युगामध्ये प्रवेश

**इंदिवजल धसमाना**




**आज जरी आपला देश दिवाळखोरीचा क्रम लावता १०३ व्या स्थानावर आढळून आला तरी २०१७च्या अहवालामध्ये आपण १३६ व्या स्थानावर होतो हे लक्षात घ्यावयास हवे. गेल्या काही वर्षांत आपली अर्थव्यवस्था हळूहळू सुधारत आहे. २०१६ च्या अहवालानुसार आपण १३७ व्या आणि मागच्या वर्षी आपण १३६ व्या स्थानावर होतो.**

व्यापार सुलभतेमुळे भारताने क्रमवारीत सुधारणा केली आहे. हे २०१८ च्या जागतिक बँकेने जाहीर केलेल्या अहवालात दिसून आले. अहवालात १०० पैकी पहिल्या ३० क्रमांकामध्ये भारताने स्थान निश्चित केले आहे. त्या मागील प्रमुख कारणांपैकी एक महत्वाचे असे की भारताला दिवाळखोरीला वेसण घालण्यात आलेले यश. आज जरी आपला देश दिवाळखोरीचा क्रम लावता १०३ व्या स्थानावर आढळून आला तरी २०१७च्या अहवालामध्ये आपण १३६ व्या स्थानावर होतो हे लक्षात घ्यावयास हवे. गेल्या काही वर्षांत आपली अर्थव्यवस्था हळूहळू सुधारत आहे. २०१६ च्या अहवालानुसार आपण १३७ व्या आणि मागच्या वर्षी आपण १३६ व्या स्थानावर होतो.

शासनाने सन २०१६ पासून दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता मंडळ (आयबीसी)या नियामक मंडळाच्या सोबतीने दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता संहितेवर जोर देण्यास सुरुवात केल्यापासून ही सुधारणा पाहावयास मिळते. येथे हे नोंद करणे आवश्यक आहे की, एखादी व्यक्ती वा भागीदारीविषयक दिवाळखोरीच्या तरतूदी नियमावलीत तयार झाली नसल्याने तूर्त कळणे बाकी आहे. दिवाळखोरी होणे म्हणजे काय तर कुणी स्वतंत्र व्यक्ती वा संस्था त्यास बंधनकारक असलेले आणि उसने घेतलेले आर्थिक देणे परत करण्यास असमर्थ होणे. अशा स्थितीत त्या ऋणाची पुनर्रचना करता येते अथवा त्या ऋणासंदर्भात दिवाळखोराविरोधात कायदेशीर दावा उभा करता येतो. कंपनी विषयक दिवाळखोरीत ऋण पुनर्रचना करता येणे किंवा उपलब्ध आणि कंपनीच्या मालकीहक्काची मालमत्ता विक्री करुन देय पूर्ण केले जाते.

व्यापारातील प्रवेश आणि निर्गम यासाठी सुस्पष्ट आणि समयोचित नियमावली ही व्यापारसुलभतेची किल्ली मानली जाते. उपरोक्त संहितेने आपल्या देशात अगोदर अस्तित्वात असणारे व्यापार निर्गम (व्यापारातून बाहेर पडणे) अथवा व्यापार पुनर्रचना (नव्याने ऋणाची संरचना करणे) यामधील अंतर भरुन काढले.

या कायद्याची अंमलबजावणी होण्याअगोदर दिवाळखारीचे निराकरण होण्यास अधिक वेळ लागत असे. यासाठी लागणाऱ्या बऱ्याच कायद्यांमधील बाबी आणि न्यायक्षेत्रे समान मुद्यावर छेदत असल्याने रकमेची पुनर्प्राप्ती (वसुली) करण्यासाठी मांडलेले दावे न्यायालयात मोठ्या प्रमाणात प्रलंबित असत. संहितेआधी, या विषयावर तब्बल १२ कायदे काम करत होते. ज्यामध्ये काँट्रक्ट ॲक्ट, रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यू टू बँकस्, फिनान्शियल इंस्टिट्यूशन ॲक्ट, सिक्युराटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड फिनान्शियल ॲसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट. मात्र अपेक्षित असलेला परिणाम साधला जात नसे. अक्षम औद्योगिक कंपन्या (विशेष तरतूदी) कायदा आणि कंपनी कायदा १९५६ च्या समापनाविषयक (कंपनी बंद करण्याबाबतीतील) तरतूदी देखील प्रभावकारक नव्हत्या.

व्यक्तिश: दिवाळखोरीविषयक कायद्यातील काही भाग, जसे की, प्रेसिडेन्सी टाऊन्स इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट आणि प्रोविन्सिअल इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट हे एक शतकाहूनही अधिक वयाचे आहेत. यांची अंमलबजावणी अनुक्रमे १९०९ आणि १९२० मध्ये झाली. मात्र आजही हे कायदे अस्तित्वात आहेत. संहितेच्या २४३ कलमामध्ये हे कायदे रद्द बातल करण्याविषयी परिच्छेद लिहीलेला आढळतो मात्र याचे पालन अद्याप झालेले नाही. आणि म्हणून वर उल्लेख केल्याप्रमाणे व्यक्तिश: आणि भागीदारी विषयक दिवाळखोरीसाठीची नियमावली अजून अंमलात आणली गेलेली नाही.

---

**संहिता कंपनीच्या दिवाळखोरी निराकरणासाठी समयबध्द प्रक्रिया मांडते. मात्र देणे एक लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास धनको (क्रेडिटर) दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया चालू करुन घेऊ शकतो आणि दावा मांडण्याकरिता राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे जाऊ शकतो.**

---

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी) हे कंपनीच्या दिवाळखोरीच्या निराकरणाबाबत निवाडा करते. तर ऋण पूर्ती न्यायाधिकरण (डीआरटी) हे व्यक्तिश: दिवाळखोरीच्या निराकरणाबाबत निवाडा करते.

संहिता कंपनीच्या दिवाळखोरी निराकरणासाठी समयबध्द प्रक्रिया मांडते. मात्र देणे एक लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यास धनको (क्रेडिटर) दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया चालू करुन घेऊ शकतो आणि दावा मांडण्याकरिता राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे जाऊ शकतो.

ही संहिता या आधी अस्तित्वात असलेल्या निराकरण प्रक्रियेपेक्षा वेगळी आहे. यानुसार धनको या प्रक्रियेमध्ये ऋणकोविरोधात पुढाकार घेतो. तर आधीच्या प्रक्रियेनुसार ऋणको ही प्रक्रिया सुरु करत असे आणि धनको वसुलीसाठी वेगळा दावा मांडत असे. असे असले तरीही कॉर्पोरेट ऋणको दिवाळखोरीसाठी दावा दाखल करु शकतो.

एनसीएलटीमध्ये दावा दाखल केल्यापासून १८० दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण व्हावी लागते. अथवा पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त ९० दिवस मिळतात.

जलदगती निराकरण प्रक्रिया देखील उपलब्ध आहेच. ज्यामध्ये निर्णयाप्रत येण्यासाठी ९० दिवसांचा कालावधी असतो तर अतिरिक्त ४५ दिवसांचा कालावधी वाढवून मिळू शकतो. ही सुविधा केवळ लहान कंपन्या म्हणजेच अशा खाजगी कंपन्या ज्यांचे पेडअप कॅपिटल (जमा केलेले भांडवल) रु. ५० लाखांपर्यंत आहे किंवा आर्थिक उलाढाल रु. २ कोटींपर्यंत आहे अशा कंपन्यांना तसेच स्टार्ट अप्सनाच उपलब्ध आहे. एकूण मालमत्ता १ कोटी पर्यंत असणाऱ्या असूचीबध्द कंपन्या (अनलिस्टेड कंपन्या) देखील ही पध्दत निवडू शकतात.

या काळात धनकोने ऋणकोचा व्यवसाय पुनर्रचित होऊ शकतो का हे निरीक्षले पाहिजे. तथा त्या व्यवसायास पुनरुज्जिवीत करता येणे शक्य आहे का, हे ही तपासले पाहिजे. या काळात धनकोचा

दावा गोठवला (फ्रोजन) जातो. ही दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया अयशस्वी ठरल्यास मात्र मालमत्तेचे परिसमापन (लिक्विडेशन) करणे सुरु होते.

निराकरण प्रक्रियेचा प्रबंध (इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल) परवानाधारक दिवाळखोरी व्यावसायिकांकरवी केला जातो. ह्या अधिकाऱ्यास सनदी लेखाकार (चार्टर्ड अकाऊंटंट), कंपनी सचिव (कंपनी सेक्रेटरी), आय व्यय लेखाकार (कॉस्ट अकाऊंटंट), वकिल किंवा व्यवस्थापक मंडळाचा किमान १० वर्षांचा अनुभव असावयास हवा. लिमिटेड इन्सॉल्व्हन्सी चाचणी त्याने उत्तीर्ण केलेली असावी. वरील पात्रता नसल्यास नॅशनल इन्सॉल्व्हन्सी परिक्षा त्याने उत्तीर्ण केलेली असावी.

एनसीएलटी अंतरिम आयपी (इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल) नियुक्त करते. अर्ज स्विकारल्यापासून १४ दिवसांपर्यंत आयबीबीआय च्या मान्यतेनंतर ही नियुक्ती केली जाते. हा अधिकारी केवळ ३० दिवस कार्यालयाचा ताबा घेतो. ऋणकोची मालमत्ता आणि कंपनीचा कारभार त्याच्या नियंत्रण कक्षेत येतो. ऋणकोकडून आर्थिक बाबींची माहिती घेतो. धनकोंची समिती प्रस्थापित करतो. कॉर्पोरेट ऋणकोशी दाव्याशी संबंधित धनको वगळून इतर सर्व धनको या समितीचा भाग असतात. कार्यरत धनको मतदानाचा हक्क गाळूनही समितीचा भाग होऊ शकतात. मात्र त्यांची एकूण देणे ऋणकोच्या थकबाकी रकमेच्या किमान १० % असावे.

धनको समिती ७ दिवसांच्या आत हंगामी अधिकारी कायम करावा की बदलावा या निर्णयात पोहोचते. त्यानंतर एनसीएलटी निराकरण अधिकारी नियुक्त करते.

**समापनाच्या अनुषंगाने मालमत्तेच्या वाटपाचा प्राधान्यक्रम संहिता ठरवते. सुरक्षित धनकोंना त्यांची पूर्ण थकबाकी रक्कम मिळाली पाहिजे, किंवा किमान संपार्श्विक मूल्य (कोलॅटरल) त्यांस मिळावयास पाहिजे. असुरक्षित धनकोंना व्यापारी धनकोंच्या तुलनेने प्राधान्य मिळते तर सरकारी देय असुरक्षित धनकोंनंतर देऊ केले पाहिजे.**

समापनाच्या अनुषंगाने मालमत्तेच्या वाटपाचा प्राधान्यक्रम संहिता ठरवते. सुरक्षित धनकोंना त्यांची पूर्ण थकबाकी रक्कम मिळाली पाहिजे, किंवा किमान संपार्श्विक मूल्य (कोलॅटरल) त्यांस मिळावयास पाहिजे. असुरक्षित धनकोंना व्यापारी धनकोंच्या तुलनेने प्राधान्य मिळते तर सरकारी देय असुरक्षित धनकोंनंतर देऊ केले पाहिजे.

काही बिल्डर्स या क्रमवारीत नसल्यामुळे घर खरेदीदारांवर मात्र काही काळ संकट आले. मात्र काही काळ विरोध दर्शवल्यानंतर घरखरेदीदारांना फॉर्म एफ भरण्याची परवानगी मिळाली आहे तरी प्राधान्यक्रमात मात्र ते कोठेही दिसून येत नाहेत.

संहितेच्या अंमलबजावणीतील त्रुटी यथाकाल जाणवत आहेत. उदा. देशातील पहिल्या कॉर्पोरेट रिझोल्यूशन योजनेअंतर्गत संहिता लागू केल्यानंतर एनसीटीएलने ९०% इतपत सहाय्यभूत निवाडा मंजूर केला. एनसीटीएलने सिनर्जीज कास्टिंगला सिनर्जीज दुराय ऑटोमोटिव्ह जी जागतिक बाजारात कारसाठी चाके निर्मितीचे काम करते. त्यांना, ९०० कोटींपैकी ५४ कोटी रुपये धनकोना देण्याकरिता आदेश दिले आहेत.

या व्यतिरिक्त, इतर बाबी आकर्षक होत्या. या ५४ कोटी रुपयांपैकी २० कोटी हे ताबडतोब आणि उर्वरित येत्या ५ वर्षांत देण्याचे आदेश दिले गेले. एकूण देय रकमेपैकी २१५ कोटी रुपये हे मुद्दल तर ६८५ कोटी रुपये हे व्याज, वैधानिक देय राशी आणि धनको ऋण होते.

सिनर्जी-दुराय हे औद्योगिक आणि आर्थिक पुनर्रचना महामंडळाकडे असलेल्या ९३००० थकित दाव्यांपैकी एक होय. आयबीसी च्या सांगण्यावरुन हा दावा एनसीटीएलकडे सोपवण्यात आला. एनसीटीएल मध्ये दाखल केलेल्या काही पहिल्या दाव्यांपैकी हा एक.

या वर्षी मे महिन्यामध्ये शासनाने एका विधेयकाची घोषणा केली. ज्यायोगे या निराकरण प्रक्रियेला अधिक चालना मिळाली. पश्चात हे विधेयक बँकिंग रेग्युलेशन (दुरुस्ती) कायदा, २०१७ म्हणून लागू झाले. ज्यामध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ला व्यापक अधिकार देण्यात आले. ज्यामध्ये आरबीआय धनकोंना दिवाळखोरी प्रक्रियेद्वारे थकित कर्जाची वसुली करण्यासाठी आदेश देते.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची अनुत्पादक मालमत्ता किंवा नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याचे मोठे प्रमाण वीज, स्टील, रस्ते बांधणी आणि कापड उद्योगात आहे.

अध्यादेशाच्या अंमलबजावणी करता आरबीआयने १२ मोठ्या थकित कर्जाच्या निरसनासाठी या संहितेचा उपयोग करण्यास सांगतले आहे. अंतर्गत सल्लागार समितीच्या शिफारशींवरुन आरबीआयने असा निर्णय घेतला आहे ज्याकरवी या दाव्यांना समयबध्दता येईल.

ती १२ मोठी कर्जे म्हणजे – भूषण स्टील, लॅनको इन्फ्रा, इसार स्टील, भूषण पॉवर, आलोक इन्डस्ट्रिज, ॲमटेक ऑटो, मॉनेट इस्पात, इलेक्ट्रोस्टील स्टीलज, इरा इन्फ्रा, जेपी इन्फ्राटेक, एबीजी शिपयार्ड आणि ज्योती स्ट्रक्चर्स. एकूण अनुत्पादक मालमत्तेच्या २५% जागा यांनीच व्यापली आहे. मार्च महिन्यापर्यंतचा थकित कर्जांचा आढावा घेतल्यास भारतीय बँकिंग प्रणालीचे एकूण ७.११ लाख कोटी रुपये थकलेल आहेत. त्यांपैकी १.७८ लाख कोटी तर केवळ या १२ कर्जांमध्येच आहेत.

---

**अशा प्रकारे धनको समितीच्या निगराणीमुळे हेतूपुरस्पर दिवाळखोर कंपनीचा ताबा पुन्हा घेऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर दिवाळखोरीत निघालेल्या इतर कंपन्यांसाठी देखील नियामक मंडळांनी कडक नियमावली आखली आहे. सुधारित नियमावलीनुसार सर्व अर्जदारांची (संस्थापक अंतर्भूत करुन) विश्वासार्हता जोखली जाते. त्यामुळेच संस्थापकांना देखील विश्वासनीयता आणि पतपात्रतेच्या तीव्र कसोटीतून मार्गक्रमण करावे लागते.**

---

मोतीलाल ओसवाल या आर्थिक सेवा पुरवठादाराच्या अहवालानुसार, चालू वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यात ३७६ दावे एनसीएलटीकडे थोपवण्यात आले. त्यापैकी १८७ दावे कार्यान्वित धनकोंनी, १२२ दावे आर्थिक धनकोंनी तर उर्वरित कॉर्पोरेट ऋणकोंनी दाखल केले आहेत.

उपरोक्त थकित खात्यांचे निराकरण हे कॉर्पोरेट धनकोंच्या वाटेवरील मुख्य अडचण आहे. असे असले तरी सद्यस्थितीत या कर्जखात्यांपैकी २ खात्यांचे निरसन होत आहे, ७ खात्यांचे परिसमापन (लिक्विडेशन) होत आहे, आणि उर्वरित १४ खाती अपील प्रक्रियेत आहेत, असे हा अहवाल सांगतो.

रिझर्व्ह बँकेच्या शिफारसी नुसार ही १२ कर्जखाती एनसीएलटीकडे वर्ग करण्यात आली आहेत.

दुसरा प्रश्न असा की, यातील संस्थापकांनी त्यांच्या स्वत:च्या कंपनीसाठी लावलेली बोली. हा प्रश्न सोडवणेसाठी संहितेअंतर्गत नियामक मंडळाने कायद्यात दुरुस्ती केली आहे. ज्यामुळे संदिग्ध संस्थापकांना आळा बसू शकेल. हा गोंधळ निर्माण करणाऱ्या लोकांना दूर करण्यात येऊन, स्वत:च्या कंपन्या कमी दरात विकत घेण्याविषयीची धनकोंच्या मनातील भीती शमवणे हाच यामागील खरा उद्देश्य होय.

अशा प्रकारे धनको समितीच्या निगराणीमुळे हेतूपुरस्पर दिवाळखोर कंपनीचा ताबा पुन्हा घेऊ शकत नाही. इतकेच नव्हे तर दिवाळखोरीत निघालेल्या इतर कंपन्यांसाठी देखील नियामक मंडळांनी कडक नियमावली आखली आहे. सुधारित नियमावलीनुसार सर्व अर्जदारांची (संस्थापक अंतर्भूत करुन) विश्वासार्हता जोखली जाते. त्यामुळेच संस्थापकांना देखील विश्वासनीयता आणि पतपात्रतेच्या तीव्र कसोटीतून मार्गक्रमण करावे लागते.

अर्जदारांच्या तपशीलानुसार त्या हेतूपुरस्पर दिवाळखोरांचे (कर्जबुडवे) दोषी, अपात्र, दंडात्मक

कारवाई झालेले अशी वर्गवारी केली जाते. अशी आरबीआयची मार्गदर्शक तत्वे सांगतात. अशा अर्जांना सेबीकडून मज्जाव केला जातो, हे उघड आहे.

संस्थापकांकडून केल्या जाणाऱ्या बोलीचा प्रश्न आजही संपलेला नाही. म्हणूनच शासन या अध्यादेशाद्वारे आयबीसीची सुधारणा करते. ज्यामुळे केवळ हेतूपुरस्पर कर्जबुडव्यांची, संशयास्पद संस्थापकांची हकालपट्टी होत नाही तर एनसीएलटी अंतर्गत दिवाळखोरीच्या दाव्यांमध्ये सापडलेल्या कंपन्यांचे संस्थापक किंवा त्यांच्या सहयोगी संस्थांनाही मनाई केली जाते. याचा परिणाम म्हणून संहितेमध्ये या विधेयकाने कलम २९अ ची भर घातली आहे.

वर्षापेक्षा जास्त काळ अनुत्पादक मालमत्ता बाळगणाऱ्या कंपन्यांच्या संस्थापकांना आणि तिच्या सहयोगी संस्थांना बोली लावण्यापासून मज्जाव करण्याविषयी हा अध्यादेश सांगतो. तसे तर शब्दश: ही मनाई केली जात नाही तर संस्थापकांनी थकीत मुद्दल, व्याज देण्याची आणि मालमत्तेस वर्षभर आजीवित ठेवण्याची तयारी दाखवली असता त्यांना संधी दिली जाते.

मात्र एनसीएलटीमध्ये दाखल झालेल्या दाव्यांना ही संधी उपलब्ध होत नाही. या कंपन्यांचे संस्थापक वा सहकारी वरील १२ कर्जखात्यांची कोणतीही मालमत्ता खरेदी करु शकत नाहीत.

कॉर्पोरेट हमीदार देखील या बोलीसाठी पात्र नसतील. त्याशिवाय होल्डिंग कंपनी वा संस्थापक वा त्यांचे संबंधित कुणीही पक्ष या बोलीमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत.

संस्थापक संबंधित पक्ष ही संकल्पना विस्ताराने सांगण्याची येथे गरज भासते. उदा. अर्सेलोरमित्तलचे उदाहरण घेऊ. या कंपनीस उत्तम

**संस्थापकांकडून केल्या जाणाऱ्या बोलीचा प्रश्न आजही संपलेला नाही. म्हणूनच शासन या अध्यादेशाद्वारे आयबीसीची सुधारणा करते. ज्यामुळे केवळ हेतूपुरस्पर कर्जबुडव्यांची, संशयास्पद संस्थापकांची हकालपट्टी होत नाही तर एनसीएलटी अंतर्गत दिवाळखोरीच्या दाव्यांमध्ये सापडलेल्या कंपन्यांचे संस्थापक किंवा त्यांच्या सहयोगी संस्थांनाही मनाई केली जाते.**

गल्वा या कंपनीच्या मालमत्तेच्या बोलीमध्ये रस असल्यास (उत्तम गल्वा ही दरवर्षी अनुत्पादक मालमत्ताधारक कंपनी म्हणून जाहीर आहे) त्याच्या पतपात्रतेशिवायही पात्र ठरवली जाऊ शकते.

अर्सेलोरमित्तल ही उत्तम गल्वा कंपनीमध्ये अनियंत्रित अल्पभागधारक आहे. त्यांचा संचालक मंडळावर कोणताही प्रतिनिधी नाही. वा व्यवस्थापक मंडळांवर कोणताही प्रभाव नाही. असे सांगून अर्सेलोरमित्तलने या मालमत्ता मिळवण्यासाठीच्या दाव्यामध्ये मजबूत पकड निर्माण केली आहे. त्यामुळे पुनर्रचना प्रक्रियेत ही कंपनी उत्तम गल्वाची संस्थापकही ठरत नाही वा बोली लावण्यापासून त्यांस प्रतिबंधही करता येत नाही.

अर्सेलोरमित्तलची उत्तम गल्वा कंपनीमध्ये केवळ २९% भागीदारी आहे. मात्र मिगलानी कुटुंबियांची बॉम्बे स्टॉक एक्सेंज मध्ये संस्थापक सूचीमध्ये नोंद आहे.

आयबीसीनुसार संबंधित पक्ष ही संकल्पना म्हणजे असा पक्ष ज्याला दिवाळखोर कंपनीमध्ये २०% पेक्षा अधिक मतदानाचा हक्क बजावण्याची ताकद आहे. आणि सार्वजनिक कंपनीच्या संचालकमंडळांमध्ये २% पेक्षा अधिक भागीदारी आहे.

असे असता सेबीच्या व्याख्येनुसार संबंधित पक्ष म्हणजे संस्थापक आणि संस्थापक समूह, जे कुणाही संस्थेत १०% पेक्षा जास्त भागीदारी आणि त्या कंपनीच्या चालू कारभारावर नियंत्रण ठेवतात.

आणि म्हणून, या संदर्भात स्पष्टीकरणाची आत्यंतिक गरज आहे. जेणेकरुन बोली लावण्यासाठी पात्र आणि अपात्र हे निकष निश्चित करता येईल.


उपरोक्त एनएसएलटी कडे सोपवलेल्या १२ कंपन्यांपैकी, ५ स्टील कंपन्या आणि ॲमटेक ॲटो यांनी संभावित खरेदीदार म्हणून माघार घेतलेली आहे.

या १२ कंपन्या वगळता, इतर २९ कंपन्यांची सूची आरबीआयने बँकांकडे दिली असून त्यांची खाती द्विपक्षीय पध्दतीनी हा प्रश्न १३ डिसेंबर पर्यत निर्णयाप्रत आणावा असे आदेश दिले आहेत अन्यथा ही खातीदेखील एनएसएलटीकडे वर्ग करण्यात येईल.

येथे समानतेचा मुद्दा उपस्थित होतो.दुसऱ्या सूचीतील कंपन्यांना जर बँका दोन्ही पक्षांकडून समस्यांचे निराकरण करण्यास अतिरिक्त वेळ देत असतील तर एनएसएलटीकडे सुपूर्द केलेल्या पहिल्या सूचीतील १२ कंपन्यांना हा वेळ का बरे मिळाला नाही

हे आणि असे मुद्दे दिवाळखोरीसंदर्भातून येतच राहतील. ह्या सर्व तरतूदी व्यापारातून बाहेर पडणा-या कंपन्यांना किंवा पुनर्रचना करु इच्छिणाऱ्या कंपन्यांना भारतामध्ये व्यापार करण्यास सुलभता प्राप्त व्हावी या साठी साहाय्य करतात. तरी ही प्रक्रिया नीरस वा रेंगाळणारी होऊ नये याची काळजी घेतली जावी.

उदाहरणादाखल सिनर्जी दुरायचा दावा घेऊ. यामध्ये एडलवाइज एआरसीने राष्ट्रीय कंपनी कायदा अपील प्राधिकरणाकडे कर्ज पुनर्स्थापना योजनेला विरोध दर्शवला. या संदर्भातील मुद्दा असा की, सिनर्जीज कास्टिंग ही कंपनी सिनर्जी दुरायशी अध्यादेशात उल्लेखल्या प्रमाणे संबंधित




पक्ष होती. सिनर्जी दुराय आणि सिनर्जी कास्टिंग मधील दिखाऊ व्यवहाराबद्दलच्या आरोपांसंबंधीची शहनिशा प्राधिकरणाकडून केली जात आहे.

■■■

*लेखक 'बिझीनेस स्टँडर्ड'चे अर्थविषयक संपादक असून ज्येष्ठ पत्रकार आहेत.*

*email : indivjal@gmail.com*





विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**सुवर्णसंधी!**

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com

# ग्राहक सेवा – बँकिंग क्षेत्रातील नवीन अध्याय

सुशील अंबादास रगडे



**पैसे व्याजावर देण्याघेण्याचा संदर्भ आपल्याला वेदिक काळात म्हणजे इ.स.पू. २००० ते १४०० आणि जातक कथांमध्ये (इ.स.पू.६००-४००) सापडतो. इ.स.पू. ५०० ते इ.स.पू. ४०० च्या काळात कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथामध्ये आपल्याला व्याजावर पैसे देणे-घेणे, व्याजाचा दर यांचा संदर्भ मिळतो. आधुनिक काळात भारतात अठराव्या शतकात बँकिंग क्षेत्राची सुरुवात झाली. या काळात १७२० मध्ये बँक ऑफ बॉम्बे आणि १७७० मध्ये बँक ऑफ हिंदुस्थान आणि १७७३ मध्ये जनरल बँक ऑफ बेंगाल आणि बिहारची स्थापना झाली होती.**

भारतामध्ये बँकिंग क्षेत्राचा इतिहास फार जुना आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात सुद्धा आपल्याला याचा संदर्भ पहायला मिळतो. पैसे व्याजावर देण्याघेण्याचा संदर्भ आपल्याला वेदिक काळात म्हणजे इ.स.पू. २००० ते १४०० आणि जातक कथांमध्ये (इ.स.पू.६००-४००) सापडतो. इ.स.पू. ५०० ते इ.स.पू. ४०० च्या काळात कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथामध्ये आपल्याला व्याजावर पैसे देणे-घेणे, व्याजाचा दर यांचा संदर्भ मिळतो. आधुनिक काळात भारतात अठराव्या शतकात बँकिंग क्षेत्राची सुरुवात झाली. या काळात १७२० मध्ये बँक ऑफ बॉम्बे आणि १७७० मध्ये बँक ऑफ हिंदुस्थान आणि १७७३ मध्ये जनरल बँक ऑफ बेंगाल आणि बिहारची स्थापना झाली होती.

सुरुवातीच्या काळात ब्रिटिशांच्या प्रयत्नांमुळे बंगाल आणि मुंबई प्रांतात बँकाचा विकास जास्त झाला. नंतरच्या काळात १९व्या शतकाच्या सुरुवातीला तीन प्रेसिडेंसी बँकांची स्थापना अनुक्रमे कलकत्ता, मुंबई व मद्रास प्रांतात १८०६, १८४० आणि १८४३ साली झाली. नंतर याच तीन प्रेसिडेंसी बँकांचे एकत्रिकरण करून १९२१ साली इम्पिरिअल बँक स्थापन झाली व १९५५ मध्ये तिचे स्टेट बँक ऑफ इंडिया असे नामकरण झाले.

१९६९ आणि १९८० मध्ये केंद्र सरकारने अनुक्रमे १४ आणि ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करून बँकांचे दरवाजे सामान्य जनतेसाठी उघडे केले. भारतातील ग्रामीण भागांच्या गरजा ओळखून २० ऑक्टोबर १९७५ रोजी सरकारने रिजनल रूरल बँकांची स्थापना केली.

भारतामध्ये सरकारी, खाजगी, विदेशी आणि सहकारी अशा प्रकारे बँकांचे सहअस्तित्व आहे.

वित्त मंत्रालय आणि भारतीय रिजर्व बँक यांच्या संकल्पनेतील पेमेंट बँका व स्मॉल फायनांस बँका यांचा उदय २०१६-१७ मध्ये झाला. अशा प्रकारे सद्यस्थितीमध्ये भारतामध्ये खालील प्रकारच्या बँकांचे अस्तित्व आहे.

सरकारी व्यापारी बँका (उदा. SBI, Bank of Baroda); खाजगी व्यापारी, बँका (उदा. ICICI Bank, HDFC Bank); विभागीय ग्रामीण बँका (RRB) (उदा. महाराष्ट्र ग्रामीण

बँक); नागरी सहकारी बँका (उदा. सारस्वत बँक); विदेशी व्यापारी बँका (उदा. सिटीबँक); पेमेंट बँक (उदा. पोस्ट बँक); स्मॉल फायनांस बँक (उदा. उज्जीवन स्मॉल फायनांस); लोकल एरिया बँक (उदा. सुभद्रा बँक, कोल्हापूर); राज्य सहकारी व जिल्हा सहकारी बँका.

वेगवेगळ्या प्रकारच्या बँका पाहिल्यानंतर हा प्रश्न पडणे साहजिक आहे कि एवढ्या विविध प्रकारच्या बँकांची गरज काय? मात्र या प्रश्नातच याचे उत्तर दडलेले आहे कि जेवढ्या गरजा तेवढ्या प्रकारच्या बँका. या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बँकांची स्थापना झाली आहे.

पुढील आधुनिक सेवा या आजकालच्या बँका उपलब्ध करून देत आहेत. मोबाईल बँकिंग; इंटरनेट बँकिंग; फोन बँकिंग; एसएमएस बँकिंग; डेबिट कार्ड; क्रेडिट कार्ड; प्रिपेड कार्ड; ट्रॅव्हल कार्ड; गिफ्ट कार्ड; पेट्रो कार्ड; एटीएम मशिन मधून पैसे काढणे व भरणे; टॅब्लेट बँकिंग; रुपे कार्ड; व्यापाऱ्यांना पीओएस मशिन उपलब्ध करून देणे. व्यापाऱ्यांचे पैसे दररोज जमा करण्यासाठी कर्मचारी पाठविणे जेणेकरून व्यापाऱ्यांना बँकेत जाण्याची गरज पडणार नाही; सर्व बँकांनी आपापले मोबाईल ॲप सुरु केले आहेत. त्यामधून आपण बऱ्याच प्रकारचे व्यवहार करू शकतो. (उदा. SBI Buddy); भारतीय स्टेट बँकेने नुकतेच (Artificial Intelligence) कृत्रिम बुद्धिमत्ता असलेली एक सेवा (Chat Bot) सुरू केली आहे. हे एक तंत्रज्ञान आहे, जे स्वत: ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे (२४×७) देते. BHIM (भारत इंटरफेस फॉर मनी) – हे नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ने तयार केलेले मोबाईल ॲप आहे. याचा वापर करून आपण एकदम सोप्या पद्धतीने पैशाची ऑनलाईन देवाण-घेवाण करू शकतो.

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) :

बँकांना त्यांच्या ग्राहकांना चांगल्या प्रकारच्या सेवा पुरविता याव्या म्हणून भारतीय रिजर्व बँक

**सर्व बँकांनी आपापले मोबाईल ॲप सुरु केले आहेत. त्यामधून आपण बऱ्याच प्रकारचे व्यवहार करू शकतो. (उदा.** SBI Buddy)**; भारतीय स्टेट बँकेने नुकतेच** (Artificial Intelligence) **कृत्रिम बुद्धिमत्ता असलेली एक सेवा** (Chat Bot) **सुरू केली आहे. हे एक तंत्रज्ञान आहे, जे स्वत: ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे (२४×७) देते.** BHIM **(भारत इंटरफेस फॉर मनी) – हे नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया** (NPCI) **ने तयार केलेले मोबाईल ॲप आहे.**

आणि इंडियन बँक असोशिएशन (IBA) यांच्या पुढाकाराने नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ची स्थापना Payment and Settlement Act २००७ च्या कायद्यानुसार करण्यात आली.

खालील दहा बँका नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) च्या प्रवर्तक बँका आहेत.

एसबीआय, पीएनबी, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, आयसीआयसीआय, एचडीएफसी, सिटीबँक आणि एचएसबीसी बँक.

BCSBI बँकिंग कोड अ‍ॅण्ड स्टॅण्डर्ड बोर्ड ऑफ इंडिया :

नोव्हेंबर २००३ मध्ये भारतीय रिजर्व बँकने श्री. एस.एस. तारापोरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. त्या समितीचे उद्दिष्ट हे सामान्य व्यक्तीला पुरेशा बँक सेवा कशा उपलब्ध करून देता येतील, हे होते. या समितीच्या शिफारशीच्या आधारावर BCSBI या संस्थेची स्थापना फेब्रुवारी २००६ मध्ये झाली.

सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका, ग्रामीण बँका व नागरी सहकारी बँका या BCSBI च्या संस्थेच्या सदस्य आहेत.

BCSBI ची मुख्य उद्दिष्ट्ये -

१)बँक ग्राहकांना सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी एक Comprehensive Codes and Standards तयार करणे.

२)सर्व बँका या Codes and Standards चे नियमित पालन करत आहेत अथवा नाही यावर लक्ष ठेवणे.

३)BCSBI आणि IBA ने मिळून दोन कोड्स तयार केले आहेत.

अ) Code of Bank's Commitment of Customers

ब) Code of Bank's Commitment of Micro and Small Enterprises

सध्या श्री. ए.सी. महाजन हे BCSBI चे अध्यक्ष आहेत.

बँक ग्राहकांसाठी भारतीय रिजर्व बँकेने आतापर्यंत अनेक समित्यांचे गठन केलेले आहे. त्यामध्ये तलवार समिती (१९७५), गोईपोरीया समिती (१९९०) तारापोरे समिती (२००४), सदाशिवन वर्किंग ग्रूप (२००६), दामोदरन समिती (२०११) यांचा समावेश होतो.

**प्रधानमंत्री जनधन योजना** (PJDY):

भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांची प्रधानमंत्री जनधन योजना (PJDY) ही एक महात्वाकांशी योजना आहे. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट भारतातील सर्व नागरिकांचे आर्थिक समावेशन करणे हे आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ३० कोटी खाते उघडले आहेत. या खात्यामध्ये ग्राहकांना बचत खाते, कर्ज, विमा, पेंशन, ओव्हर ड्राफ्ट पैसे हस्तांतरण करणे यासारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

आजच्या बँका आधुनिक युगात आपल्या ग्राहकांना तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या सेवा पुरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण हे करत असताना आपण गरीब जनतेकडे दुर्लक्ष करू शकत नाही. त्यामुळेच प्रधानमंत्री जनधन योजना (PJDY) ही योजना खरोखरच आर्थिक समावेशन हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेचा फायदा हा ग्राहकांना, बँकांना व सरकारला सुद्धा झाला आहे.

बँकांच्या ठेवी वाढल्या, ज्यांच्याकडे आधी बँकखाते नव्हते त्यांना आता बँकांच्या विविध सुविधांचा लाभ घेता येणार आहे. सरकारला सुद्धा त्यांच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे प्रधानमंत्री जनधन योजना (PJDY) योजनेमुळे सोपे झाले आहे (उदा. अनुदानाचे पैसे देणे, शिष्यवृत्ती देणे इ.).

आजच्या आधुनिक आणि विविध तंत्रज्ञानाने व्यापलेल्या युगात बँक ग्राहक हा बँकांशी आणि वित्तीय संस्थांसोबत २४×७ जोडला गेलेला आहे. त्यामुळेच विविध संस्था या ग्राहकांना निरनिराळ्या व आधुनिक सेवा पुरविण्यासाठी चढाओढ करीत आहेत. पण यामुळे काही बँकांना या सोयीसुविधा पुरविण्यामध्ये अडचण निर्माण होत आहे. अशा बँकांना नवीन तंत्रज्ञानासोबत जुळवून घ्यावे लागेल.

विविध तंत्रज्ञानांच्या वापरामुळे ग्राहकांना सेवा देताना वेळेचा व स्थानाचा अडसर निर्माण होत नाही. म्हणजेच बँक ग्राहकाला कोठेही व कधीही सेवा पुरवू शकते. उदा. खात्यातील रक्कम बघणे, पैसे काढणे, पैसे भरणे, पैसे पाठविणे किंवा स्वीकारणे इत्यादी.

भारतीय अर्थव्यवस्था ही आता विकसनशील अर्थव्यवस्थेकडून विकसित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. भारतामध्ये आता स्वदेशी कंपन्यांसोबत परदेशी कंपन्याही एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. त्यामुळेच उत्कृष्ठ दर्जाची ग्राहक सेवा ही काळाची गरज बनली आहे.

कोणत्याही प्रकारच्या व्यवहारामध्ये शेवटचा टप्पा हा पैशाची देवाण-घेवाण हा असतो. त्यामुळे बँका या सर्व प्रकारच्या व्यवहारांमध्ये अविभाज्य घटक बनल्या आहेत. त्यामुळे तुमची बँक ही पैसे देवाण-घेवाण करण्याची सर्व प्रकारची सुविधा पुरविते की नाही हे महत्त्वाचे झाले आहे. तुमच्याकडे एका बँकेचे डेबिट कार्ड आहे व ते जर रेल्वेचे तिकीट ऑनलाईन आरक्षित करते वेळेस जर उपयोगात येत नसेल तर त्याचा काही उपयोग नाही.

बदलते कल/प्रवाह (Changing Trends in the Banking Sector)

१) पैसे काढणे : आधी ग्राहकांना बँकांमध्ये रांगा लावून तासंतास उभे राहावे लागायचे आता २४×७ एटीएम मशिन मधून आपण पैसे काढू शकतो.

२) खात्यावरील रकमेची माहिती घेणे : यासाठी सुद्धा बँकेत जाऊन पासबुक वर नोंद करावी लागत असे. आता मोबाईल, एसएमएस, मोबाईल ॲप, फोन, इंटरनेट वर यासंबंधी माहिती मिळू शकते.

३) पैसे जमा करणे (बचत/चालू खाते) : आता पैसे जमा करण्यासाठी बँकेत जाण्याची गरज नाही. तुम्ही एटीएम मशिनमध्ये पैसे भरू शकता किंवा बँकेचे कर्मचारी सुद्धा तुमच्याकडे येऊन पैसे जमा करून घेतात.

४) रोख रक्कम बाळगणे : डेबिट कार्ड/क्रेडीट कार्ड, मोबाईल ॲप च्या माध्यमातून आपण पैसे देऊ शकतो.

५) खाते उघडणे : आपण इंटरनेट वर सुद्धा खाते उघडू शकतो.

काही बँकांमध्ये एटीएम वरच खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. काही खाजगी बँकांमध्ये टॅबलेटवर सुद्धा २-३ मिनिटांत खाते उघडता येते.

६) रेल्वेचे तिकीट काढणे/ परीक्षांची फीस भरणे/पेट्रोल पंपावर पैसे देणे. : या सर्व दैनंदिन गरजांसाठी आता बँका विविध सुविधा उपलब्ध करून देत आहे.

७) केवायसी (KYC – Know Your Customer) : आधार कार्ड मुळे आता बँकांना जास्त कागदपत्रांची गरज नाही. आधार कार्ड मध्ये नागरिकांची सर्व माहिती उपलब्ध आहे.

८) गिफ्ट कार्ड : आधीच्या काळात आपण आपल्या आप्तेष्टांना भेट ही एखाद्या वस्तू किंवा पैशाच्या स्वरूपात देत होतो; पण आता गिफ्ट कार्ड हाही एक नवीन पर्याय उपलब्ध आहे.

९) व्यापाऱ्यांना विविध करांसंबंधी सुविधा : व्यापाऱ्यांना त्यांच्या आयकर, जीएसटी संदर्भात विविध प्रकारच्या सेवा प्रदान करते.

१०) बँकिंग व्यवहारांसोबत इतर वित्तीय सेवा पुरविणे : गुंतवणुक, विमा, शेअर बाजार यासंबंधीत ग्राहकांना सल्ले देणे.

११) डीमॅट खाते : आजच्या काळात वित्तीय साक्षरता वाढत आहे व सामान्य नागरिक सुद्धा भांडवल बाजाराकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे त्यांना डीमॅट व इतर सेवा सुविधा पुरविणे.

१२) ट्रॅव्हल कार्ड/चेक : देशात किंवा परदेशात फिरायला गेल्यावर या कार्डचा फार उपयोग होतो. सामान्यत: विविध देशांचे रोख चलन बाळगण्याची गरज नाही. या कार्डच्या माध्यमातून आपण कोणत्याही देशातील बँकांच्या एटीएम मधून त्या देशांचे चलन काढू शकतो.

१३) व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवसायाबद्दल मार्गदर्शन करणे आणि विविध प्रकारचे अहवाल उपलब्ध करून देणे :

बँकेचा एक प्लॅटफॉर्म म्हणून उपयोग (BAAP - Bank as a Platform) : Latest Banking Business Model

यामध्ये विविध फिनटेक कंपन्या या बँकांशी सहयोग करून बँकांच्या


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ______ date ______

Name (in block letters) : ______

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______

Phone No. / email : ______

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.


**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**
**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

ग्राहकांना विविध सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करतात यामध्ये तिघांनासुद्धा फायदा होतो. फिनटेक कंपन्यांना बँकेचे ग्राहक मिळतात व बँकांना सुद्धा त्यांच्या ग्राहकांना कमीत कमी किमतीत विविध नावीन्यपूर्ण सेवा पुरविता येतात.

**बँक खाते नंबर पोर्टेबिलीटी :**

आज ग्राहकांना मोबाईल नंबर पोर्टेबिलीटी ची सुविधा उपलब्ध आहे. म्हणजेच आपल्याला जर एखाद्या मोबाईल कंपनीची सेवा आवडली नाही तर आपण तोच नंबर कायम ठेवून दुसऱ्यां मोबाईल कंपनीची सेवा घेऊ शकतो. त्याच प्रमाणे बँक क्षेत्रामध्ये सुद्धा बँक खाते नंबर पोर्टेबिलीटी करता येऊ शके व आपल्याला जर एखाद्या बँकेची सेवा आवडली नाही तर आपण आपले खाते दुसऱ्यां बँकेत हस्तांतर करू शकतो. त्यामुळे येत्या काळात बँकांना ग्राहकांच्या विविध गरजा ओळखून नावीन्यपूर्ण सेवा कमीत कमी वेळेत व कमीत कमी किमतीत, उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

■■■




*लेखक भारतीय रिझर्व बँकेचे माजी व्यवस्थापक आहेत. सध्या एन्लाइट एज्युकेशन, औरंगाबाद येथे संचालक म्हणून कार्यरत आहेत.*

*email : susheelragade@gmail.com*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# बँकिंग क्षेत्र आणि महाराष्ट्रातील शेती वित्तपुरवठा

प्रा. जीवन बिरादार



**बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा होणारा प्रत्यक्ष परिणाम हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. बँकिंग क्षेत्रातील सुधारणांमुळे भारतातील विविध क्षेत्रावर परिणाम होणे अपेक्षितच होते. त्याचप्रमाणे शेतीच्या वित्तपुरवठ्यावर, विशेषत: महाराष्ट्रातील शेती वित्तपुरवठ्यावर त्याचा कसा परिणाम झाला याबद्दलचे विश्लेषण प्रस्तूत लेखात करण्यात आले आहे.**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये १९९१ साली आर्थिक सुधारणा कार्यक्रमाची सुरूवात झाली. याच वर्षी नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली देशांतील बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने नोव्हेंबर १९९१ मध्ये आपला अहवाल सादर केला . या अहवालात सुचविलेल्या अनेक उपायांची अंमलबजावणी केली गेली. त्यानंतर १९९८ साली नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एकदा समिती स्थापन करण्यात आली. या समितीने या पूर्वीच्या सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी कशी झाली आणि यापुढे बँकिंग क्षेत्रात कोणत्या सुधारणांची गरज आहे यांचा अभ्यास केला. या समितीला बँकिंग क्षेत्रातील सुधारणा असे संबोधले गेले. या वरील दोन्ही समितीच्या अभ्यासामुळे आणि सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी केल्यामुळे आपल्या देशातील बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले .

या सुधारणांमुळे शेती वित्त पुरवठ्यावर काय आणि कसा परिणाम झाला याबद्दलचे खूप संशोधन आणि विचारमंथन झाले आहे . म्हणून प्रस्तुत लेखामध्ये बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा महाराष्ट्रातील व्यापारी बँकांचा शेती वित्तपुरवठा यावर कसा आणि काय परिणाम झाला यांचे विश्लेषण केले आहे .

व्यापारी बँकांचा शेती वित्तपुरवठा -

भारतामध्ये व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांचा शेतीच्या वित्तपुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये सुद्धा सहकारी वित्त संस्थांबरोबर व्यापारी बँकांचा सुद्धा महत्त्वाचा वाटा आहे असे दिसून येते. व्यापारी बँकांचा शेती वित्तपुरवठा हा दोन प्रकारामध्ये विभागला जातो.

**अ) प्रत्यक्ष वित्तपुरवठा**


**ब) अप्रत्यक्ष वित्तपुरवठा**

जेव्हा कर्ज जो घेतो तोच व्यक्ती कर्जफेड करण्यास जबाबदार असतो

त्याला प्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हटले जाते. यामध्ये अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाचा समावेश होतो. असे कर्ज थेट शेतकऱ्याला शेतीच्या कामासाठी व शेतीवर आधारित पूरक व्यवसाय उदा. दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, मधमाशापालन इत्यादी साठी दिले जाते.

त्यामुळं त्यांना अतिरिक्त कर्ज निधी ''ग्रामीण पायाभूत विकास निधी'' (RIDF) यामध्ये गुंतवणूक करावा लागतो. पण यावर ४ ते ५ % एवढा कमी व्याजदर मिळत असल्यामुळे बऱ्याच बँका शेतीला सोयीसुविधा पुरवणाऱ्या कंपन्यांना वित्तपुरवठा करतात.

**Graph 1: Period-wise Compound Annual Growth Rate of SCBs in Maharashtra (per cent)**




पण जेव्हा शेती कर्ज अप्रत्यक्षपणे मध्यस्थी संस्था किंवा वितरक हे परतफेड करण्यासाठी जबाबदार असतात त्याला शेतीसाठी अप्रत्यक्ष वित्त पुरवठा असे म्हणतात. असे कर्ज रासायनिक खते वितरक, राज्य सहकारी, भारतीय खाद्य निगम आणि गोदाम यांना दिले जाते.असे अप्रत्यक्ष कर्ज व्यापारी बँका अनेक कारणामुळे देतात. यातील प्रमुख कारण म्हणजे भारत सरकारने सर्व व्यापारी बँकांना कमीत कमी १८% कर्जपुरवठा शेती क्षेत्राला करण्याची सक्ती हे,होय. कारण बऱ्याच बँका हे ध्येय पूर्ण करू शकत नाही.

**बँकिंग क्षेत्रातील सुधारणा आणि शेती वित्तपुरवठा -**

राष्ट्रीय पातळीवरील प्रमाणेच बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा महाराष्ट्रातील शेती वित्तपुरवठयावर परिणाम झालेला दिसून येतो. हा परिणाम अभ्यास करण्यासाठी आपण मागील तीन दशके म्हणजे १९८१ ते १९९०, १९९१ ते २००० आणि २००० ते २०१० याचा आढावा घेऊ.

१) बँकिंग क्षेत्रातील सुधारणा पूर्व कालखंड (१९८१ ते १९९०)

२) बँकीग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (१९९१ ते २००० - पहिले दशक)

३) बँकिंग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (२००० ते २०१० - दुसरे दशक

१) बँकिंग क्षेत्रातील सुधारणा पूर्व कालखंड (१९८१ ते १९९०)-

सुधारणा पूर्व कालखंड (१९८१ ते १९९०) महाराष्ट्रामध्ये व्यापारी बँकांचा शेती क्षेत्राला वित्तपुरवठा यांचे चित्र खूपच सकारात्मक दिसून येते. १९८१ साली ५६६२७१ खाती याना ३९५८३ लाख रु. एवढा एकूण कर्जपुरवठा होता. यामध्ये वाढ होऊन १९९० साली १४४५८४६ खाती याना १४६०५९ लाख रु. एवढा वित्तपुरवठा होत होता. यांचा संयुक्त वार्षिक वृद्धिदर अनुक्रमे १०.९८% व १५.६१% एवढा होता. प्रत्यक्ष वित्तपुरवठा हा अनुक्रमे ११. ३१%आणि १२. २२% या संयुक्त वार्षिक वृद्धी दराने वाढला म्हणजेच अप्रत्यक्ष वित्तपुरवठा खाती यांची वाढ कमी होती. तसेच या खात्याचा वाटा सुद्धा सरासरी फक्त ३. २६% एवढाच होता पण प्रत्यक्ष वित्तपुरवठा यांचा वाटा मोठा होता

तक्ता क्र. १: महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी बँकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी वित्त पुरवठा

*(रुपये लाखांमध्ये)*

| वर्ष | एकूण कृषी वित्तपुरवठा | | प्रत्यक्ष वित्त | | अप्रत्यक्ष वित्त | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम |
| **बँकिंग क्षेत्रातील सुधारणा पूर्व कालखंड (1981ते 1990)** | | | | | | |
| जून-८१ | ५६६२७१ | ३९५८३ | ५३८५१६ | २६०७७ | २७७५५ | १३५०६ |
| जून-८२ | ७००६६७ | ४८०१३ | ६७३५२९ | ३२५४३ | २७१३८ | १५४७० |
| जून-८३ | ७२७१२० | ६५६७७ | ६९८३४७ | ३६०२७ | २८७७३ | २९६५० |
| जून-८४ | ९०५१६७ | ६०४५१ | ८५९३६६ | ४६०९५ | ४५८०१ | १४३५६ |
| जून-८५ | १०३२४८५ | ६७९६० | ९९७५९९ | ५३७९५ | ३४८८६ | १४१६४ |
| व्ल्ह-८६ | ११२३४४० | ८३०५३ | १०९१४९९ | ६४५६१ | ३१९४१ | १८४९२ |
| जून-८७ | १२४१९८१ | १०२१८८ | १२११७६९ | ७८९७१ | ३०२१२ | २३२१७ |
| जून-८८ | १३६८२८३ | ११५३२९ | १३४०४३६ | ८९१२६ | २७८४७ | २६२०३ |
| जून-८९ | १४७७३६२ | १३९६४६ | १४४९६२२ | १०६४८८ | २७७४० | ३३१५९ |
| मार्च-९० | १४४५८४६ | १४६०५९ | १४१२८५८ | १०७९३२ | ३२९८८ | ३८१२७ |
| **मध्य** | १०५८८६२.२० | ८६७९५.९० | १०२७३५४.१० | ६४१६१.५० | ३१५०८.१० | २२६३४.४० |
| संवावृद | १०.९८% | १५.६१% | ११.३१% | १७.१०% | १.९४% | १२.२२% |

संवावृद: संयुक्त वार्षिक वृद्धिदर

२) बँकीग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (१९९१ ते २००० - पहिले दशक )

या कालखंडात देशात बँकिंग क्षेत्रातील सुधारणांना सुरवात झाली . १९९१ नरसिहंम समिती-I (बँकिंग व्यवस्थेचा अभ्यास करणारी नरसिंहम समिती ) आणि १९९८-नरसिहंम समिती-II (बँकिंग क्षेत्रातील सुधारणा यावर अभ्यास करणारी नरसिहंम समिती ) या दोन्ही समित्यामुळे बँकिंग क्षेत्रातील सुधारणांना मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. या सुधारणांचा परिणाम पर्यायाने राज्यातील शेती वित्तपुरवठ्यावर सुद्धा झाला .

तक्ता 2: महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी बँकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी वित्त पुरवठा

*(रुपये लाखांमध्ये)*

| वर्ष | एकूण कृषी वित्त पुरवठा | | प्रत्यक्ष वित्त | | अप्रत्यक्ष वित्त | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम |
| **बँकिंग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (१९९१ ते २०००) - पहिले दशक** | | | | | | |
| मार्च ९१ | १८६७४८४ | १६०९७६ | १८४२१७४ | १२६६३९ | २५३१० | ३४३३७ |
| मार्च ९२ | २६६७२८४ | १७८२४४ | २६४२७६५ | १४१२६२ | २४५१९ | ३६९८२ |
| मार्च ९३ | १८१९२९० | १९३०३३ | १७९९०१३ | १५१८४० | २०२७७ | ४११९३ |
| मार्च ९४ | १७००५३६ | १८१००१ | १६६१५६१ | १४००६८ | ३८९७५ | ४०९३३ |
| मार्च ९५ | १५९७५७५ | २०९८१४ | १५७७७१५ | १४५३९५ | १९८६० | ६४४१९ |
| मार्च ९६ | १५९०४०१ | २८२१६२ | १५७१२५८ | १९७४११ | १९१४३ | ८४७५० |
| मार्च ९७ | १५६०२४२ | ३२४४६८ | १५४२०६२ | २३०३३० | १८१८० | ९४१३८ |
| मार्च ९८ | १४४२२२६ | ३४५१६६ | १४२२३४६ | २५०८९० | १९८८० | ९४२७६ |
| मार्च ९९ | १३६१९७२ | ३९७७२४ | १३३९९१२ | २९२६५५ | २२०६० | १०५०६९ |
| मार्च ०० | १३५६३०१ | ४७४९४९ | १३२२५५४ | ३३७७४० | ३३७४७ | १३७२०८ |
| मध्य | १६९६३३१.१० | २७४७५३.७० | १६७२१३६.० | २०१४२३.० | २४१९५.१० | ७३३३०.५० |
| संवावृद | -३.४९% | १२.७७% | -३.६२% | ११.५२% | ३.२५% | १६.६४% |

संवावृद: संयुक्त वार्षिक वृद्धिदर

तक्ता ३: महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी बँकांची प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी वित्त पुरवठा (टक्केवारी)

| वर्ष | प्रत्यक्ष वित्त | | अप्रत्यक्ष वित्त | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम |
| **बँकिंग क्षेत्रातील सुधारणा पूर्व कालखंड (१९८१ ते १९९०)** | | | | |
| जून ८१ | ९५.१० | ६५.८८ | ४.९० | ३४.१२ |
| जून ८२ | ९६.१३ | ६७.७८ | ३.८७ | ३२.२२ |
| जून ८३ | ९६.०४ | ५४.८५ | ३.९६ | ४५.१५ |
| जून ८४ | ९४.९४ | ७६.२५ | ५.०६ | २३.७५ |
| जून ८५ | ९६.६२ | ७९.१६ | ३.३८ | २०.८४ |
| जून ८६ | ९७.१६ | ७७.७३ | २.८४ | २२.२७ |
| जून ८७ | ९७.५७ | ७७.२८ | २.४३ | २२.७२ |
| जून ८८ | ९७.९६ | ७७.२८ | २.०४ | २२.७२ |
| जून ८९ | ९८.१२ | ७६.२६ | १.८८ | २३.७५ |
| Mar-90 | ९७.७२ | ७३.९० | २.२८ | २६.१० |
| मध्य | ९६.७४ | ७२.६४ | ३.२६ | २७.३६ |
| **बँकिंग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (१९९१ ते २०००) - पहिले दशक** | | | | |
| मार्च ९१ | ९८.६४ | ७८.६७ | १.३६ | २१.३३ |
| मार्च ९२ | ९९.०८ | ७९.२५ | ०.९२ | २०.७५ |
| मार्च ९३ | ९८.८९ | ७८.६६ | १.११ | २१.३४ |
| मार्च ९४ | ९७.७१ | ७७.३९ | २.२९ | २२.६१ |
| मार्च ९५ | ९८.७६ | ६९.३० | १.२४ | ३०.७० |
| मार्च ९६ | ९८.८० | ६९.९६ | १.२० | ३०.०४ |
| मार्च ९७ | ९८.८३ | ७०.९९ | १.१७ | २९.०१ |
| मार्च ९८ | ९८.६२ | ७२.६९ | १.३८ | २७.३१ |
| मार्च ९९ | ९८.३८ | ७३.५८ | १.६२ | २६.४२ |
| मार्च ०० | ९७.५१ | ७१.११ | २.४९ | २८.८९ |
| मध्य | ९८.५२ | ७४.१६ | १.४८ | २५.८४ |

| बँकिंग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (२००० ते २०१०) - दुसरे दशक | | | | |
|---|---|---|---|---|
| मार्च ०१ | ९८.०५ | ६८.९० | १.९५ | ३१.१० |
| मार्च ०२ | ९५.५६ | ५८.६५ | ४.४४ | ४१.३५ |
| मार्च ०३ | ९४.८८ | ६०.०८ | ५.१२ | ३९.९२ |
| मार्च ०४ | ९६.६७ | ५१.३१ | ३.३३ | ४८.६९ |
| मार्च ०५ | ९८.१७ | ६१.७४ | १.८३ | ३८.२६ |
| मार्च ०६ | ९८.३९ | ५५.१२ | १.६१ | ४४.८८ |
| मार्च ०७ | ९८.१७ | ६०.१० | १.८३ | ३९.९० |
| मार्च ०८ | ९७.०९ | ७०.९४ | २.९१ | २९.०६ |
| मार्च ०९ | ९९.२८ | ६९.३१ | ०.७२ | ३०.६९ |
| मार्च १० | ९८.६१ | ७४.३३ | १.३९ | २५.६७ |
| मध्य | ९७.४९ | ६३.०५ | २.५१ | ३६.९५ |

संवावृद: संयुक्त वार्षिक वृद्धिदर

तक्ता ४: महाराष्ट्रातील अनुसूचित व्यापारी बँकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी वित्त पुरवठा

(रुपये लाखांमध्ये)

| वर्ष | एकूण कृषी वित्त पुरवठा | | प्रत्यक्ष वित्त | | अप्रत्यक्ष वित्त | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम | खात्यांची संख्या | शिल्लक रक्कम |
| बँकिंग क्षेत्रातील सुधारणा नंतरचा कालखंड (२००० ते २०१०) - दुसरे दशक | | | | | | |
| मार्च ०१ | १३२४०९५ | ४९७९९८ | १२९८३११ | ३४३११९ | २५७८४ | १५४८७९ |
| मार्च ०२ | १२८८१९० | ६५२४९८ | १२३०९६३ | ३८२६६९ | ५७२२७ | २६९८२९ |
| मार्च ०३ | १२१८५५८ | ७४६१६६ | ११५६१९४ | ४४८३३२ | ६२३६४ | २९७८३४ |
| मार्च ०४ | ९५०३३६ | १००१४९१ | ९१८७२४ | ५१३९१० | ३१६१२ | ४८७५८१ |
| मार्च ०५ | १२४६४७७ | १२३४५५८ | १२२३७२२ | ७६२२१४ | २२७५५ | ४७२३४३ |
| मार्च ०६ | १३५३७५९ | २०७०७४७ | १३३१९०५ | ११४१४७४ | २१८५४ | ९२९२७२ |
| मार्च ०७ | १६०३९७७ | २४३९८६४ | १५७४५६१ | १४६६४१४ | २९४१६ | ९७३४५० |
| मार्च ०८ | २१४७३९४ | २६५२०४३ | २०८४९७८ | १८८१४३६ | ६२४१६ | ७७०६०७ |
| मार्च ०९ | ४३३०४६७ | २७६६५१६ | ४२९९३२१ | १९७३९० | ३११४६ | ८४९१२५ |
| मार्च १० | २३६३१३२ | ३५३४३२२ | २३३०२५७ | २६२६९३६ | ३२८७५ | ९०७३८६ |
| मध्य | १७८२६३८.५० | १७५९६२०.३० | १७४४८९३.६० | ११४८३८९.४० | ३७७४४.९० | ६११२३०.६० |
| संवावृद | ६.६५% | २४.३३% | ६.७१ | २५.३८% | २.७४% | २१.७१% |

संवावृद: संयुक्त वार्षिक वृद्धिदर

■■■

*लेखक कोथरूड, पुणे येथील एमआयडी वर्ल्डपीस युनिवर्सिटीतील अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत.*

*email : jivan.biradar@gmail.com.*

# ४८ वा आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव गोव्यात संपन्न



गोवा येथे ४८ वा आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फी २०-३० नोव्हेंबर २०१७ या काळात मोठ्या दिमाखात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही या भव्यदिव्य सोहळ्यात देश व विदेशातील उत्तमोत्तम चित्रपट कलाकृती दाखविण्यात आल्या.

या सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलतांना केंद्रीय माहिती आणि प्रसारण आणि वस्त्रोद्योग मंत्री स्मृती इराणी म्हणाल्या की, भारत ही सण, उत्सव, सळसळता युवा वर्ग आणि कहाण्यांची भूमी आहे, इथे सोळाशेहून अधिक बोली भाषांमध्ये कथा सांगितल्या जातात. जगभरातल्या चित्रपट निर्मात्यांना भारतात आमंत्रित करणे हे भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्दिष्ट असल्याचे सांगून, या महोत्सवामुळे चित्रपट प्रेमींना भारतीय चित्रपट उद्योगातल्या प्रथितयश आणि नावाजलेल्या मान्यवरांना भेटण्याची संधी मिळेल, असे त्या म्हणाल्या.

या महोत्सवात ८२ देशांचे सुमारे १९५ चित्रपट दाखवण्यात आले. यामध्ये १० आशियाई आणि १० आंतरराष्ट्रीय प्रिमिअर तसेच ६४ पेक्षा अधिक भारतीय प्रिमिअरही पार पडले. या वर्षी पहिल्यांदाच महोत्सवामध्ये सर्व जुने बाँड पट दाखवण्यात आले. त्याशिवाय कॅनडा चित्रपट महोत्सवातील काही विशेष चित्रपटही दाखवण्यात आले.

याशिवाय महोत्सवात दिवगंत अभिनेते ओम पूरी, टॉम अल्टर, विनोद खन्ना, अभिनेत्रींपैकी जयललिता, रिमा लागू, दिग्दर्शक अब्दुल माजिद, कुंदन शाह, दसरी नारायण राव व छायाचित्रकार रामानंद सेनगुप्ता यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

यावर्षीच्या सोहळ्यात १५ सर्वोत्तम चित्रपटांमध्ये सुवर्ण आणि रौप्य मयूर पुरस्कारासाठी चुरस होती. त्यापैकी फ्रेंच दिग्दर्शक रॉबिन कॅम्पिल्लो यांच्या '१२० बीट्स पर मिनिट' या चित्रपटाने मानाचा सुवर्णमयूर पुरस्कार पटकावला. तर डार्क स्खूल' चित्रपटासाठी बोलिव्हियन दिग्दर्शक किरो रुसो यांना रुपेरी मयूर पुरस्कार देण्यात आला. चीनचे दिग्दर्शक विवियान क्यू यांना उत्कृष्ट दिग्दर्शक, फ्रेंच अभिनेते पनाह्युएल पिरीझ बिस्कार्यात यांना १२० बीट्स पर मिनीट या चित्रपटांतील एड्सग्रस्त रूग्णाच्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा, तर मल्याळम अभिनेत्री पार्वथी टी. के. हिला टेक ऑफ या चित्रपटातील नर्सच्या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. मनोज कदम दिग्दर्शित मराठी चित्रपट क्षितीजला आयएसएफटी युनेस्को गांधी मेडल देऊन गौरवण्यात आले. मल्याळम दिग्दर्शक महेश नारायणन यांना टेक ऑफ या त्यांच्या पहिल्यावहिल्या चित्रपटासाठी परिक्षकांच्या निवडीचा विशेष उत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार देण्यात आला.

यंदाच्या महोत्सवात कॅनडाचे लोकप्रिय दिग्दर्शक ॲटोम इगोयान यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर भारतातील सर्वांचे आवडते अभिनेते अमिताभ बच्चन यांना 'इंडियन फिल्म पर्सनॅलिटी ऑफ द इयर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

■■■



## आपणास माहित आहे का?

# भारतातील विशेषीकृत बँका

वित्तीय संस्था या कोणत्याही देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग मानल्या जात कारण त्या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना दीर्घकालीन वित्तपुरवठा करतात. भारतामध्ये ग्रामीण, गृहनिर्माण, छोटे उद्योग, निर्यात आणि आयात अशा वित्तपुरवठ्याची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करण्यासाठी विशेषीकृत बँका स्थापन करण्यात आल्या. आजच्या घडीला या क्षेत्रांना पतपुरवठा करण्यामध्ये विशेषीकृत बँका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. भारतात चार प्रमुख विशेषीकृत बँका किंवा वित्तीय संस्थांमध्ये – भारतीय निर्यात-आयात बँक (Export-Import Bank of India EXIM Bank), राष्ट्रीय गृहनिर्माण बँक (National Housing Bank –NHB), राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (National Bank for Agriculture and Rural Development -NABARD), आणि भारतीय लघु उद्योग विकास बँक( Small Industries Development Bank of India –SIDBI) इ.चा समावेश होतो.

**भारतीय निर्यात-आयात बँक** (Export-Import Bank of India -EXIM Bank)

भारतातील विशेष वित्तीय संस्थांमधील निर्यात-आयात बँकेला विशेष महत्त्व आहे. ही बँक भारतीय निर्यात-आयात बँक कायदा,१९८१ नुसार वैश्विक निर्यात पत संस्थांप्रमाणेच (Export Credit Agencies-ECAs) निर्यातीसाठी १९८२ पासून कर्जपुरवठा व तत्सम कार्य करते. मोठे उद्योग आणि लघु व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांसाठी ही बँक विस्तृत प्रमाणात उत्पादन आणि सेवा उपलब्ध करून देऊन त्यांच्या वाढीसाठी महत्वाचे योगदान देते. यात तंत्रज्ञान आणि निर्यात उत्पादन विकास, निर्यात उत्पादन, निर्यात विपणन, निर्यातीपूर्व व निर्यात पश्चात व्यापारी जहाजाशी संबंधीत सेवा आणि विदेशी गुंतवणूक यांचा समावेश आहे. याशिवाय निर्यातदार आणि आयातदारांना आर्थिक सहाय्य आणि भारतीय वित्तीय बाजारपेठेचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी विविध वित्तीय संस्थांमधील दुवा म्हणूनही काम पाहते. आधुनिकीकरण, उपकरण खरेदी, अधिग्रहण इत्यादीसाठी मुदत कर्जे या बँकेतर्फे उपलब्ध करून दिली जातात. ही बँक निर्यातदारांसाठी उत्पादने ठेवण्यासाठी शीतगृहे अथवा भांडारगृहे उभारण्यासाठी वित्तपुरवठा किंवा कर्ज सुविधाही देते. बँकेच्या निधीतील भांडवल योजनांमध्ये दीर्घ मुदतीचे भांडवल,रोखीच्या स्वरूपात वित्तपुरवठा व सेवा दिल्या जातात तर निधी व्यतिरिक्त कर्ज सेवांमध्ये कर्ज मर्यादा, हमी मर्यादा इ. करिता परवाना पत्र यांचा समावेश आहे. चित्रपट उद्योगासाठी बँकेने चित्रपट निर्मितीसाठी रोख प्रवाह वित्तपुरवठा, विदेशी बाजारात प्रदर्शनासाठी निधीची व्यवस्था इ. सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच ही बँक मानव संसाधन व्यवस्थापन, संशोधन आणि नियोजन, अंतर्गत लेखापरीक्षण इत्यादि विशेष सेवाही देते. भारतीय निर्यात-आयात बँकेच्या शाखा भारतात आणि बाहेरच्या अनेक देशांमध्ये कार्यरत आहेत. या बँकेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

**राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक -** National Bank for Agriculture and Rural Development -NABARD)

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी संस्थात्मक कर्जाचे महत्त्व जाणून भारत सरकारने नियोजनाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच स्पष्ट धोरण बाळगले होते. म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने भारत सरकारच्या आग्रहानुसार या अतिशय गंभीर पैलूंवर लक्ष ठेवण्यासाठी व कृषी आणि ग्रामीण विकास (Agriculture and Rural Development CRAFICARD) करिता संस्थात्मक पतपुरवठा करणाऱ्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन केली. समितीची स्थापना ३० मार्च १९७९ रोजी करण्यात आली. समितीच्या अहवालामध्ये ग्रामीण विकासाकरिता योग्य दिशा, पूर्णवेळ लक्ष केंद्रीत करून आवश्यकतेनुसार वेळेवर पतपुरवठा इ.बाबतीत नव्याने संघटनात्मक साधन असणे गरजेचे असल्याचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला. या शिफारसींनुसार देशाच्या संसदेनेही १९८१

च्या संसद कायदा ६१ नुसार ग्रामीण विकाससंबंधीत सर्व पैलूंवर काम करण्यासाठी एक विशेष वित्तीय संस्था असण्याला संमती दिली. १९८२ मध्ये रिजर्व बँकेचे कृषीक्षेत्रासंबंधी सर्व कार्ये व तत्कालीन कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळ Agricultural Refinance and Development Corporation- ARDC) च्या सर्व कार्यांचे दायित्व सांभाळण्यासाठी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक स्थापन करण्यात आली. सुरूवातीला १०० कोटी रूपयांच्या भागभांडवलावर उभारण्यात आलेल्या या बँकेचे ३१ मार्च, २०१६ रोजीचे भरणा झालेले भागभांडवल (paid up capital) ५००० कोटी रूपये एवढे आहे. भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बॅंक यांच्यातील भाग भांडवलाच्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने भारत सरकारकडे आज रू. ४९८० कोटी रुपये म्हणजे ९९.६० टक्के तर भारतीय रिझर्व्ह बँकेकडे २० कोटी रूपये म्हणजे ०.४० टक्के भागभांडवलाची मालकी आहे.

**राष्ट्रीय गृहनिर्माण बँक –**(National Housing Bank –NHB)

राष्ट्रीय गृहनिर्माण बँक १९९८ मध्ये राष्ट्रीय गृहनिर्माण बँक कायदा १९८७ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार गृहनिर्माणक्षेत्राला आर्थिक आणि इतर आवश्यक सहाय्य देऊन या क्षेत्राच्या विकासाला गती देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आली. संपूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट ऑफरिंगसाठी सध्याच्या हाऊसिंग फायनान्स कंपन्यांना पुनर्वित्त पुरविण्याची तरतूद आहे. बँकेने विकास आणि जोखीम व्यवस्थापन- Development and Risk Management, प्रकल्प वित्तपुरवठा, गृहनिर्माण प्रक्रियांना पुनर्पतपुरवठा, आवश्यक संसाधनांना मोबिलाइझेशन आणि व्यवस्थापन इ. सारख्या विशेष विभागांची स्थापना केली आहे. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक पूर्णत: भारतीय रिजर्व बँकेच्या मालकीची आहे. बँकेच्या अधिनियमाअंतर्गत बँकेचा सर्वसामान्य कारभार आणि व्यवसायाची दिशा व व्यवस्थापनाची जबाबदारी बँकेच्या संचालक मंडळावर आहे.

**भारतीय लघु उद्योग विकास बँक -** Small Industries Development Bank of India (SIDBI)

भारतीय संसदेच्या अधिनियमाखाली २ एप्रिल १९९० रोजी स्थापन करण्यात आलेली भारतीय लघु उद्योग विकास बँक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या संवर्धन, वित्तपुरवठा आणि विकासासाठी व तत्समान उपक्रमांमध्ये गुंतलेल्या इतर संस्था अथवा विभागांच्या कार्यांशी समन्वय साधण्यासाठी प्रमुख वित्तीय संस्था म्हणून काम करते. भारतासारख्या ग्रामीण व कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणाऱ्या देशासाठी सूक्ष्म मध्यम, व लघुउद्योगातून उत्पादन, रोजगार आणि निर्यातीच्या रूपाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण भर पडते. सद्या भारतीय अर्थव्यवस्थेतील ५.१ कोटी उद्योगांचे विशाल जाळे, ११.७ कोटी रोजगाराच्या संधी ६००० पेक्षा अधिक उत्पादनांची निर्मिती, ४५ टक्के उत्पादन निर्मिती आणि मूल्याच्या दृष्टीने सुमारे ४० टक्के निर्यात तर सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ३७ टक्के योगदान सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्र देते. म्हणूनच सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योग क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. या अनुषंगाने लघु उद्योग विकास बँकेलाही विशेष महत्त्व आहे. या बँकेच्या व्यवसायाचे मुख्य धोरण सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योग क्षेत्राला भेडसावणाऱ्या वित्तीय आणि बिगर-वित्तीय अडचणींना सोडवण्यास आवश्यक ते सर्व सहाय्य उपलब्ध करून देणे, हे आहे. ही बँक सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योग क्षेत्राला थेट आर्थिक सहाय्य, भविष्यकालीन योजनांसाठी कर्ज आणि जोखीम भांडवल, शाश्वत वित्तव्यवस्था, व सेवा क्षेत्राद्वारे किंवा इतर वित्तीय संस्थांना अप्रत्यक्ष / पुनर्वित्तपुरवठा इ. प्रकारे सहाय्य देऊ करते. या क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि या क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी बँकेने 'क्रेडिट प्लस' दृष्टिकोन स्वीकारला आहे, ज्यामध्ये कर्ज देण्याव्यतिरिक्त व्यावसायिकता उन्नत्तीकरण, कौशल्य विकास, उत्पादन वितरण सहाय्य, समूह विकास,तंत्रज्ञान व आधुनिकीकरण इ.तून सूक्ष्म मध्यम, व लघुउद्योग क्षेत्राला या बँकेकडून आवश्यक ते सर्व सहाय्य दिले जाते. भारतीय लघु उद्योग विकास बँकेच्या कार्यामुळे सूक्ष्म मध्यम, व लघुउद्योगक्षेत्राशी संबंधित २.३ लाखांपेक्षा अधिक लोकांना लाभ मिळाला असून १.५ लाखापेक्षा अधिक रोजगाराच्या नव्या संधी या क्षेत्रात तयार झाल्या आहेत, आणि ८०००० पेक्षा जास्त ग्रामीण लघुउद्योग स्थापन करण्यात महत्वाचे सहाय्य लाभले आहे.

■■■

# New Arrivals

BOOK YOUR COPY NOW

Visit our
Book Gallery
at
Soochna Bhawan,
CGO Complex
Lodhi Road,
New Delhi-110003




**To buy online visit: www.bharatkosh.gov.in**

For placing orders, please contact: Ph : 011-24367260, 24365609, e-mail: businesswng@gmail.com

**Publications Division**

**Ministry of Information & Broadcasting, Government of India**

Soochna Bhawan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003

**website: www.publicationsdivision.nic.in**

@ DPD_India

www.facebook.com/publicationsdivision
www.facebook.com/yojanaJournal

# श्री. रंजन कोळंबे सर लिखित

**'भारतीय अर्थव्यवस्था'**

**'आधुनिक भारताचा इतिहास'**

**आणि 'भारताची राज्यघटना आणि प्रशासन'**

या पुस्तकांवर आधारित **विश्लेषनात्मक वस्तुनिष्ठ प्रश्नसंच** उपलब्ध...



















**Bhagirath IAS Academy**

U P S C • M P S C

ऑफिस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे–३०

ऑफिस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे –३०

**Ph.: 020-64013450 | 9970298197 | 7378406920**

***Web :*** www.bhagirathacademy.com

***E-mail :*** bhagirathacademypune@gmail.com

***Facebook :*** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **January, 2018**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **January,** 2018
Date of Posting : 16th **January,** 2018




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.